# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

**दिनांक ३०-०३-९१ ते दिनांक ०६-०७-९१**

**रजिष्टर क्र. ९**

**विषय क्र. ५२५/११ :**

वार्ड क्र. ५८ मो. शिवशंकर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ४०,०००/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असून, सदर लाईन २६० मीटर लांबीची आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३/१०५७/९० दि. २१-११-९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकल्या गेल्या व केवळ एक श्री. के. बी. काल्डा यांची ०.१% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. संबंधितास दर कमी करण्यासाठी कार्यालयात बोलाविले असता वाटाघाटी अंती संबंधिताने ०.१% कमी दराऐवजी ४.०५% कमी दराने काम करावयास तयार झाले असून, तसा लेखी खुलासा केलेला आहे.

श्री. के. बी. काल्डा यांचे ४.५% कमी दराचे दरपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५८ मो. शिवशंकर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री. के. बी. काल्डा यांनी वाटाघाटीअंती लेखी दिल्यानुसार सदर काम त्यांचे कडून ४.५% कमी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५२६/१२ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा स्लम भागात हयुम पाईप कल्वर्टचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ४४,३६५/- ला मा. आयुक्तांनी दि. ०२-१२-९० ला मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण १९ निविदा विकण्यात आल्या व एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. बी. इंगळे | २७.२७% कमी |
| २) | श्री. ए. ए. फारुकी | २८.२०% (कमी किंवा जास्त दिलेले नाही.) |
| ३) | श्री. सय्यद सिराजुद्दीन | १५% कमी |
| ४) | श्री. एम. एम. बेग | २३.३२% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२७% कमी दराचे श्री. एस. बी. इंगळे यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम भागात हयुम पाईप कल्वर्टचे कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२७% कमी दराच्या श्री. एस. बी. इंगळे यांच्या (निविदेस) दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५२७/१३ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन नगर आणि कबीर नगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २०३३००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ६४ दि. ११-०७-९० द्वारे मंजुरी मिळाल्यानुसार सदर कामासाठी प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता एकूण फक्त एकच निविदा विकण्यात आली व

एकच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाली तरी मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.७% जास्त दराची आहे.

मे. रे. कन्स्ट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.७% जास्त आहेत. सदर कामासाठी केलेले अंदाजपत्रक १९८९-९० चे सा. बा. विभागाचे दरसुचीनुसार करण्यात आले आहे. या दराने केलेल्या अंदाजपत्रकाचे दरासाठी ठेकेदारांनी वरील दर दिलेला आहे. परंतु सा. बा. खात्याचे १९९०-९१ चे दरसुचीनुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,२२,५०६/- चे होते व या दरानुसार ठेकेदारांनी दिलेल्या दराची तुलना केली असता ठेकेदारांनी दिलेला तर १९९०-९१ चे दरसुचीनुसार २.११% अधिक येतो.

वरील दराप्रमाणे १९८९-९० व १९९०-९१ चे दरात वाढ झालेली लक्षात घेता मे. रे. कन्स्ट्रक्शन याचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.७% जास्त दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सानेवणे :** सदरचा प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** स्थायी समितीने प्रस्ताव रिकॉल करण्यापुर्वी गेल्या आठ महिल्याचा कालावधी लोटला आहे. याबाबत जबाबदार कोण याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता स्लम :** सदरील भागातील मागणी गेल्या कित्येक दिवसापासून असल्याने याबाबतची कार्यवाही होण्याच्या दृष्टीने प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेन नगर आणि कबीरनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामाकरीता प्राप्त झालेल्या मे. रे. कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.७% जास्त दराचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५२८/१४ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा भागात खडी रस्त्याचे काम करण्यासाठी र. रु. ७७,५२५/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०२-१२-९० ला मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकुण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गिरीश सिकची | १९.७७% कमी |
| २) | श्री. सुखबीरसिंग | २५% कमी |
| ३) | श्री. मे. शैलेश कन्स्ट्रक्शन | ३१.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया मे. शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% कमी दराचे दरपत्रक सर्वात कमी आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इंदिरानगर बायजीपुरा भागात खडी, रस्त्याचे कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% कमी दराच्या मे. शैलेश कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील कामास लवकारात लवकर सुरुवात करण्यात यावी.

**विषय क्र. ५२९/१५ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा स्लम भागात १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ३,६९,९००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ३५४ दि. १४-११-९० द्वारे मंजुरी दिल्याप्रमाणे सदर कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकुण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अे. एम. फारुकी | ३०.२% कमी |
| २) | श्री. बशीरखान लालखान | २२% कमी किंवा जास्त दर्शविले नाही. |
| ३) | श्री. एस. ए. साठे | २०.२९% कमी |
| ४) | श्री. संजीव खर्डीकर | २५.८% कमी |
| ५) | श्री. एम. एम. बेग | २०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.२% कमी दराचे श्री. ऐ. एम. फारुकी यांचे टेंडर आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम भागात १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.२% कमी दराच्या श्री. ए. एम. फारुकी यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील कामास लवकरात लवकर सुरुवात करण्यात यावी.

**विषय क्र. ५३०/१६ :**

गारखेडा येथील सर्व्हे नं. ५९-६०-६५ येथे नविन वसलेल्या कॉलनीत भूमिगत गटार योजना टाकण्याच्या कामासाठी अंदाज पत्रक रक्कम रु. २०,९४,७०९/- च्या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४१ दि. २१-११-८९ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रु. १५,०२७७०/- ची निविदा प्रगट निविदा क्र. ३ दि. ०६-०२-९१ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एल. एम. पडघन | ५% अधिक |
| २) | श्री. एस. एम. मंडोरे | ४.९९% अधिक |
| ३) | श्री. पी. जे. तमखाने | १.११% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.११% कमी दराची श्री. पी. जे. तमखाने यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गंगाधर गाडे :** सदरचा प्रस्ताव २०-११-८९ ला मंजुर झालेला होता. आता एव्हढा उशीर का झाला याची माहिती द्यावी.

**उप अभियंता स्लम :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. कारण भुमिगत गटार योजना कामाचे अंदाजपत्रकाची निविदा मागविल्या असता परत एकदा रिकॉल करण्यात येऊन या प्रस्तावामध्ये आपल्या सर्वांच्या विचाराधीन ठेवण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील सर्व्हे नं. ५९-६० व ६५ येथे नविन वसलेल्या कॉलनीत भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.११% कमी दराच्या श्री. पी. जे. तमखाने याच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३१/१७ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ३ मधील (क) विभागातील जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर जलोद्यीत संडासात करण्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्र. २०/६ दि. ०२-०७-९० द्वारे श्री. बी. आर. आनंद यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे टेंडर मंजुर करण्यात आले त्यानुसार ठेकेदारांनी सदरील कामासाठी अनामत रक्कम जमा करुन करारानामाची पुर्तता केल्यानंतर दि. १०-१०-९० ला ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला. त्यानंतर ठेकेदारांशी काम सुरु करणेबाबत वारंवार पत्रव्यवहार केल्यानंतर त्याचे उत्तरी ठेकेदाराने काम सुरु करणेबाबत प्रतिसाद न दिल्यामुळे व या भागाचे नगरसेवक तसेच या योजनेसाठी इच्छुक असलेल्या नागरिकांची सदरील काम सुरु करण्याची मागणी व लोकांची गैरसोय लक्षात घेता मा. आयुक्तांनी दि. १७-०२-९१ रोजी मंजुरी दिल्यानुसार श्री. बी. आर. आनंद यांची अनामत रक्कम जप्त करुन झोन क्र. ३ मधील भाग-अ-विभागात या योजनेअंतर्गत काम करण्यासाठी स्थायी समितीने ठराव क्र. १८ दि. ०२-०७-९० द्वारे मंजुर केल्याप्रमाणे वरील काम श्री. एम. एम. बेग यांचे कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराने करुन घेणे योग्य होईल.

करीता सदर कामासाठी बी. आर. आनंद यांनी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन सदरील काम स्थायी समिती ठराव क्र. १८ दि. ०२-०७-९० अन्वये मंजुर केल्यानुसार श्री. एम. एम. बेग यांचेकडून अ. प. दरापेक्षा ०.०१% कमी दराने करुन घेण्याचे मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**उप अभियंता :** सदरील प्रस्ताव दोनदा आलेला आहे. तेव्हा वगळण्यात यावा.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव दोनदा आल्यामुळे हा प्रस्ताव विषयपत्रिकेवरुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३२/१८ :**

वार्ड क्र. ४ जयभिम नगर घाटी येथे श्री. अजिज यांच्या घरापासून ते ताज कॅफे हॉटेलपर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकण्याच्या कामाकरीता रुपये ६१५६७/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. (लांबी १९८.५० मीटर)

आदेशाप्रमाणे सदर कामाकरीता बी-१ नमुन्यात दि. २४-११-९१ रोजी (दुसरी वेळ) निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एमा. एम. बेग | २.९०% कमी |
| २) | श्री. डी. अजितसिंग | ७% जास्त |
| ३) | श्री. मझरुल हक | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९०% कमी दराचे श्री. एम. एम. बेग यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४ मो. जयभिम नगर घाटी येथे श्री. अजिम यांच्या घरापासून ते ताज कॅपो हॉटेलपर्यत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९०% कमी दराच्या श्री. एम. एम. बेग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३३ :**

वार्ड क्र. ४४ मो. समतानगर येथे आर. सी. सी. लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ५५४२०/- चे तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. (लांबी २६० मीटर)

आदेशावरुन सदर कामासाठी निविदा सुचना दि. १४-०९-९० रोजी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मे. एम. एच असोशिएटस | १२% कमी |
| २) | श्री. अन्सारी जी. एस. | २९.९२% कमी |
| ३) | श्री. गिरीश सिकची | २०.७८६% कमी |
| ४) | श्री. डी. अजितसिंग | १०% कमी |
| ५) | श्री. एस. डी. कुलकर्णी | १६% कमी |
| ६) | श्री. अन्वर अली खान | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९२% कमी दराची श्री. अन्सारी जी. एम. मुस्तबा यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४४ मो. समतानगर येथे आर. सी. सी. लाईन (ड्रेनेज) टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९२% कमी दराच्या श्री. अन्सारी जी. एम. मुस्तबा यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३४२० :**

वार्ड क्र. १९ मो. बुढीलेन येथे ३०० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत र. रु. ६४६६०/- ला मा. आयुक्तांनी अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. (लांबी २६० मीटर)

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२ दि. १४-०९-९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. डी. अजितसिंग | १०% कमी |
| २) | श्री. वसमत अलीखान | २७% कमी |
| ३) | श्री. एस. एच. असोशिएटस | १०% कमी |
| ४) | श्री. विपुल कन्स्ट्रक्शन | २१.७७% कमी |
| ५) | श्री. अन्सारी जी. एम. | ३०.८६% कमी |
| ६) | श्री. गिरीश सिकची | २०.७८६% कमी |
| ७) | श्री. बशीरखान | १८% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.७८६% कमी दराचे श्री. अन्सारी जी. एम. मुज्तबा यांचे दरपत्रक आहे. संबंधित दर यांचा दर फारच कमी असल्यामुळे त्यांना दर पुथःकरण कार्यालयात दाखल करणेस्तव पत्र देण्यात आलेले होते. तरी संबंधिताने त्यांच्या निविदा दराप्रमाणे काम करण्यास संमती दर्शविली आहे. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १९ मो. बुढीलेन येथे ३०० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.७८६% कमी दराच्या श्री. अन्सारी जी. एम. मुजताबा यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३५/२१ :**

वार्ड क्र. ३१ मो. राजाबाजार कुवार फल्ली, मोंढा लक्कड मंडी येथील गटार दुरुस्ती, ढापे टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५०,३००/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदरील कामाचे कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७/१०४/९१ दिनांक २४-०१-९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकल्या व पैकी केवळ दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बी. एम. काथार | ११% कमी |
| २) | श्री. बशीरखान | २३.५% कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.५% कमी दराची श्री. बशीरखान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३१ मो. राजा बाजार, कुवार फल्ली, मोंढा, लक्कड मंडी येथील गटार दुरुस्ती, ढापे टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.५% कमी दराची श्री. बशीरखान यांच्या निविदास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३६/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. अजबनगर वार्डामध्ये २५० वॅट एस. व्ही. फिटींग (एकूण सहा नग) बसविण्यासाठी र. रु. २०,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर खर्च संबंधित प्रभागाचे नगरसेवक श्री. विठ्ठल पेरकर यांचे स्वेच्छा निधीतून करण्यात येईल. त्यास मान्यता मिळावी.

तसेच सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता मुदतीच्या आत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून, सदर निविदा दि. १०-०१-९१ रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशील खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | ५.१% कमी |
| २) | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | १०.७६% कमी |
| ३) | मे. मुजाहेद इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | १७.७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७% कमी दराची मे. मुजाहेद इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजबनगर वार्डामध्ये २५० वॅट एस. व्ही. फिटींग एकूण सहा नग बसविण्यासाठी र. रु. २०,७००/- च्या अंदाजपत्रकास व या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७% कमी दराच्या मे. मुजाहेद इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३७/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र. ३३ विजय टी. हाऊस ते शहागंज पाण्याच्या टाकी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ९ दि. ११-०७-९० प्रमाणे र. रु. १,११,१५०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ४ दि. २३-०८-९० नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विकल्यापैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | १८% जास्त |
| २) | श्री. रे. कन्स्ट्रक्शन | १% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराची निविदा कमी दराची आहे. परंतु ठेकेदारास मनपा/बा. वि.-१/६८३/९० दिनांक १२-१२-९० रोजी पत्र देऊन वाटाघाटी करीता शहर अभियंता यांचेकडे बोलाविले असता त्यांनी

पत्राद्वारे कळविले की, रेट कमी करु शकत नाही. करीता १% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३३ विजय टी हाऊस ते शहागंज पाण्याच्या टाकीपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराच्या मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३८/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. १३ मजनुहिल येथील रशीदपुरा भागात खडी रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ९१३२०/- ला मा. आयुक्तांची दि. १६-०९-९० ला मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ६ (दुसऱ्यांदा) दि. २१-१२-९० नुसार निविदा मागविल्या असता एकूण तेरा निविदा विक्री झाल्या व पैकी श्री. एस. एच. असोशिएटस यांची अ. प. दरापेक्षा १७% कमी दराची केवळ एकच निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. कचरु नवपुते :** या प्रस्तावामध्ये एकच निविदा का आली याचा खुलासा व्हावा.
**उप अभियंता :** सदरील प्रस्तावाबाबत दोनदा निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ मजनुहिल येथील रशीदपुरा भागात खडी रस्त्या तयार करण्याच्या कामाकरीता श्री. एस. एच. असोशिएटस यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३९/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथील कब्रस्तानास संरंक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन १८८९-९० च्या दरसुचीनुसार र. रु. ९९,२४२/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च डी. पी. रोड या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता नियमानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून प्रकट निविदा मागविल्या असता एकूण अेकतीस निविदा विकल्या गेल्या होत्या व पैकी सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अे. के. अरोरा | २५% कमी |
| २) | श्री. सय्यद अर्शद | ८% कमी |
| ३) | श्री. गिरीश सिकची | २४% कमी |
| ४) | मे. एस. एच. असोशिएटस | १३% कमी |
| ५) | श्री. मौला अलीयारखान | २५% कमी |

वरील पैकी अ. क्र. १ श्री. ए. के. अरोरा व अ. क्र. ५ श्री. मौला अलीयारखान या दोघांचे निविदा पत्रकाचे दर सारखेच म्हणजे अ. प. दरापेक्षा २५% कमी दराचे आहेत. त्यामुळे त्यांना कार्यालयीन प. क्र. मनपा/बां-१/९७०/९१ दि. २१-०१-९१ अन्वये दिनांक ३१-०१-९१ रोजी दु. ३ वाजता दराच्या वाटाघाटीस्तव बोलाविले असता. श्री. मौला अलीयारखान हे गैरहजर होते. श्री. अे. के. अरोरा वाटाघाटीस हजर राहीले.

मौला अलीयारखान हे वाटाघाटीस गैरहजर राहिल्यामुळे श्री. अे. के. अरोरा याच्या अ. प. दरापेक्षा २५% कमी दराच्या निविदेस मान्यता मिळाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्लेखाना येथील कब्रस्तानास सरंक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराच्या श्री. अे. के. अरोरा यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४०/२६ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, जोहरीवाडा मंगल कार्यालयाच्या बाजुस बारुदगर नाल्यावर राममंदिराजवळ तसेच पुलाजवळ मुतारीचे बांधकाम करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ८९-९० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २१६७५/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे. सदर खर्च इमारत दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक के. साबळे | २०.५% कमी |
| २) | श्री. अब्दुल खालीद | ५% कमी |
| ३) | श्री. सय्यद सिराजुद्यीन | ०.०२५% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. अशोक के. साबळे यांचे दरपत्रक सर्वात कमी दराचे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५% कमी दराचे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जोहरीवाडा मंगल कार्यालयाच्या बाजुस बारुदगर नाल्यावर राममंदिर जवळ तसेच पुलाजवळ मुतारीचे बांधकाम करण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा २०.५% कमी दराच्या श्री. अशोक के. साबळे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४१/२७ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, औरंगपुरा भाजी मंडई येथे रोड उभारण्या करीता सा. बा. खात्याच्या सन ८९-९० च्या दरसुचीनुसार र. रु. १९७५०/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च इमारत दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता नियमानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण सहा निविदापत्रके विकल्या

गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद सिराजोद्दीन | ५% कमी |
| २) | श्री. बी. ए. काल्डा | २% कमी |
| ३) | अशोक के. साबळे | २४.७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७% कमी दराची श्री. अशोक के. साबळे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा भाजी मंडई येथे रोड उभारण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७% कमी दराच्या श्री. अशोक के. साबळे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४२/२८ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, मिटमिटा येथील समाज मंदिरा भोवती तार कुंपण करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ८९-९० च्या दरसुचीनुसार र. रु. १६४७०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता नियमानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन प्रगट निविदापत्रके मागविली असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहमंद इलियास | ८.८% कमी |
| २) | श्री. मौला अलीयारखार | ५% कमी |
| ३) | श्री. एस. एच. असोशिएटस | ९% कमी |
| ४) | श्री. स. अलीम जाफर | १६.९०% कमी |
| ५) | श्री. के. बी. काल्डा | १९.३२% कमी |
| ६) | श्री. अशोक के. साबळे | १९.२% कमी |
| ७) | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | १५.१३% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.३२% कमी दराची श्री. के. बी. काल्डा यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सदरील जागेवर कुंपण करण्याची आवश्यकता का आहे याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता बां.** : सदरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधित स्थळी समाज मंदिराच्या आजूबाजूस अतिक्रमण होत असल्याने तारेचे कुंपण करणे आवश्यक आहे. सदरचे कुंपण ३० x ३० फुटाचे असून, अतिक्रमण हे दक्षिणेकडील बाजूस होत आहे.

**मा. सभापती** : सर्वानुमते प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिटमीटा येथील समाज मंदिराभोवती तारकुंपण करण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.३२% कमी दराच्या श्री. के. बी. काल्डा यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४३/२९ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, मो. कैलास नगर येथे प्राथमिक शाळेची इमारत बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ८९-९० च्या दरसुचीनुसार र. रु. ९९,८००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च संबंधित नगरसेवक स्वेच्छा निधीतून करण्यात येईल व उर्वरीत रक्कम भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता नियमानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. संजय पी. सरवदे | ०.०१% कमी |
| २) | श्री. मे. एस. एच. असोशिएटस | ५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. संजय पी. सरवदे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** सदरच्या प्रस्तावामध्ये सदरील खर्च स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून व भांडवली खर्चातून का करतात?

**मा. सभापती** : नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतील रक्कम पुर्णपणे संपल्यास उरलेल्या रक्कमेचा खर्च हा भांडवली खर्चातून करण्यात येतो. त्यामुळे सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलास नगर येथे प्राथमिक शाळेची इमारत बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. संजय पी. सरवदे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४४/३० :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, शहाबाजार येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ८९-९० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९७,८००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च रु. ५०,०००/- हा मा. नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यात येईल व उर्वरीत खर्च भांडवली इमारती या सदरखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता नियमानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत पंधरा निविदापत्रके विक्री झाली व एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद अर्शद | ११% कमी |
| २) | श्री. सय्यद अलम जाफरी | १६.५०% कमी |
| ३) | श्री. गिरीश सिकची | २३% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची श्री. गिरीश सिकची यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहाबाजार येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराच्या श्री. गिरीश सिकची यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४५/३१ :**

पशुधन विकास अधिकारी, मनपा-औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणारे प्राणी संग्रहालय व खामदंश प्रतिबंधक योजनेकरीता सन १९९१-९२ या एक वित्तीय वर्षाकरीता खालील प्रकारच्या वस्तुंच्या/खाद्यांच्या निविदा मागविण्यात आल्या निविदा प्राप्त झालेल्या निर्दिष्ट धारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| **अ) बीफ (दरप्रति किलो )** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **हड्डीसहीत** | **बिनाहड्डी** |
| १) | शे. रहेमान शे. चाँद | रु. ४.७५ | रु. ६.७५ |
| २) | अ. गफार मे. युसुफ कुरेशी | रु. ४.९५ | रु. ६.९५ |
| ३) | अ. रहीम शे. छोटे कुरेशी | रु. ५.९५ | रु. ७.०० |
| ४) | शे. नासीर शे. इसाक | रु. ६.०० | रु. ७.५० |
| ५) | शे. अय्यज शे. अ. रहीम | रु. ६.४० | रु. ७.०० |
| ६) | म. रफिक म. युसुफ | रु. ६.९० | रु. ७.९० |
| ७) | मुसा अ. करीम | रु. ११.९० | रु. १४.०० |

वरीलप्रमाणे (७) निविदा प्राप्त झाल्या पैकी शे. रहेमान शे. चाँद रा. सिल्लेखाना यांनी दिलेले दर सर्वात कमी आहेत.

मार्केटमध्ये आजचे भाव हड्डीसहीत प्रतिकिलो रु. १२.०० व बिनाहड्डी रु. १४/- आहेत.

| **अ) मटन (दरप्रति किलो )** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **हड्डीसहीत** | **बिनाहड्डी** |
| १) | मो. खालेद | रु. २३.८० | रु. ३५.०० |
| २) | मो. फयाज मो. खाजमियाँ | रु. २७.०० | रु. २७.५० |
| ३) | अ. लतीफ | रु. ३३.३० | रु. ३६.०० |
| ४) | हनीफ मो. अय्यज | रु. ३५.०० | रु. ४०.०० |

वरील प्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री. मो. खालेद रा. हमालवाडी यांचे दर हड्डीसहीत कमी आहेत. तर मो. फय्यज यांचे बिनाहड्डीचे दर रु. २७.५०/- आहेत. (मटनाचे भाव (आजचे) हड्डीसहीत रु. ४०/- प्रतिकिलो व बिनाहड्डी रुपये ४५/- आहेत.)

| **क) मासोळी (प्रति किलोचे दर )** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **मासोळीचे प्रकार व दर** | | |
| | | फतळा | राहु | मिरगन |
| १) | सर्वश्री मुमताज अहेमद | ३०.५० | ३०.५० | ३०.५० |
| २) | शे. मजहद शे. अफसर | ३४.०० | ३२.०० | ३३.५० |

वरीलप्रमाणे (२) निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मुमताज अहेमद रा. बारुदगर नाला यांचे दर सर्वात कमी आहेत.

| **ड ) ब्रेड (दर प्रति पुडा - २५० ग्रॅम)** | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **दर रु.** |
| १) | मे. सवेरा बेकरी | रु. २.९० |
| २) | मे. एलोरा बेकरी | रु. ३.०० |
| ३) | मे. लकी बेकरी | रु. ३.१० |

वरील प्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्यापैकी मे. सेवरा बेकरी यांचे दर सर्वात कमी आहे.

| **ड ) ल्युसनघास (दर प्रति किलो)** | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **दर रु.** |
| १) | जनार्धन शेळके | रु. २.२० |
| २) | रुपचंद राजपूत | रु. २.३० |

वरील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या पैकी जनार्दन शेळके यांचे दर सर्वात कमी आहेत.

| **ई ) बाटुक (कडबी) दर प्रतिटन** | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **दर रु.** |
| १) | शे. इसाक शे. फकीर मो. | रु. १९००.०० |
| २) | शे. सरदार शे. दगडू | रु. २४००.०० |
| ३) | जनार्धन शेळके | रु. ३१५०.०० |
| ४) | पंडीत बालाजी म्हस्के | रु. ३४००.०० |

वरील प्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री. शे. इसाक शे. फकीर मो. यांचे दर सर्वात कमी आहेत. (बाटुक-कडुबी) माहे जानेवारी ते मार्च या महिल्यात उपलब्ध असते)

| फ) इतर पदार्थ | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **वर्णन** | **मे. लाहोटी प्रोव्हीजन्स** | **मे. खंडेलवाल ट्रेडर्स** | **मे. लक्ष्मी ट्रे कं.** |
| १) | हरबरे - प्रति किलो | रु. १२.०० | १२.५० | १३.०० |
| २) | मका-प्रति किलो | रु. ३.२५ | ०३.५० | ०४.०० |
| ३) | गहु प्रति किलो | रु. ०५.०० | ०५.५० | ०६.०० |
| ४) | तांदुळ प्रति किलो | रु. ५.५० | ०५.७५ | ०६.०० |
| ५) | फुटाणे प्रति किलो | रु. १७.२५ | १७.५० | १८.०० |
| ६) | शेंगदाणे प्रति किलो | रु. २०.०० | २१.०० | २२.०० |
| ७) | गुळ प्रति किलो | रु. ९.५० | ९.७५ | १०.०० |
| ८) | निरमा साबन प्रति नग | रु. २.७५ | ०२.९० | ०३.०० |
| ९) | लाइफ बॉय साबन प्रति नग | रु. ०४.७५ | ०४.९० | ०५.०० |
| १०) | रिनसोफ प्रतिनग | रु. ४.२५ | ०४.४० | ०४.५० |
| ११) | शेंगदाणा पेंड प्रति नग | रु. ८.०० | ०८.०० | ०८.०० |

एकूण प्राप्त झालेल्या निविदा (३) पैकी मे. लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे दर आयटम नं. १ ते १० सर्वात कमी आहेत तर आयटम न. ११ यांचे दर तिन्हीही निविदा धारकाचे समान आहेत. सदरील आयटम न. ११ चे दर समान असले तरी आयटम न. १ ते १० चे दर मे. लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे कमी असलेने मे. लाहोटी प्रो. यांचे कडून सर्व पदार्थाबाबत विचार व्हावा. तसेच हे पदार्थ दररोज कमी प्रमाणात लागत असलेने सदरील कमी असलेले दरात रोखीने खरेदी करण्यास मान्यता असावी.

या पदार्थाशिवाय प्राणी संग्राहालय येथे दररोज शासकीय योजनेतून दुध रु. ५.०० प्रति लिटरचे भावाने नगदीने खरेदी करण्यात येते. तसेच रॉकेल शासकीय दराने विकत घेण्यास येते. याशिवाय अमृत खाद्याचे मे. अरिहंत ट्रेडींग कं हे अधिकृत विक्रेते असल्याने अमृत खाद्या त्यांचे कडून नगदीने खरेदी करण्यात येते. सदरील पदार्थाच्या / खाद्याच्या भागात नेहमी चढउतार होत असते.

स्वयंपाकाचे गॅस अधिकृत विक्रेत्याकडून शासकीय दराप्रमाणे खरेदी करण्यात येते.

प्राण्याच्या गरजेनुसार भाजीपाला व फळे यांची खरेदी करावी लागते.

( प्राणी संग्राहालयातील जनावरांची संख्या व देण्यात येणाऱ्या खाद्याची सविस्तर माहिती सोबत जोडली आहे. )

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गंगाधर गाडे :** याबाबत असे ठरविण्यात यावे की, कमी दराचे निविदा असलेल्या गुत्तेदाराकडून त्यांचे कामाचे बाबतीत काम न झाल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी असे असावे.

**पशुधन विकास अधिकारी :** माझ्या मते संबंधित गुत्तेदाराचे कमी दराचे असलेली निविदा प्रमाणे महानगरपालिका परवडणारे नाही. कारण त्यामुळे कमी दराचे निविदा भरावयाचे आणि मंजुरीनंतर आपल्याला ताण होऊ नये यामध्ये संबंधित गुत्तेदार व त्यांचे भावांचे आपसातील तंटयामुळे एकमेकांनी दरसुची कमी

भरुन निविदा भरल्याचे समजते. याबाबत आपण योग्य तो निर्णय घ्यावा. यामध्ये सर्व खाद्य पदार्थासाठी निविदा सर्वात कमी दराचे देण्यास नकार दिल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करुन टेंडर रिकॉल करण्यात येऊन रिकॉलचे अंतीम मंजुरी होईपर्यंत जुने दराने म्हणजे (सन-१९९०-९१ चे नुसार) खरेदी करण्यात यावे.

**श्री. इकबालसिंग गील, श्री. कचरु नवपुते, श्री. मो. इस्माईल, श्री. प्रदिप जैस्वाल :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देण्यात आलेल्या निविदाचे दरप्रमाणे रु. १२/- बिफ दर. प्र. किलो व मटन दर रु. ३५/- हड्डीसहीत व बिनाहड्डीसहीत रु. १४/- बिफचे दर तर मटनाचे रु. ४० प्रति किलो दर्शविलेले आहेत. ते दर अंदाजपत्रकानुसार मंजुर करण्यात यावे नसता कमी दराचे निविदा धारकाचे दर मंजुर केल्यास ते पुरवू शकत नाही. जे निविदा रु. ४/- व रु. ५/- भरुन आले आहेत. ते पुढे बिफ व मटन पुरवू शकणार नाहीत व यामुळे महानगरपालिकेचे जनावरे उपाशी राहतील म्हणून बाजार भावाच्या जवळचे भाव असलेले निविदाधारक श्री. मुसा अ. करीम यांची निविदा मंजुर करण्यात यावी.

**मा. सभापती** : सर्व स. सभासदांच्या सुचनांचा विचार लक्षात घेता निविदा धारकश्री. मुसा अ. करीम यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते

**श्री. गंगाधर गाडे :** ज्या गुत्तेदाराने कमी दराची निविदा दाखल केली आहे. त्यानुसार मंजुरी नंतर कामे सुरळीत न झाल्यास संबंधितावर कार्यवाही व्हावी.

**मुख्य लेखा परीक्षक, उप आयुक्त :** याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. मागील वर्षी सदरील प्रस्तावाबाबत जो निर्णय झालेला आहे तोच निर्णय झालेला आहे तोच निर्णय यावर्षी सदरच्या प्रश्नाबाबत घेण्यात यावा.

**श्री. गंगाधर गाडे, श्री. गजानन बारवाल :** या प्रस्तावाबाबत दाखविण्यात आल्या प्रमाणे खाद्य पदार्थाचे बाबतीत काही नमुने घेतले आहेत का? याची माहिति द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वित्तीय वर्षाकरीता लागणारे खालील प्रकारच्या वस्तुच्या / खाद्यांच्यावर व निविदाधारक खालील प्रमाणे आहेत.

अ) बिफ दर प्रति किलो : प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री. मुसा अ. करीम यांचे दर रु. ११.९० हड्डीसहीत व रु. १४.०० बिनाहड्डीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ब) मटन दर प्रति किलो : प्राप्त निविदापैकी हनीफ मो. अय्याज यांचे हड्डीसहीत दर रु. ३५/- व बिनाहड्डी रुपये ४०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

क) मासोळी (प्रति किलोचे दर) : प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी श्री. मुमताज अहेमद रा. बारुदगरनाला यांचे दर कतला रु. ३०.५०/- राहु रु. ३०.५०/- मिरगल रु. ३०.५०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ड) ब्रेड (दर प्रति पुडा-ग्रॅम) : प्राप्त झालेल्या निविदा पैकी सर्वात कमी मे. सबेरा बेकरी यांचे रु. २.९०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

इ) ल्युसर्नघास (दर प्रति किलो) : प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी श्री. जनार्धन शेळके यांचे रु. २.२०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ई) बाटुका (कडबी) दर प्रति टन : प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी श्री. शे. इसाक शे. फकीर मो. यांचे रु. १९००/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

फ) इतर पदार्थ :

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. लाहोटी प्रोव्हीजन्स याचे एकूण ११ ॲटम खरेदी करण्यास तसेच सदरील पदार्थ दररोज कमी प्रमाणात लागत असल्याने सदरील कमी असलेले दर रोखीने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच प्राणी संग्रहालयास दररोज लागणारे साहित्य शासकीय दुध भोजनेमधून रु. ५/- प्रति लिटर भावाने खरेदी करण्यास रॉकेल शासकीय दराप्रमाणे विकत घेण्यास तसेच अमृत खाद्य मे. अरिहंत ट्रेडींग कंपनी अमृत खाद्य नगदीने खरेदी करण्यास व दररोज लागणारा भाजीपाला व फळे खुल्या बाजारातून रोखीने बाजार भावाप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

स्वयंपाकाचे गॅस अधिकृत विक्रेत्याकडून शासकीय दराप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६/३२ :**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद, यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ या वर्षाकरीता मनपा पशुचिकित्सालय बायजीपुरा व मनपा प्राणी संग्राहालयातील लागणाऱ्या जिवन रक्षक औषधी व बी. पी. ड्रग्ज, तसेच हत्यारे, अवजारे इ. करीता निविदा मागविण्यात आल्या खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा भरुन दर दिले आहेत. दिलेल्या ॲटमचे दर सर्वात कमी आहेत.

१) जिवन रक्षक औषधी (प्रोप्रायटीरी मेडीसीन)

अ) मे. नितिन एजन्सीज, औरंगाबाद ॲटम नं. १ ते २८, ३०, ३२, ३८, ४०, ४२ ते ५२, ६७ ते १०४ ( फक्त एकच निविदा प्राप्त झाली.) ॲटम नं. १०७, ते ११६ (तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी ) एकुण ८८ ॲटम

ब) मे. रॉपको फॉर्मास्युटीकल्स मुंबई - ॲटम नं. ५३ ते ६५, १०५ ते १०६, १०८ ते ११५, ११९, १२१ ते १२३ ( एकूण २६ ॲटम)

२) बी. पी. आय. पी. औषधी :

अ) फॉरमॅको फॉर्मास्युटीकल्स - ॲ. न. १ ते ३४, ३६, ३८, ते ३९, ४३, ४५ ते ५१, ५४ ते ६५, ७० ते ७३, ७५, ७९, ९१ ( एकूण ६५ ॲटम)

ब) मे. रॉपको फ्फॉर्मास्युटीकल्स ॲटम न. ३६ (फक्त एमच निविदा धारकाचे दर) ५२, ५३, ६९, ( ८०, ८१, ८२ (फक्त एकाचेच दर) एकूण (७) ॲटम्स)

क) मे. विकास फॉर्मो - मुंबई - ॲटम न. ३५ ८७, ८८, ८९ फक्त एकाच निविदा धारकाचे दर) एकूण चार ॲटम)

३) हत्यारे व अवजारे :

अ) मे. मरीन सर्जिकल कंपनी औरंगाबाद - अ. नं. १ ते २३, २५ ते ३७ (एकूण ३६ आयटम्स)

ब) मे. स्वास्तीक इंडस्ट्रीज, औरंगाबाद. ॲटम नं. २४ (फक्त एक) प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९०-९१ या वर्षाकरीता मनपा पशु चिकित्सालय, बायजीपुरा व मनपा प्राणी संग्राहलयाकरीता लागणाऱ्या जिवन रक्षक औषधी व बी. पी. ड्रग्ज

तसेच हत्यारे अवजारे इ. करीता निविदा धारकाच्या निविदाचे दरानुसार त्यांच्या ॲटमनुसार दरास

१) जिवन रक्षक औषधी (प्रोप्रायटीरी मेडीसीन)

अ) मे. नितिन एजन्सीज, औरंगाबाद ॲटम नं. १ ते २८, ३०, ३२, ३८, ४०, ४२ ते ५२, ६७ ते १०४ ( फक्त एकच निविदा प्राप्त झाली.) ॲटम नं. १०७, ते ११६ (तुलनात्मकदृष्टया तक्त्याप्रमाणे सर्वात कमी ) एकुण ८८ ॲटम्स

ब) मे. रॉपको फॉर्मास्युटीकल्स मुंबई - ॲटम नं. ११८, १२० (फक्त २ ॲटम्स)

क) फॉर्म्याको फॉर्मास्युटीकल्स - ॲटम नं. ५३ ते ६५, १०५ ते १०६, १०८ ते ११५, ११९, १२१ ते १२३ ( एकूण २६ ॲटम)

२) बी. पी. (आय. पी.) औषधी

ब) रॅपको फॉर्मास्युटीकल्स : ॲटम न. ३७ (फक्त एका निविदा धारकाचे दर) ५२, ५३, ६९/८०, ८१, ८२ फक्त एकाचेच दर) एकूण सात ॲटम्स

अ) फार्माको फॉर्मास्युटीकल्स, औरंगाबाद - १ ते ३४, ३६, ३८, ते ३९, ४२, ४३, ४५ ते ५१ ते ६५, ७० ते ७३, ७५, ७९, ९१ (एकूण ६५ ॲटम्स)

क) विकास फार्मा, मुंबई ॲ. नं. ३५ ८७, ८८, ८९ फक्त एका निविदा धारकाचे दर) एकूण चार ॲटम)

३) हत्यारे व अवजारे :

अ) मे. मॉरीन सर्जिकल, औ. बाद. ॲ. नं. १ ते २३, २५ ते ३७ एकूण ३६ ॲटम)

ब) मे. स्वास्तीक इंडस्ट्रीज, औरंगाबाद ॲटम नं. २४ (फक्त एक)

वरील दर्शविलेल्या ॲटमला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.
याच बरोबर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०-०३-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त शनीवार दिनांक ३०-०३-१९९१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता समिती सभागृह येथे मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. जैस्वाल प्रदिपकुमार
२) श्री. नवपुते कचरु चंद्रभान
३) श्री. मगर शंकर जिजाराम
४) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
५) स. अ. एकबालुद्यीन स. मो. कुतुबुद्यीन
६) श्री. फय्याजखान अहमदखान
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. मो. इस्माईल अ. करीम
९) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
१०) श्री. सोनवणे केशव काशीनाथ

**विषय क्र. ५४७/१ :**

दिनांक ३०-०३-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती** : दि. ३०-०३-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ३०-०३-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४८/२ :**

उप अभियंता जलनि:सारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोडचे दक्षिणेस ते बनेवाडी पर्यंत चैन क्र. ५४०० ते ६८०० व चैन नं.००.०० ते १७७० पर्यंत (पार्ट III) येथे मुख्य सेवर लाईन टाकण्याचे शासनाचे विशेष अनुदान अंतर्गत कामासाठी चौथ्या वेळसे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतीम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस दोन निविदा प्राप्त झाल्या व त्या प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एम. मंडोरे | ४५% अधिक |
| २) | श्री. एल. एम. पडघन | ३५% अधिक |

तुलनात्मकदृष्टया श्री. एल. एम. पडघन यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३५% कमी

करीता श्री. एल. एम. पडघन यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३५% जास्त दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. प्रभाकर विधाते :** सविस्तर खुलासा व्हावा.

**उप अभियंता ग. व. सु. :** एम. आ. टी. कॉलेजच्या जवळून जो नाला आहे. त्यालगत सदरील मुख्य सेवर लाईन टाकण्याचे शासनाचे विशेष अनुदान अंतर्गत कामे करावयाचे असून, दोन वेळेस रिकॉल करुनही व तिसऱ्या वेळेसही रिकॉल करण्यात आलेले होते. परंतु चौथ्या वेळेस प्रगट निविदा मागविण्यात आल्या आहेत. यामध्ये अंदाजपत्रकीय र. रु. २०,६४,६३०/- इतके दाखविण्यात आलेले आहे.

**श्री. प्रदिप कुमार जैस्वाल :** संबंधित फाईल दाखविण्यात यावी.

**श्री. कचरु नवपुते :** पाईप लाईन जात असलेली जागा सरकारी आहे का?

**उप अभियंता ग. व. सु. :** पाईप लाईन ज्या ठिकाणा वरुन जात आहे. त्या ठिकाणापासून ड्रेनेज लाईन आहे आणि शासनाची योजने अंतर्गत सदरील कामे होणार आहेत.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोडचे दक्षिणेस ते बनेवाडी पर्यंत चैन क्र. ५४०० ते ६८०० व चैन नं. ००.०० ते १७७० पर्यंत (पार्ट III) येथे मुख्य सेवर लाईन टाकण्याचे शासनाचे विशेष अनुदान अंतर्गत कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५% जास्त दराचे गुत्तेदार श्री. एल. एम. पडघन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४९/३ :**

उप अभियंता शासकीय जलनिःसारण कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजी मार्केट जवळील नाल्या लगत संरक्षण भिंत (रिटर्निंग वॉल) बांधण्यासाठी शासनाने मान्यता दिल्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु. ३,७४,६५०/- ला मा. आयुक्तांनी, महानगरपालिका, यांनी दि. ०६-०२-९१ ला मंजुरी देऊन सदरील कामासाठी टेंडर मागविण्याचे आदेश दिल्यानुसार या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ३ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत (१६) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (८) निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. एच. असोशिएटस | २४.९९% कमी |
| २) | श्री. एस. ए. नवाब | १९.१३% कमी |
| ३) | श्री. आर. एल. बारवाल | ४.९९% जास्त |
| ४) | श्री. महंमद सलीम | २६.७८६% कमी |
| ५) | श्री. मौला अलीयार खान | २२.०१% कमी |

६) श्री. पी. जे. तमखाने ५५% कमी
७) श्री. कैसर खॉन २२.७८६% कमी
८) श्री. एम. एम. बेग ०१.०५% कमी

तुलनात्मकदृष्टया श्री. महंमद सलीम यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६.७८६% कमी आहे. करीता श्री. महंमद सलीम यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६.७८६% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा भाजी मार्केट जवळील नाल्या लगत संरक्षण भिंत (रिटर्निंग वॉल) बांधण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ३,७४,६५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८६% कमी दराचे श्री. महंमद सलीम (गुत्तेदार यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५०/४ :**

उप अभियंता, शासकीय जलनिःसारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, रोझाबाग स्लम भागात आर. सी. सी. एन.पी-२ क्लास पाईपची लॅटरल व ब्रँचेस ड्रेनेज लाईन (शासनाचे विशेष-कार्यक्रमा अंतर्गत) टाकण्याचे कामासाठीचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त महानगरपालिका यांनी दि. ०६-०२-९१ रोजी मंजुरी देवून टेंडर मागविण्याचे आदेश दिल्याप्रमाणे सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. ३ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (१४) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस (८) निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) श्री. पी. पी. मेहता २५.९% कमी
२) श्री. एम. एम. बेग १५.२१% कमी
३) श्री. एस. ए. नवाब १३.१३% कमी
४) श्री. आर. एल. बारवाल ४.४% कमी
५) श्री. बी. अे. काल्डा २५.२५% कमी
६) श्री. महंमद सलीम २६.७८६% कमी
७) श्री. कैसर खान २०.७८६% कमी
८) श्री. पी. जे. तमखाने १३.३३% कमी

तुलनात्मकदृष्टया श्री. महंमद सलीम यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८६% कमी आहे. करीता श्री. महंमद सलीम यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८६% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोझाबाग स्लम भागात आर. सी. सी. एन. पी-२ क्लास पाईपची लॅटरल व ब्रेचेस ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रके दरापेक्षा २६.७८६% कमी दराचे गुत्तेदार श्री. महंमद सलीम यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५१/५ :**

उप अभियंता, स्लम, यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला चिकलठाणा स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत १७० घरा करीता श्रेणी वाढ योजना राबविणे करीता मनपा सर्वसाधारण सभा क्र. ६७/९ दि. ०४-१०-९० अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामाकरीता कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ दि. २४-०१-९१ अनुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे दि. ३१-०१-९१ पर्यंत एकूण तीन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकृतीचे दि. ०६-०२-९१ ला फक्त दोन (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एल. एम. पडघन | ३५% अ. प. पेक्षा जास्त |
| २) | श्री. कुलवंतसिंग | ४०% अ. प. पेक्षा जास्त |

निविदा उघडल्यानंतर त्यात तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५% जास्तची निविदा श्री. एल. एम. पडघन यांची निविदा आहे.

परंतु ठेकेदाराने निविदेत भरलेले दर हे बरेच जास्त वाटत असल्यामुळे आदेशाप्रमाणे ठेकेदारास दर कमी करण्याकरीता समक्ष चर्चे करीता कार्यालयाचे पत्र क्र./मनपा/स्लम/१५२/९१ दि. १८-०२-९१ ला बोलावले असता ठेकेदाराने दि. २५-०३-९१ रोजी पत्र देऊन सदर काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी संमती दिली आहे. ज्याची तुलना १९९०-९१ चे दरसुची बरोबर केली असता हे दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९.२८% जास्त येतात.

तरी श्री एल. एम. पडघन यांचे टेंडर त्यांनी लेखी संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% अ. प. पेक्षा जास्त असलेली निविदा स्विकारणेस प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. चिकलठाणा स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत १७० घराकरीता श्रेणी वाढ योजना राबविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% जास्त दराचे श्री. एल. एम. पडघन " गुत्तेदार " यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५२/६ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल फुले नगर स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत ६० घरांकरीता श्रेणी वाढ योजना राबविणे करीता मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६७/९ दि. ०४-१०-९० अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२ दि. २४-०१-९१ अनुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे दिनांक ३१-०१-९१ पर्यंत (२) दोन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या निविदा स्विकृतीचे दिनांक ०६-०२-९१ ला फक्त दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एल. एम. पडघन | ३५% अ. प. पेक्षा जास्त |
| २) | श्री. एस. बी. इंगळे | ४०% अ. प. पेक्षा जास्त |

निविदा उघडल्यानंतर त्यात तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५% जास्त दराची श्री. एल. एम. पडघन यांची निविदा आहे.

परंतू सदर ठेकेदराने निविदेत भरलेले दर हे बरेच जास्त वाटत असल्यामुळे आदेशाप्रमाणे ठेकेदारास दर कमी करण्यासाठी समक्ष चर्चे करीता कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/स्लम/१५२/९१ दि. १८-०३-९१ ला बोलावले असता ठेकेदाराने दि. २५-०३-९१ रोजी पत्र देऊन सदर काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% जास्त दराने करण्यास तयार असल्याचे लेखी संमती दिली आहे. ज्याची तुलना १९९०-९१ चे दरसुची बरोबर केली असता हे दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९.२८% जास्त (आहे.) येतात.

तरी श्री. एल. एम. पडघन यांचे टेंडर त्यांनी लेखी संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकापेक्षा २१% जास्त दराची असलेली निविदा स्विकारण्याच्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मो. इस्माईल :** निविदा मागविल्यानंतर आपणं दराची निश्चिती केली?

**उप अभियंता ग. व. सु. :** प्रत्येक घरोघरी जाऊन सर्व्हे करण्यात येऊन त्यांचे उत्पन्नाची वार्षीक मर्यादा पाहुन त्यानंतर आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या घटकांसाठी सदरील योजना शासनातर्फे राबविण्यात येणार आहे.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल (फुले नगर) स्लम भागात नेहरु योजने अंतर्गत ६० घरांगकरीता श्रेणी वाढ योजना राबविणेचे कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% जास्त दराचे गुत्तेदार श्री. एल. एम. पडघन यांनी लेखी संमती दिल्यानुसार त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५३/७ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केली की, नारेगांव स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत १०० घरांकरीता श्रेणी वाढ योजना राबविणेकरीता मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६७/९ दि. ०४-१०-९० अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामाकरीता कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ दि. २४-०१-९१ अनुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे दिनांक ३१-०१-९१ पर्यंत एकूण (२) दोन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकृतीचे दि. ०६-०२-९१ ला फक्त (२) दोन निविदा खालील प्रमाणे दर भरलेल्या प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. बी. इंगळे | ३२.४०% अ. प. दरापेक्षा जास्त |
| २) | श्री. एल. एम. पडघन | ३५% अ. प. दरापेक्षा जास्त |

निविदा उघडल्यानंतर त्यात तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.४०% जास्त दराची श्री. एस. बी. इंगळे यांची निविदा आहे.

परंतु ठेकेदाराने निविदेत भरलेले दर हे बरेच जास्त वाटत असल्यामुळे आदेशाप्रमाणे ठेकेदारास दर कमी करणे करीता समक्ष चर्चे करीता कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/स्लम/१५३/९१ दि. १८-०३-९१ अनुसार बोलावले असता ठेकेदाराने दि. २५-०३-९१ रोजी पत्र देऊन सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा २१% जास्त दराने करण्यास लेखी संमती दिली आहे. ज्याची १९९०-९१ चे दर सुचीशी तुलना केली असता अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९.३% जास्त येतात.

तरी श्री. एस. बी. इंगळे यांचे टेंडर त्यांनी लेखी संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% जास्त दराची असलेली टेंडर स्विकारण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. नारेगांव स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत १०० घरांकरीता श्रेणी वाढ योजना राबविणे करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% जास्त दराचे गुत्तेदार श्री. एस. बी. इंगळे यांचे निविदा पत्रकास (त्यांनी लेखी संमती दिल्यानुसार) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५४/८ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, बुढ्ढीलेन येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी र. रु. ४९८०२=०० च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त याची मंजुरी झाली आहे. सदरचा खर्च नगरसेवक स्वेच्छा निधीतून करण्यात येणार आहे.

सदर कामाकरीता प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदा वसुल झाल्या. वसुल झालेल्या निविदा उघडण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल सलाम | २.९५% जास्त |
| २) | श्री. कैसरखान | ६.९५% जास्त |
| ३) | श्री. अशोक साबळे | ४.६०% जास्त |

श्री. अब्दुल सलाम यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९५% जास्त आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुढ्ढीलेन येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९५% जास्त दराचे गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५५/९ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्थायी समिती ठराव क्र. २७२/१ दि. २९-०९-८९ नुसार (४) स्मशान ज्योगांची नेमणूक ठरावीक वेतन रु. ३००/- प्रति माह वर करण्यात आली होती. सदर स्मशान ज्योगी यांचे विनंती अर्जावरुन तसचे सहयांची महागाई लक्षात घेता त्यांचे ठरावीक वेतनामध्ये रु. ३००/- ऐवजी रु. ४५०/- मासीक प्रमाणे वाढ करण्याचे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समिती ठराव क्र. २७२/१/ दि. २९-०९-८९ नुसार नियुक्त केलेल्या (४) स्मशान ज्योगी यांना प्रवि माह देण्यात येणारे वेतन रुपये ३००/- व स्मशाल ज्योगी यांचे विनंती अर्जानुसार तसेच सध्याची महागाई लक्षात घेता ठरावीक वेतनात रु. ३००/- ऐवजी रुपये ४५०/- मासीक प्रमाणे वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५६/१० :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांचे मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केली की, श्री. अजय कचरु पवार यांनी सहजिवन कॉलनी आणि सिल्लेखानाकडे जाणाऱ्या रस्त्या लगतची मोकळी जागा भाडे पट्टयाने मिळणेबाबतची मागणी केलेली आहे.

सदरची ठिकाणची सहाय्यक संचालक नगर रचना ठरवून देतील त्या दराने व जागेची उपलब्धता पाहुन कार्यालय ठरवील तेव्हढी जागा मा. आयुक्त ठरवतील त्या अटी-शर्तीवर श्री. अजय कचरु पवार यांना ११ महिन्याच्या करारासाठी भाडे पट्टयाने देणे बाबत निर्णय होणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** प्रस्तावातील जागा भाडेपट्‌टयाने कशी देणार याची माहिती द्यावी.
**श्री. प्रदिपकुमार जैस्वाल :** १० वर्षासाठी जागा भाडेपट्टयाने देणेसाठी सर्वानुमते विचार व्हावा.
**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहजिवन कॉलनी आणि सिल्लेखानाकडे जाणाऱ्या रस्त्यालगतची मोकळी जागा सहाय्यक संचालक नगर रचना ठरवून देतील त्या दराने जागेची उपलब्धता पाहुन कार्यालय ठरविल एव्हढी जागा व मा. आयुक्त ठरवतील त्या अटी शर्तीवर श्री. अजय कचरु पवार यांना १० वर्षाचे काळासाठी भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. १३ युनूस कॉलनी, मुजीब कॉलनी व गायके ते आऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतच्या कामासाठी र. रु. १,३७,४२०/- ला मा. आयुक्त यांची मंजुरी दि. १६-०९-९० ला मिळाले आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ८/दुसऱ्यांदा जा. क्र. मनपा/बां. वि.-१/१८८/९१ दि. १५/०१/९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या पैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ३०-०१-९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गरुनानक इंडस्ट्रीज | ३०% जास्त |
| २) | श्री. रे. कन्स्ट्रक्शन | १६% जास्त |

वरीलपैकी अ. क्र. २ श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% जास्त दराची निविदा आहे. परंतु रे. कन्स्ट्रक्शन यांना जा. क्र. मनपा/बां. वि.-१/११०८/९१ दि. १८/०३/९१ रोजी निविदाच्या दराबाबत वाटाघाटी करीता बोलविले असता त्यांनी लेखी कळविले आहे की, १६% जास्त दराएवेजी १४.५% जास्त दराने काम करण्यास सहमती दिली आहे. निविदा सन ८८-८९ च्या दराने मागविल्या होत्या. गुत्तेदाराचे दर ९०-९१ च्या दरसुची प्रमाणे (चालु वर्षाप्रमाणे) तुलना केली असता ३.७१% कमी आहेत. गुत्तेदाराचे १४.५% जास्त निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ युनुस कॉलनी, मुजीब कॉलनी व गायकेने आऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.५% जास्त दराचे गुत्तेदार श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती या दराने काम करण्यास संमती दिल्यानुसार त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५८/१२ :**

वार्ड क्र. ५७ मो. ज्योती नगर ते जयनगर पर्यंत २५० व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ९८१५०/- चे तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील लाईनची लांबी ५५० मीटर आहे.

आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९/७३५/९० दिनांक १४-०८-९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी केवळ पांच निविदा वसूल झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मुस्ताक अहेमद | २७.१०% कमी |
| २) | श्री. सी. बी. आनंद | २४.९०% कमी |
| ३) | श्री. अजितसिंग | १०% कमी |
| ४) | श्री. बी. आर. आनंद | ३०.९९% कमी |
| ५) | श्री. एम. एम. बेग | १७.५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.९९% कमी दराचे श्री. बी. आर.आनंद यांचे दरपत्रक आहे.

सदरील निविदेस स्थायी समितीचा ठराव क्र. ३६०/३० दि. २१-१२-९० नुसार मंजुरी मिळाली आहे. परंतु बी. आर. आनंद यांचे कामाची गुणवत्ता बरोबर नसल्याने दुसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार श्री. मुस्ताक अहेमद असून त्याचे दर २७.१०% कमी आहे. मा. आयुक्त साहेबांनी यांच्या दरपत्रकास शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५७ मो. ज्योतीनगर ते जयनगर पर्यंत २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.९९% कमी दराचे गुत्तेदार श्री. बी. आर. आनंद यांचे निविदापत्रक आहे. परंतु श्री. बी. आर. आनंद यांचे कामाची गुणवत्ता बरोबर नसल्याने दुसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार श्री. मुस्ताक अहेमद यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१०% कमी दराचे निविदापत्रकास मा. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५९/१३ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, बनेवाडी येथील पंपहाऊसला संरक्षित भित बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,८८,९२=०० च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ७६४/३९/ दि. २४-०४-९० अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामाकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सोळा निविदा विक्री झाल्या. व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या प्राप्त झालेल्या निविदा ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद रफियोद्यीन | २६.१०% कमी दराने |
| २) | श्री. मो. मुस्ताक अहेमद | २५.१०% कमी दराने |
| ३) | श्री. सुनिल जैस्वाल | २३.९९% कमी दराने |
| ४) | श्री. शकील बिल्डर्स | २२.५१% कमी दराने |
| ५) | श्री. मोहमंद सलीम | २१.००% कमी दराने |
| ६) | श्री. एस. एच. असोशिएटस | १९.००% कमी दराने |
| ७) | मे. पॉल कन्स्ट्रक्शन | ९.७८६% कमी दराने |

तरी श्री. सय्यद रफिमोद्यीन यांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१०% कमी दराचे निविदा मंजुरीस्तव सादर. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बनेवाडी पंप हाऊसला संरक्षित भित बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१०% कमी दराचे गुत्तेदार श्री. सय्यद रफियोद्यीन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६०/१४ :**

जलगृह अभियंता-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, कर्णपुरा येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणेस्तव १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेचे कामासाठी र. रुपये १,२१,५७०/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले असून, जिल्हा नियोजन व विकास मंडळ (डी. पी. डी. सी.) मार्फत " जनतेला उपयुक्त अशी लहान लहान कामे घेण्याच्या कार्यक्रमांतर्गत सन १९९०-९१ चे वर्षा करीता करावयाचे आहे. दि. ०१-०२-१९९१ चे मा. जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रकानुसार उपरोक्त कामासाठी एकूण रक्कम रु. १,२१,५६७/- चे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच या कामास मा. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांची मान्यता घेण्यात आली आहे.

मनपा/पापु/५२/९१ दि. १३-०२-९१ अन्वये जाहिर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांकास एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांकास एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्यातील दर पुढीलप्रमाणे आढळले.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पंजनानी पी. एच. | ००.४२% कमी दराने |
| २) | श्री. फारुकी ए. एम. | ०४.९०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची ००.४२% कमी दराची, ठेकेदार श्री. पंजनानी पी. एच. याची आहे.

करीता र. रु. १,२१,५६७/- चे अंदाजपत्रकाचे खर्चास तसेच ठेकेदार श्री. पी. एच. पंजनानी याची ००.४२% कमी दराची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कर्णपुरा येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणेस्तव १०० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकणेचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,२१,५६७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.४२% कमी दराचे गुत्तेदार श्री. पंजनानी पि. एच. याचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६१/१५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३७ मधील मो. इंदिरानगर येथे १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकणेचे कामासाठी र. रु. २,२५,०००/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले असून, जिल्हा नियोजन व विकास मंडळ (डी. पी. डी. सी.) मार्फत जनतेला उपयुक्त अशी लहान लहान कामे घेण्याच्या कार्यक्रमांतर्गत सन १९९०-९१ चे वर्षाकरीता करावयाचे आहे. दि. ०१-०२-१९९१ चे मा. जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रकानुसार सदरील कामाचे रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

तसेच या कामास मा. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांनी मान्यता दिलेली आहे.

मनपा/पापु/५२/९१ दि. १३-०२-९१ अन्वये जाहरी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांकास एकूण (४) चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांकास एकूण चार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या उपस्थितासमोर उघडण्यात आल्या असता त्यातील दर पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद अथर अली | ०१.००% कमी |
| २) | मो. इसाक मो. हुसेन | ०२.००% जास्त |
| ३) | फारुकी ए. एम. | ०५.००% जास्त |
| ४) | पी. एच. पंजनानी | १०.००% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कंत्राटदार श्री. सय्यद अथर अली यांची निविदा सर्वात कमी दराची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०१.००% कमी दराचे आहे.

करीता र. रु. २२,५०००/-चे अंदाजपत्रकाचे खर्चास व श्री. सय्यद अथर अली यांचे ०१.००% कमी दराची निविदा स्विकारणे बाबतचे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३७ मधील मो. इंदिरनगर येथे १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकणेचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. २,२५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०१.००% कमी दराचे कंत्राटदार श्री. सय्यद अथर अली यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६२/१६ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १ मधील मो. भावसिंगपुरा स. न. २६ येथे ८० मी. मी. व्यासाची व १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकणेचे कामाचे र. रु. १,७७,५००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीचे ठराव क्र. १९/दि. २९-०६-८८ अन्वये मंजुरी मिळाली आहे. रितसर निविदा मागविण्या आल्या

असता सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार श्री. एस. पी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दराची असून, निविदेस स्थायी समितीचे ठराव क्र. १७३/७ दि. २५-०८-८९ अन्वये मंजुरी मिळाली आहे.

तसेच सुधारीत अंदाजपत्रकातील मनपा/पापु/का अ/३०५९/८९ दि. ३०-११-८९ अन्वये एस. बी. साधवानी यांना कार्यादेश देण्यात आला असून, उपरोक्त कामाचे प्रथम दरम्याने देयक ठेकेदारास अदाई करण्यात आले आहे.

मुळ अंदाजपत्रकात ८० मी. मी. व्यासाचे अे. सी. पाईप वापरण्याचा अंतर्भाव होता. परंतु ८० मी. मी. व्यासाचे पाईपचे उत्पादन बंद झाल्यामुळे ८० मी. मी व्यासाचे पाईप ऐवजी १०० मी. मी. व्यासाचे पाईप सदरील ठिकाणी वापरण्यात येणार आहेत.

सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २,२५,४९५/- चे तयार करण्यात आले आहेत.

सुधारीत अंदाजपत्रकामुळे मुळ अंदाजपत्रकापेक्षा रु. ४७,९९५/- इतकी वाढ होणार आहे.

सुधारीत अंदाजपत्रक सन १९८९-९० च्या परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची तयार करण्यात आले आहे. सुधारीत अंदाजपत्रकातील वाढीव काम पुर्वीचेच कंत्राटदार श्री. एस. बी. साधवानी यांचे मार्फतच करुन घेण्यात येईल.

करीता सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २,२५,४९५/- चे खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १ भावसिंगपुरा येथील स. न. २६ येथे ८० मी. मी., १०० मी. मी. व १५० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता लागणारे ८० मी. मी. व्यासाचे अे.सी. पाईपचे उत्पादन बंद झाल्यामुळे त्याऐवजी १०० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी वापरल्यामुळे यापुर्वी मंजुर करण्यात आलेल्या र. रु. १,७७,५००/- च्या मुळ अंदाजपत्रकात र. रु. ४७,९९५/- ची वाढ झाल्यामुळे तयार करण्यात आलेल्या वरील कामाचे र. रु. २,२५,४९५/- चे सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वाढीव काम पुर्वीचेच कंत्राटदार, श्री. एस. बी. साधवानी यांचेकडून त्यांच्या निविदाच्या मंजुर दराने पुर्ण करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६३/१७ :**

जलगृह अभियंता-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३७ चे सं, नगरसेवक, शंकर मगर यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीमधून इंदिरानगर भागात विहिरीवर पाणबुडे पंप बसवून देणेबाबत विनंती केली आहे.

सदरचे विहिरीवर बजाज पंप कंपनीचे ५ हॉर्स पावरचा पाणबुडे पंप बसविण्याचे गृहीत धरण्यात आले आहे. सदरील भागात सध्या पाण्याची टंचाई भासत असल्या कारणाने विहिरीवर पंप बसविल्यानंतर पाणीपुरवठा करणे सोपे होईल व या भागातील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

करीता या ठिकाणी एक ५ हॉर्स पॉवरचा पानबुडे पंप बसविण्याचे र. रु. १९,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. २४-०३-१९९१ रोजी अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

सदरील काम तातडीचे स्वरुपाचे असल्या कारणाने बजाज कंपनीच्या स्थानिक अधिकृत विक्रेत्याकडून कंपनीचे दरसुची अनुसार सदरील पाणबुडे पंप बसविण्यास परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३७ इंदिरानगर भागात विहिरवर नगर सेवक स्वेच्छा निधीमधून बजाज कंपनीचा ५ हॉर्स पॉवरचा पाणबुडा पंप बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १९,९००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील भागात सध्या पाण्याची टंचाई भारत असल्याकारणाने व सदरील काम तातडीच्या सवरुपाचे असल्याकारणाने बजाज कंपनीच्या स्थानिक अधिकृत विक्रेत्याकडून कंपनीचे दरसुची अनुसार सदरील पाणबुडा पंप बसविण्यास सर्वानुमते (मंजुरी) परवानगी देण्यात येते.

**विषय क्र. ५६४/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. १ पडेगांव येथे रामगोपाल नगर गट क्र. ४० येथे खडी रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ५१,२४०/- ला मा. आयुक्त यांची दि. १८-०८-९० ला मंजुरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा प्रथम/निविदा क्र. ५/जा. क्र./मनपा/बां.वि-१/८५१९ दि. २६-०९-९० रोजी मागविल्या असता एकूण बारा निविदा विकल्या गेल्या पैकी सात निविदा दर भरून प्राप्त झाल्या पैकी सर्वात कमी श्री. एस. एच. असोशिएटस यांची निविदा ३३% कमी दराची होती. हे दर काम करण्यायोग्य नसल्याकारणाने पुन्हा निविदा (दुसरी वेळ) मागविण्यात आल्या. परंतु नजर चुकीने प्रथम मागविलेल्या निविदेचा प्रस्ताव पाठविण्यात आल्यामुळे श्री. एस. एच. असोशिएटस यांची निविदा स्थायी समिती बैठक दि. १६-०३-९१ रोजी ठराव क्र. ४७२/१८ प्रमाणे मंजुरी मिळाली आहे.

करीता दुसऱ्यांदा जा. क्र. मनपा/बांध वि-१/९७९६/९१ दि. २१-१२-९० रोजी दुसऱ्यांदा निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण बारा निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी तीन निविदा दरभरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ०९-०१-९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल वहिद कुरेशी | १५.७८६% कमी |
| २) | श्री. गिरीश सिकची | २२.०१% कमी |
| ३) | श्री. एस. एच. असोशिएटस | २१% कमी |

करीता श्री. एस. एच. असोशिएटस यांचे दरपत्रकाऐवजी दुसऱ्यांदा मागविलेले दरपत्रक श्री. गिरीश सिकची यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी प्रमाणे ठराव क्र. ४७२/१८ रद्द करुन नविन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १ पडेगांव येथे रामगोपाल नगर गट क्र. ४० येथे खडी रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी दराचे गुत्तेदार श्री. गिरीश सिकची यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६५/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वे स्टेशन येथील गेस्ट हाऊस जवळील अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका कर्मचारी निवास्थनाचा विस्तार करण्याच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु.

२,९८,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेचा प्रस्ताव दि. १६-०१-९१ च्या सभेमध्ये विषय क्र. ११ अन्वये मंजुरीसाठी व विचारार्थ प्रस्तावित करण्यात आला होता. परंतु सदरील सभेमध्ये विषय क्र. ४०६/११ अन्वये असे ठरले की, प्रस्तावात दर्शविलेल्या कामाची स्थळ पाहणी करण्यात येईल व त्यानंतर विषयास मंजुरी देण्यात येईल. त्या अनुषंगाने हा विषय काहीही निर्णय न घेता. विचाराधीन होता. तरी रेल्वे स्टेशन येथील गेस्ट हाऊस जवळील अस्तित्वात असलेल्या मनपा कर्मचारी निवास्थानाचा विस्तार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. २,९८,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रस्ताव पुन्हा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन येथील गेस्ट हाऊस जवळील अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका कर्मचारी निवास्थानाचा विस्तार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. २,९८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६६/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. उल्का नगरी येथील खडी रस्ते तयार करण्याचे कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ४१,९००/- च्या अंदाजपत्रकास दि. २६-१२-९० ला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

सदरील काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९/१९९०-९१ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे नियोजीत दि. ०८-०९-९१ पर्यंत एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दि. ११-०१-९१ ला एकूण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | २५% कमी दराने |
| २) | श्री. गिरीश सिकची | २५% कमी दराने |
| ३) | श्री. अब्दुल सलाम | १६.९५% कमी दराने |
| ४) | श्री. मौला अलियार खॉन | ५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% कमी दराचे श्री. सुखबीरसिंग व श्री. गिरीश सिकची या दोन ठेकेदाराचे दर समसमान आलेले आहेत. म्हणून दोघा ठेकेदारांना पत्राद्वारे दर वाटाघाटासाठी बोलावले असता श्री. गिरीश सिकची यांनी दिलेले मुदतीमध्ये कसलाही खुलासा केल्या नसल्यामुळे श्री. सुखबीरसिंग यांनी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे २५% कमी दराने काम करण्यासाठी लेखी अनुमती दिलेली आले.

करीता श्री. सुखबीरसिंग यांनी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे २५% कमी दराने लेखी संमती दिल्यानुसार त्यांची निविदा स्विकारण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. उल्का नगरी येथील खडी रस्ते तयार करण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराचे गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग यांचे निविदापत्रकास सविस्तर वाटाघाटी अंती त्यांनी काम करण्यास लेखी संमती दिल्यानुसार त्यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५६७/२१ :**

औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ५४ कडबा मार्केट या आरक्षणाखालील नगरभुमापन क्र. १२,९५९ एकूण क्षेत्र ५२५९.६० चौ. मीटर पैकी क्षेत्र ४०५३.४० चौ. मिटर जमिनीचा अंतिम निवाडा विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांनी दि. २०-०१-८४ रोजी घोषीत केला त्यानुसार ४०५३.४० चौ. मी. साठी मोबदल्याची रक्कम श्री. हसनखॉ हमिदखॉ यांना देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या ताब्यात वरील क्षेत्रा व्यतिरिक्त १२०६.२ चौ. मिटर जमिन जास्त आहे. त्या जागेवर महानगरपालिकेने कडबा कटरसाठी जागा भाडयाने दिलेल्या आहेत. जमिनमालक श्री. हसनखॉ हमिदखॉ यांनी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली न. भु. क्र. १२९५९ पैकी जास्तीची जमिन क्षेत्र १२०६.२ चौ. मिटर जागेचा मोबदला मागितला आहे. सदरची जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेतल्यास मुल्यांकन करुन र. रु. १,२४,१५०/- मोबदल्याची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. तेंव्हा सदर मिळकत नोंदणीकृत दस्तऐवजाने ताब्यात घेऊन जमिन मालकास मोबदल्याची रक्कम अदा करण्यास प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. नोंदणीसाठी येणारा खर्च इतर प्रकरणात ५०% टक्के जमिन मालकाने व ५०% टक्के महानगरपालिकेने केल्याप्रमाणे यादी प्रकरणात करणे योग्य होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ५४ न. भु. क्र. १२९५९ चे एकूण क्षेत्रफळ ५२५९.६० चौ. मिटर पैकी यापुर्वी संपादन करण्यात आलेल्या ४०५३.४० चौ. मिटर जागा संपादीत केली होती. परंतु प्रत्यक्षात महानगरपालिकेने वरील संपादीत क्षेत्रा व्यतिरिक्त १२०६.२० चौ. मिटर जास्तीची जागा संपादीत केली. जास्तीचे संपादन करण्यात आलेल्या जागेचा मोबदला श्री. हसनखॉ हमिदखॉ या जागा मालकाशी खाजगी वाटाघाटी करुन त्या जास्तीच्या जागेचा मोबदला रक्कम रु. १२४१५०/- निश्चित करण्यात येतो. निश्चित करण्यात आलेल्या मोबदल्याची रक्कम मिळकत धारक, श्री. हसनखॉ हमीदखॉ यांचेकडून जागेचे नोंदणीकृत दस्तऐवज करुन जमिन ताब्यात घेतल्यानंतर जागा मालकास जागेचा मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच नोंदणीकरीता येणाऱ्या खर्चापैकी ५०% खर्च जागा मालकाने व ५०% खर्च महानगरपालिकेने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६८/२२ :**

महानगरपालिका हद्दीतील जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर जलौधीत करणेबाबत सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ४० दि. २०-११-८९ अन्वये रक्कम रु. ८८,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

उपरोक्त ठरावानुसार निविदा मागविण्यात आली. ती खालील प्रमाणे झोन क्र. ४ मधील ३९३ जुन्या पध्दतीच्या संडासाचे अंदाजपत्रक र. रु. ८,६४,६००/- चे रुपांतर जलौधीत करणेबाबत सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/९६६/८९ दि. २९-१२-८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ सहा निविदा वसूल झालेल्या होत्या. त्यापैकी सर्वात कमी दराची म्हणजे १०.५६% कमी दराची निविदा श्री. डी. सी. पंजाबी यांची असून, सदर निविदेस स्थायी समितीचा ठराव क्र. २१/७ दि. ०२-०७-९० द्वारे मंजुरी मिळाली आहे. करीता संबंधित गुत्तेदार यांना २% अनामत भरणेस्तव पत्र देण्यात आलेले होते. तरी

संबंधिताने लेखी खुलासा देऊन कळविले की, मी. निविदा भरून १२० दिवस झालेले आहेत. आम्ही आता बंधनकारक नाही. मार्केटमध्ये वस्तुंचे दर वाढलेले आहेत. तरी मी काम करु शकत नाही. असे कळविले आहे.

करीता या कामातील दुसऱ्या क्रमांकावरील गुत्तेदार व तिसऱ्या क्रमामांकावरील गुत्तेदार लोयेस्ट गुत्तेदार यांना आपण प्रथम लोयेस्टच्या दरात काम करण्यास तयार आहात काय या बाबत पत्र देण्यात आलेले होते. तरी संबंधिताने कार्यालयास पत्र देऊन कळविले की, मी. सदर दरात काम करु शकत नाही.

तद्नंतर मा. आयुक्त साहेब यांच्या फेरनिविदा आदेशानुसार सदर कामाकरीता दुसऱ्यांदा निविदा सुचना क्र. १७/१०००/९१ दिनांक ३०-०१-९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आलेल्या होत्या. सदर दोन्ही निविदा वसूल झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. एस. बेग | २१.२% जास्त |
| २) | श्री. बी. ए. काल्डा | ९.९९% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराचे श्री. बी. ए. काल्डा यांचे दरपत्रक आहे.

परंतु संबंधित गुत्तेदार यांचा दर जास्त असल्यामुळे त्यांना दर वाटाघाटी करीता दिनांक ०२-०३-९१ ला पत्र देण्यात आलेले होते. तरी संबंधिताने लेखी देऊन कार्यालयास कळविले की, मी ४.९९% जास्त दराने काम करण्यास तयार आहे व मा. आयुक्त साहेब यांनी सदर दरास मंजुरी दिलेली आहे.

करीता श्री. बी. ए. काल्डा याची ४.९९% जास्त दराचे दरपत्रक आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ मधील ३९३ जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर जलौधीत करणेबाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,६४,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामासाठी मा. आयुक्त यांचे आदेशानुसार दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराचे गुत्तेदार श्री. बी. ए. काल्डा यांचे दरपत्रक होते. परंतु संबंधित गुत्तेदार यांचा दर जास्त वाटत असल्यामुळे त्यांना दर वाटाघाटी करीता पत्र देवून बोलावले असता संबंधिताने ४.९९% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी देऊन कळविल्याप्रमाणे गुत्तेदार श्री. बी. ए. काल्डा यांचे ४.९९% जास्त दराने निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १६-०४-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त मंगळवार दिनांक १६-०४-१९९१ रोजी दुपारी ३.३० वाजता समिती सभागृहात स्थायी समिती सभेस मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकारी उपस्थित नव्हते. तसेच निम्ननिर्दिष्ट स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. जैस्वाल प्रदिपकुमार शिवनारायण
२) श्री. नवपुते कचरु चंद्रभान
३) श्री. मगर शंकर जिजाराम
४) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
५) श्री. फैय्याजखान अहेमदखान
६) स. अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
७) श्री. मो. इस्माईल अ. करीम
८) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
९) श्री. सोनवणे केशव काशीनाथ

**विषय क्र. ५६९/१ :**

दि. ३०-०३-९१ रोजी ५.०० वाजता संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** इतिवृत्तावर चर्चा करीत असतांना प्रथम मला असे म्हणावयाचे आहे की, सिडको-हडको भागामध्ये काही सेक्टरला गेली २-३ दिवसापासून पाणी पुरवठा होत नाही. याचे कारण काय? मी यापुर्वी दिनांक २२-०३-९१ रोजी एका पत्राद्वारे विचारणा केलेली होती. तथापी त्यावरही कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसून येत नाही. सध्या उन्हाळा सुरु झाला असून, दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा पाण्याची टंचाई जास्त प्रमाणात भासत आहे. काही नागरीक पाण्यासाठी आमच्याकडे धाव घेतात. त्यांना समजावून सांगणे सुध्दा आमचे कर्तव्य असते. अशावेळी पाणीपुरवठा विभागाकडून काही नळांना पाणी जास्त प्रमाणात सोडले जाते. तर काही सेक्टर मधील नळांना अजिबात पाणी येत नाही. किमान जास्त वेळ पाणी कसे मिळेल यांची काळजी प्रशासनाने घ्यावी आणि तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता, पाणी पुरवठा :** ३ एम. एल. डी. पाणी महापालिका (सिडको) मिळण्याकरीता दि. २७-०३-९१ पासुर सुरुवात होणार होतो. परंतु प्रस्तुत व ६ डाय कनेक्शन असल्या कारणाने फक्त एक (१) एम. एल. डी. पाणी पुरवठा होत आहे. पाण्याचे दर रु. ७/- एम. प्रमाणे एम. आय. डी. सी. यांनी मिळण्याकरीता कळविले आहे.

सध्या जायकवाडीहुन १.५०/- एम दराप्रमाणे पाणी मिळते. दर कमी करणेबाबत मा. विभागीय आयुक्त यांचेकडे मा. आयुक्त महानगरपालिका

एम. आय. डी. सी. चे इंजिनिअर तसेच सिडको अधिकारी व महापालिका पाणी पुरवठा व जलनि:सारण बोर्डचे अधिकारी यांची चर्चा झाल्यानुसार दर कमी करणेकरीता पत्र व्यवहार चालु आहे.

**श्री. केशव सोनवणे :**सुखना आणि जायकवाडी या ठिकणाहुन पाणीपुरवठा होतो. परंतु सुखना येथील होणारा पाणीपुरवठा व्यवस्थित होणे आवश्यक आहे. या ठिकाणाहुन पुरवठा होणारे पाणी दुषीत असाल्याचे काही नागरिकांच्या तक्रारी आहेत. याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आपल्याकडे लेखी तक्रारी आहेत काय?

**उप अभियंता पाणी पुरवठा :** सिडको एन.५ मध्ये तशी पाहणी करण्यात आलेली आहे, नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** सुखना या ठिकाणावरुन होणारी पाणी पुरवठा पाईप लाईन ही क्रॉस लाईन करणे आवश्यक आहे. ज्यामुळे कोणत्याही प्रकारे नागरिकांच्या तक्रारी दिसून येणार नाहीत.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** सुखना येथील पाणी पुरवठा बाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याशी बोलणी झालेली आहे. तेंव्हा यापुढे पाणी पुरवठा होणार की नाही अशी चर्चा झालेली आहे. त्याप्रमाणे पुढे काय कार्यवाही करावयाची ते लवकरच स्पष्ट होईल.

**उप आयुक्त** : क्रॉस कनेक्शन देणेबाबत काही अडचणी आहेत काय? त्याची पाहणी करावी पुढे एम. आय. डी. सी. च्या माध्यमातुन पाणी पुरवठा होणार आहे. तेंव्हा संबंधित विभागास तातडीने पत्रव्यवहार करुन सततचा पाठपुरवठा करुनच त्याप्रमाणे मा. आयुक्तांकडून एक अर्धशासकीय पत्र पाठवून कळविणे योग्य होईल.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** आपल्या सुचनेप्रमाणे यापुर्वीच पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

**श्री. केशव सोनवणे :** गेल्या ६ तारखेला अर्धशासकीय पत्र पाठवून संबंधित विभागास कळविले होते. तथापी अद्यापही काहीच कार्यवाही झालेली नाही. याचे कारण काय?

**उप अभियंता पाणी पुरवठा :** याबाबत मा. आयुक्त हे मा. विभागीय आयुक्तांशी सविस्तर चर्चा करणार आहेत.

**श्री. केशव सोनवणे :** सिडको एन-७ येथील पाण्याची टाकी सायंकाळी चालु करुन दुसऱ्या दिवशी टाकी भरल्या जाते. परंतु केवळ याच टाकीमधून संपुर्ण सिडको हडको परिसरातील नागरिकांना येथून होणारा पुरवठा अल्पसा होतो. तेव्हा दिल्ली गेट येथील टाकीमधून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या वेळामध्ये जर बदल केल्यास व काही प्रभावत येथील पाणी पुरवठा उशीरा करावा ज्यामुळे सिडको येथील पाण्याच्या टाक्या भरल्या जाऊ शकतील व कोणात्याही प्रकारच्या तांत्रीक अडचणी येणार नाहीत. यापुर्वी श्री. पिंजरकर साहेब कार्यकारी अभियंता असतांना अशा प्रकारे पाणी पुरवठा करण्याबाबत ॲडजेस्ट करण्याचे प्रयत्न करीत होते आणि वॉल्व सोडण्याचे प्रकार अलिकडे फार मोठया प्रमाणात दिसते याचे कारण काय?

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यानी याबाबत खुलासा करावा.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** जसे करणे शक्य नाही. शहराचा पाणी पुरवठा आणि सिडको हडकोकडील पाणी पुरवठा या दोन भागांचा समावेश असल्याने कधी कधी

विद्युत लाईन बंद पडते. तर कधी तांत्रीक अडचणी निर्माण होतात. ज्यामुळे दोन्हीही भागांसाठी विशेष लक्ष केंद्रीत करावे लागते. यामध्ये काही ठिकाणी पाणी पुरवठा भरपूर होतो तर काही ठिकाणी पाणी पुरवठा मुळीच होत नाही. यांचे कारणे असे दिसते की, कांही ठिकाणचे पाण्याचे वॉल्व्ह संपुर्णतः उघडले जातात. त्यामुळे पाण्याचा प्रवाह हा एकाच बाजुने धावतो व इतरत्र पाण्यासाठी बोंब होते. याबाबत तसे उघडकीस आल्यास त्याची पाहणी करुन संबंधितांवर कार्यवाही करण्यात येईल व सिडको हडकोतील पाणीपुरवठयाबाबत त्वरीत योग्य ती उपाय योजना आखल्या जाईल.

**श्री. कचरु नवपुते :** चिकलठाणा येथील पाण्याची टाकी पुर्णतः भरल्या जात नाही. तर यासाठी एक स्वतंत्रपणे देखरेखीसाठी वॉचमनची नेमणूक करण्यात यावी. ज्यामुळे टाकी भरल्या जाते किंवा नाही व भरल्यानंतर काही ठिकाणेच वॉलव्हची योग्य ती पाहणी करणे.

**श्री. म. इस्माईल :** माझ्या मते असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच ठिकाणी वॉल्व्ह हे स्वतंत्रपणे असतात. ते वॉल्व्ह आपले लाईनमन कांही जनाकडून पैसे उकळून पुर्ण उघडून देतात. ज्यामुळे कांही भागात पाणी पुरवठा होतो तर कांही भागात होत नाही. याबाबत मी मागील वर्षापासून सतत बोलत आहे. परंतु यावर योग्य ते नियंत्रण संबंधित अधिकाऱ्यांचे दिसतनाही. तर आपल्याकडे वेळे वेळी प्रशासनातर्फे पाणी पुरवठयाचे संबंधित अधिकारी व सबओव्हर सिअर यांच्या बदल्या करतात. या बदल्या केल्यामुळे प्रत्यक्षात त्या वार्डातील माहिती होण्यासाठी संबंधितांना एक महिन्याचा कालावधी लागतो व पर्यायाने पाण्यासाठी लोकांच्या बोंबा होतात. बऱ्याचशा ठिकाणी सब ओव्हरसिअर हे सुध्दा तक्रारी करुनही दाद देत नाहीत. आता सध्या उन्हाळा सुरु झालेला आहे व इदचा महिना असल्याने नागरिकांना पाण्याची व्यवस्था चोखरित्या होणे आवश्यक आहे. याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** बेगमपुरा येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होत आहे. तेंव्हा याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

**उप आयुक्त** : स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे सध्या उन्हाळा सुरु झाला असल्याने शहरामध्ये न विशेषता सिडको हडको भागामधील नागरिकांना पिण्याचे पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याचा संभव असतो. यासाठी सिडको हडको भागातील पाण्याचा गंभीच पेच सोडविण्यासाठी तातडीची उपाय योजना करण्यासाठी पाणी पुरवठा विभागातील संबंधिता अभियंता, कनिष्ठ अभियंता व सब-ओव्हर सिअर यांची एक तातडीची बैठक बोलाविण्यात येईल. ज्या ज्या ठिकाणी पाण्याचा नळाद्वारे पाणी पुरवठा होत नाही. त्या ठिकाणी हाफसा आहे काय? याचीही पाहणी करण्यात येईल व हाफसा बसविण्यासाठी सर्व्हे करुन त्वरीत कार्यवाही करण्यात येईल. मागील अशाप्रकारे योजना आपण आखलेली होती. त्याचप्रमाणे एम. आय. डी. सी. च्या बाबतीत तातडीने कार्यवाही कशी होईल यासाठी पत्र व्यवहार करुन विचारणेत येईल. ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्या प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या असून, पुन्हा बदल्या करणे शक्य नसल्याने आता एक महिन्याचा कालावधी लोटलेला आहे व पुर्ण माहिती आता संबंधित अधिकाऱ्यांना झालेली आहे. तेंव्हा संबंधित अधिकाऱ्यांना आपण व नागरिकांनी योग्य ते सहाकार्य देणे आवश्यक आहे.

**श्री. मो. इस्माईल :** बऱ्याच वेळेस आमच्या असे निर्दशनास आले आहे की, ज्या भागामध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नाहीत त्या भागासाठी खुल्या जागेची पाहणी करुन बोरींग करण्याबाबत विचार व्हावा असे सुचविले. परंतु अद्यापही संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घातलेले नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** माझ्याकडे बऱ्याच भागातील तक्रारी आलेल्या आहेत की, ज्या (ठिकाणी) भागामध्ये महानगरपालिकेने बोरींग केलेले आहेत. तेथील बरेचसे हाफसे नादुरुस्त व बिघडलेले आहेत. तेव्हा याबाबत त्वरीत कार्यवाही का होत नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** आतापर्यंत माझ्याकडे तीन लेखी तक्रारी आलेल्या आहेत व त्या तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे.

**श्री. शंकर मगर :** माझ्या वार्डामध्ये काही लहान बारा गल्ल्यामध्ये पाणी पुरवठा अजिबात सुरळीत होत नाही. वारंवार तक्रारी देऊनही कार्यवाही होत नाही. याचे कारण काय?

**उप अभियंता पाणी पुरवठा :** बायजीपुरा, इंदिरानगर या भागामध्ये मी प्रत्यक्षात पाहणी केली आहे. काही २-३ गल्ल्यांमध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. कारण म्हणजे तो भाग उंच व टेकडयावर असल्याने पाणी पुरवठा खालच्या लोकांना जास्त प्रमाणात होतो. याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. फैय्याजखॉंन, श्री. मो. इस्माईल, श्री. प्रदिप जैस्वाल :** मागे निवासी उप अभियंता विद्युत यांनी असे सुचविले होते की, जिन्सी भागातील पाणी पुरवठयाबाबत एक नविन मोटर आठ दहा दिवसात दुरुस्त करुन बसविण्यात येईल व तीन मोटर बसविल्यानंतर तेथील भागामध्ये पाणी पुरवठा व्यवस्थित होईल. तेव्हा नविन मोटर येऊनही एक वर्षाचा कालावधी लोटला आहे आणि संबंधित अभियंत्यानी अद्यापपर्यंत हे काम केलेले नाही. केवळ आश्वासन दिले याचे कारण काय? अशा प्रकारे पोकळ आश्वासन संबंधिताने का धावे? नविन मोटर बसवित असतांना एम. एस. इ. बी. व महानगरपालिका यांच्यामध्ये योग्य ते सहाकर्य असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या सुचनांशी मी सहमत असून मला असे वाटते की, आतापर्यंत जेव्हढया बैठका झाल्या त्या बैठकांमध्ये जिन्सी भागातील प्रश्नाबाबत अनेक वेळा चर्चा घडवून आणलेल्या आहेत. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासनेही त्यावेळी दिलेली आहेत. याबाबत स्पष्ट खुलासा व्हावा.

**उप अभियंता निवासी विद्युत :** स. सदस्यांच्या सुचनेनुसार या जिन्सी भागातील प्रश्नाबाबत व नविन मोटर दुरुस्त करुन बसविण्याबाबतचे काम हे यांत्रीकी विभागाचे असल्याने या कामी मी हस्तक्षेप करु शकले नाही.

**श्री. फैय्यजखॉन, श्री. प्रदिप जैस्वाल :** संबंधित अधिकाऱ्यांनी आठ-दहा दिवसात नविन मोटर दुरुस्ती करुन बसविण्यात येईल. अशी माहिती का दिली. व बऱ्याच दिवसापासून नागरिक आमच्याकडे चकरा मारत आहेत. तेंव्हा स्पष्ट असा खुलासा व्हावा व आतापर्यंत सदरील मोटर वर दुरुस्तीसाठी किती खर्च करण्यात आला याची माहिती द्यावी.

**श्री. शंकर मगर, श्री. प्रदिप जैस्वाल :** या मोटरवर वेळोवळी दुरुस्तीसाठी खर्च का होतो. मोटर बिघडण्याचे कारण काय? याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात यावा. व त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

**श्री. मो. इस्माईल, श्री. फैय्यजखान :** नविन मोटर येऊन एक वर्षाचा कालावधी लोटलेला असतांनाही अद्यापपर्यंत नविन मोटर का बसविण्यात आली नाही? आणि एम. एस. इ. बी. सी. याबाबतीत काय काय चर्चा झालेली आहे. याचा खुलासा व्हावा.

**उप आयुक्त** : याबाबत किती कालावधी लागेल याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावी.

**उप अभियंता विद्युत :** एम. एस. इ. बी. बरोबर चर्चा झालेली असून, त्यांचे बरोबर करार करण्यात आलेला असून, येत्या १५ दिवसावचा कालावधी मोटर बसविण्यासाठी लागणार आहे.

**श्री. मो. इस्माईल :** पंधरा दिवसाचा अवधी का लागणार? इतका उशीर लागत असल्यास जनता आम्हाला माफ करणार नाही. तेव्हा कराराबाबत आणि शक्यतो लवकर काम होण्यासाठी अर्धशासकीय पत्रान्वये विचारणा करण्यात यावी.

**श्री. केशव सोनवणे :** शहराचा आणि सिडको हडकोचा वाढता विस्तार लक्षात होता शहर भागातील लोकसंख्येच्या प्रमाणा इतकेच सिडको भागातील संख्या सध्या वाढत आहे. तेंव्हा शहरामध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये जेव्हढे कर्मचारी कामाला आहेत. त्यापेक्षा निम्मेही कर्मचारी सिडको पाणी पुरवठाकडे कामाला नाहीत. तेव्हा सिडको हडको पाणी पुरवठा विभागामध्ये एक उप अभियंता व कनिष्ठ अभियंता व सब ओव्हर सियर दोन असा अल्पसा कर्मचारी वर्ग असल्याने संपुर्ण सिडाको हडको भागातील योग्य ते नियंत्रण राहत नाही. यासाठी येथील कर्मचारी चतुर्थ श्रेणी मध्ये रोजंदारीवर कर्मचारी वाढवून देण्यात यावा. ज्यामुळे सुरळीत पाणी पुरवठा होण्यास मदत होईल.

**उप आयुक्त** : संबंधित झोन मधील व पाणी पुरवठा विभागातील कोणत्या अडचणी आहेत याची माहिती त्या विभागाकडून मागवून चौकशी केल्या जाईल आणि त्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल व वाढीव रोजंदारीवर कर्मचारी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**मा. सभापती** : मा. उप आयुक्त याबाबत स्वतंत्रपणे एक बैठक बोलविणार असून तसेच याबाबत निर्णय घेण्यात येईल व रोजंदारीवर किती कर्मचारी घेता येईल. याचाही या बैठकीत निर्णय होईल.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** चतुर्थ श्रेणी रोजंदारी वरील कर्मचारी प्रत्येक झोनला ५-५ तर सिडको भागामध्ये २३ आहेत.

**मा. सभापती** : संबंधित उप अभियंता (पाणी पुरवठा) यांनी उप आयुक्तांशी याबाबत सविस्तर चर्चा करावी.

**श्री. शंकर मगर :** मागील बैठकीमध्ये संवादामध्ये माझ्या स्वेच्छा निधीतून मोटरसाठी खर्च करण्यात यावा. अशी इतिवृत्तांत नोंद नाही.

**मा. सभापती** : ठीक आहे. नोंद घेण्यात यावी.

**श्री. इकबालसिंग गील :** माझ्या वार्डामध्ये काही भागात पाणी पुरवठा सुरळीत होत नाही.

**श्री. मो. इस्माईल :** उद्याला पाणी पुरवठा सुरळीत होणार काय? याची आताच पाहणी करावी. नसता सध्या इदच्या सनामुळे नागरिक संतापतील तेंव्हा काळजी घेणे आवश्यक आहे.

**उप अभियंता पाणी पुरवठा :** होय, संबंधित कामाकडे व पाणी पुरवठा बाबत विशेष लक्ष देण्यात येत आहे. परंतु विद्युत पुरवठयाबाबत विद्युत विभाग यांचयाकडून काही तांत्रीक अडचणी आल्यास सांगाता येणार नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** निवडणूक विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यात यावी. याबाबत सभेमध्ये गेल्या ३ वर्षापासून विचारणा करण्यात येत आहे. परंतु अद्यापही काहीही कार्यवाही झालेली नाही. ज्याप्रमाणे जनगणनेसाठी काम करणाऱ्या उत्कृष्ट कर्मचाऱ्यांना आपण विशेष प्राधान्य म्हणून बक्षिसे व आगाऊ वेतनवाढी देतो. त्याप्रमाणेच या कर्मचाऱ्यांना सुध्दा देण्यात यावे. कर्मचाऱ्यांना वेतनवाढी देण्याबाबत मंजुरी मिळालेली आहे. तेंव्हा प्रशासनाला कोणत्या अडचणी येत आहेत. तेच समजत नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** याबाबत एक कमीटी नेमण्यात आलेली आहे ही कमीटी संबंधित कर्मचाऱ्याचे कामाबाबत एक अहवाल आणि कार्यालयीन कामाची सेवा आदींबाबत कमीटीत विचार होऊन नंतर योग्य ती कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे, श्री. प्रदिप जैस्वाल :** आतापर्यंत ज्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी देण्यात आल्या होत्या. त्या सर्व कर्मचारी / अधिकाऱ्यांचे गोपनिय अहवाल व सेवा किती वर्षाची झाली याची पाहणी केली काय? तर ज्यांचे गोपनिय अहवाल चांगले नाहीत. त्यांना आपण देणार नाही काय. याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** दि. १३ एप्रिल, ९१ रोजी एक बैठक याच संदर्भात आयोजित केलेली होती. परंतु आपल्या महापालिकेतर्फे डॉ. आंबेडकर जन्म शताब्दी निमीत्ताने भडकल गेट येथे पुतळयाचे अनावरणाचा कार्यक्रम असल्याने सदरची बैठक होऊ शकली नाही. तेंव्हा हिच बैठक येत्या. १-२ दिवसात पुन्हा बोलावून याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

**श्री. मो. इस्माईल :** ज्या विभागातील कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट सेवा केलेली असेल त्याच कर्मचाऱ्यांना याचा फायदा व्हावा. इतर कोणत्याही विभागातील कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करण्यात येऊ नये.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** नेमका स्पष्ट असा उल्लेख करावी की, सदरील कार्यवाही इतक्या दिवसात करण्यात येईल.

**मा. उप आयुक्त :** याबाबतची एक बैठक होऊन येत्या ८-१० दिवसात प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** स्मशान भूमी येथील वॉचमन म्हणून सध्या कार्यरत असलेले राजेंदारीवरील कर्मचाऱ्यांना वेळेवर पैसे दिले जात नाहीत. याचे कारण काय?

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी** : संबंधित कर्मचारी रोजंदारीवरील ज्या विभागामार्फत कामे करतात त्या कार्यालयातून हजेरी लेखा विभागाकडे येणे आवश्यक असते आणि त्यानंतर उचित कार्यवाही करणे शक्य आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** अस्था-२ सहाय्यक आयुक्त यांचेकडे प्रशासनाने ३-४ विभागाचे अतिरिक्त भार सोपविल्याने त्यांचेकडून कामे सुरळीत होत नाहीत. तेंव्हा त्यांच्याकडील सध्या असलेले अतिरिक्त भार काढून घेऊन कोणतेही एकच

काम सोपवावे जेणेकरुन शहरातील साफसफाई व आणि स्वच्छते बाबत आळा बसू शकेल.

**मा. उप आयुक्त :** दरवर्षी पावसाळा सुरु होण्यापुर्वी आपल्या महापालिकेतर्फे एक योजना आखली जाते की, पावसाळयामध्ये जादा कर्मचारी लावून त्यांचेकडून शहरातील स्वच्छतेबाबत विशेष काळजी घण्यासारखे नियंत्रण ठेवावे लागते. त्याच प्रकारे यावर्षी सुध्दा तशी योजना आखणीसाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु काही ठिकाणी अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळे काही वेळेस अतिरिक्त भार एखाद्या अधिकाऱ्यांकडे सोपवून प्रशासन कामे चालवित असते.

**श्री. मो. इस्माईल, श्री. शंकर मगर :** इंदिरानगर बायजीपुरा भागामध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यात येत आहे. ती सर्वच भागामधून जाते असे नाही. तेंव्हा इतरत्र सर्वच भागातुन ड्रेनज लाईन टाकण्याबाबत कार्यवाही व्हावी. तसेच याच भागामध्ये बऱ्याच ड्रेनेज लाईन टाकण्यातबाबत कार्यवाही व्हावी. तसेच याच भागामध्ये बऱ्याच ड्रेनेज लाइ्रन असूनही एकही लाईन चालु नाही. याचे कारण काय? त्याचप्रमाणे गेल्या ४ महिन्यापसून या भागासाठी कामाचे टेंडर कॉल करुन त्यास मंजुरी मिळालेली आहे. परंतु संबंधित गुत्तेदाराने अद्यापही कामाचा आदेश मिळूनही कामास सुरुवात केलेली नाही. याबाबत मी प्रत्यक्षात मा. आयुक्तांना बोलले आणि त्याप्रमाणे मा. आयुक्तांनी पाहणी दौरा सुध्दा केलेला आहे.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेनुसार अद्यापपर्यंत कामास सुरुवात का झाली नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी करावी व त्वरीत कार्यवाही करावी व त्याचा अहवाल संबंधित स. सभासदांना पाठवावा.

**उप अभियंता ग. व. सु. :** बायजीपुरा, इंदिरानगर भागासाठी जे काम मंजुर झालेले आहे. त्या कामास सुरुवात का झाली नाही. यासाठी प्रत्यक्षात फाईल पाहुन सांगता येईल.

**उप अभियंता बांध-१ :** संबंधित एजन्सी गुरुनानक यांच्याकडे कामाबाबत पत्राद्वारे विचारणा करण्यात आलेली आहे. परंतु संबंधिताचे उत्तर अद्यापही प्राप्त झालेले नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** असे जर असेल तर संबंधित एजन्सीचे डिपॉझीट जप्त करण्यात यावे आणि पत्राद्वारे स्पष्ट खुलशाने विचारणा करावी.

इतिवृत्ताचे पान क्र. ७ विषय क्र. ५५०/१० या प्रस्तावामध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. मो. इस्माईल :** सदरची जागा किती फुटाची किंवा किती आकाराची मागणी केली होती याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सदरची जागा ८०/२० ची असून या जागेबाबतचा सध्या वाद कोर्टात चालु आहे. त्यामुळे आपण ही जागा संबंधित अर्जदारास देऊ शकत नाही.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव मंजुर झाला असून, केवळ कोर्टामध्ये प्रकरण चालु असल्याने संबंधित अर्जदारास इतरत्र दुसऱ्या ठिकाणी जागा देण्याची पर्यायी व्यवस्था व्हावी.

**श्री. केशव सोनवणे :** दि. ३०-०३-९१ चे इतिवृत्तातील पान क्र. ९ मध्ये उपस्थित केलेल्या हाफ राउुड गटरचे टेंडर संमत होऊनही आठ महिन्यापासून फाईल नाही असे विचारले होते. याबाबत नेमके काय झाले याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता ग. व. सु. :** सदरील कामाचे निविदा संमत झालेली आहे आणि येत्या २५ तारखेपर्यंत प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात येईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** निविदा मंजुर झालेल्या प्रकरणात जास्त निविदा आलेल्या असतील तर कमीत कमी दर ज्यांचे असेल त्यांना कामास सुरुवात करण्यास सांगावे व अशी कार्यवाही व्हावी.

**श्री. मो. इस्माईल :** मागील एक वर्षापासून मोतीवाला नगर बाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी अशी विचारणा केलेली होती. त्याचप्रमाणे डांबरीकरणाबाबत काय झाले.

**उप अभियंता बांध-२ :** निविदा मागविण्यात आलेल्या असून, १९ तारखेपर्यंत सादर करता येते तर २५ तारखेला निविदा उघडण्यात येतील आणि त्यानंतर ज्याचे दर कमी असतील त्यांचे दर निश्चित करुन मंजुरीस्तव ठेवून कामाला सुरुवात करण्यात येईल.

**मा. सभापती :** निविदा मागविल्यानंतर ज्यांचे कमीत कमी दरपत्रक असेल अशा कंत्राटदारास मंजुरी देण्यात येईल. व लवकरच कामाला सुरुवात करण्यात येईल.

**श्री. शंकर मगर :** सुराणा नगर येथील कामास मंजुरी मिळालेली आहे. तेंव्हा कामाला सुरुवात करण्यात यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. मो. इस्माईल :** डांबरी करणाबाबतची कामे पडून आहेत. त्यास मा. सभापती यांनी कामास सुरुवात करण्याबाबत आदेश दिलेला नाही. याचे कारण काय? तेंव्हा पडलेल्या कामांची सुरुवात तात्काळ होणेस्तव मा. सभापतींनी योग्य तो आदेश सर्वानुमते द्यावा.

**श्री. केशव सोनवणे :** इतिवृत्ताचे पान क्र. ५ विषय क्र. ५५३/७ व पान क्र. १६ विषय क्र. ५६८/२२ या प्रस्तावाबाबतची फाईल सभेमध्ये दाखविण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता ग. व. सु. :** विषय क्र. ५५३/७ पान क्र. ५ व ६ यामध्ये १९८९-९० च्या डी. एस. आर. दराप्रमाणे सदरचा दर या विषयात दाखविण्यात आलेला आहे. नारेंगाव स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतगत १०० घरांकरीता श्रेणी वाढ योजना राबविण्यासाठी सदरची योजना आहे. आता नविन वर्षाचे दर वाढलेले असल्याने या वित्तीय वर्षाचे दराप्रमाणे सदरील कामे करुन घेण्यात येणार आहे.

**उप अभियंता बांध-२ :** विषय क्र. ५६८/२२ पान क्र. १६ व १७ नुसार झोन क्र. ४ मधील ३९३ जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर जलौधीत करणेबाबतच्या कामाचे निविदा रिकॉल करण्यात आलेल्या आहेत व याचे दरपत्रक जुन्या दराचे असल्याने व आता नविन दर वाढल्याने संबंधित गुत्तेदार जुन्या दराने काम करण्यास तयार होणार नाही. तेंव्हा नविन डी. एस. आर. दराने काम करुन घ्यावे लागणार आहे.

**श्री. कचरु नवपुते :** ज्या गुत्तेदारास सदरील कामाची मंजुरी मिळाली आहे त्याच गुत्तेदारास पत्राद्वारे कळविण्या यावे व तसा तोच गुत्तेदार जुन्याच दराने काम करण्यास सध्याही तयार आहे. तेंव्हा सदरचे काम त्याच नेमक्या गुत्तेदारास देण्यात यावे. इतरांना देण्यात येऊ नये.

**मा. सभापती** : या कामाचे बाबत संबंधित गुत्तेदारांनी प्रस्तावातील निविदा दाखल करते वेळीच तसेच नमुद करणे आवश्यक होते. तसेच त्याचवेळी का दर्शविले नाही. या बरोबरच कांही दुरुस्त्यांसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

स. सदस्य श्री. शंकर मगर यांच्या स्वेच्छा निधीतून त्यांच्या वार्डामध्ये पाच हॉर्स पॉवरची मोटरसाठी खर्चसन १९९०-९१ या वित्तीय वर्षीच्या खर्चातून करणेत यावा अशी नोंद घेण्यात येते व त्यांच्या वार्डातील मंजुरी कामास त्वरीत सुरुवात व्हावी. अशी नोंद घेण्यात येते.

पान क्र. ७ विषय क्र. ५५६/१० या प्रस्तावामध्ये दर्शविल्यानुसार ८०/२० फुटाच्या जागेची अर्जदाराने मागणी केली व त्यास मंजुरी मिळाली आहे. परंतु सदरील जागेचा वाद न्यायप्रविष्ट असल्याने अर्जदारास पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कार्यवाही व्हावी. या दुरुस्त्यांसह दि. ३०-०३-९१ रोजी ५.०० वाजता संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७०/२ :**

वार्ड क्र. ५७ त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी रस्त्यावर १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पाईपलाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ६५५९१.०० चे तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे.

सदरील लाईनची लांबी १३० मीटर आहे. ओदशाप्रमाणे सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७/१०४/९१ दि. २४-०१-९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ (३) तीन निविदा वसूल झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सिध्दार्थ अहिरे | ५% जास्त |
| २) | श्री. शे. रफिक शे. रहिम | २२.२२% कमी |
| ३) | श्री. जे. जे. भारुका | ०.०१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी दराचे श्री. शे. रफिक शे. रहिम यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५७ त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी रस्त्यावर १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पाईपलाईन टाकणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी दराचे गुत्तेदार श्री. शे. रफिक शे. रहीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी येथील ॲप्रोच रोडचे रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,४३,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरचे काम जिल्हा नियोजन व विकास मंडळ फंडातून करावयाचे असल्यामुळे अंदाजपत्रकास दि. २५-०१-१९९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (११) १९९०-९१ चे निविदा सुचनेद्वारे निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. १८-०२-९१ ला एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दि. २६-०२-९१ एकूण (७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मनजितसिंग | २५.५% कमी दराने |
| २) | श्री. मे. एस. एच. असोशिएटस | २५% कमी दराने |
| ३) | मे. रे. कन्स्ट्रक्शन | २४% कमी दराने |
| ४) | श्री. कुलवंतसिंग | २३.९०% कमी दराने |
| ५) | श्री. कैसरखान | २०.७८% कमी दराने |
| ६) | श्री. एम. एम. बेग | २% कमी |
| ७) | श्री. एस. ए. नवाब | २०.२०% कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०.०५% कमी दराने श्री. मनजितसिंग यांची निविदा असून, प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्तावाबाबत माहिती द्यावी.

**उप अभियंता बांधकाम :** सदरचे प्रस्तावाची निविदा डायरेक्ट कॉल करुन मागविण्यात आल्या आहेत आणि सदरील काम हे डी. पी. डी. सी. चे अंतर्गत असल्याने शासनाच्या योजनेनुसार या कामाचा खर्च याच वित्तीय वर्षात होणेसाठी सदरील खर्च होणे व मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** असा काही नियम आहे काय की, डी. पी. डी. सी. चे काम असल्यास त्यास तातडीने मंजुरी द्यावी.

**मा. सभापती** : तसे काही नाही परंतु कामाचे महत्व लक्षात घेता या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बनेवाडी येथील ॲप्रोच रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४३,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.०५% कमी दराचे गुत्तेदार श्री. मनजितसिंग यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. उल्का नगरी येथील खडी रस्ते तयार करण्याचे कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ४१,९००/- च्या अंदाजपत्रकास दि. २६-१२-९० ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९/१९९०-९१ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ०८-०१-९१ पर्यंत एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दि. ११-०१-९१ ला एकूण

(४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | २५% कमी दराने |
| २) | श्री. गिरीश सिकची | २५% कमी दराने |
| ३) | श्री. अब्दुल सलाम | १६.९५% कमी दराने |
| ४) | श्री. मौला अलियार खान | ५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% कमी दराचे श्री. सुखबीरसिंग व श्री. गिरीश सिकची या दोन ठेकेदारांचे दर समसमान आलेले आहेत. म्हणून दोघा ठेकेदारांना पत्राद्वारे दर वाटाघाटीसाठी बोलविले असता श्री. गिरीश सिकची यांनी दिलेल्या मुदतीमध्ये कसलाही खुलासा केला नसल्यामुळे श्री. सुखबीरसिंग यांनी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे २५% कमी दराने काम करण्यासाठी लेखी अनुमती दिलेली आहे.

करीता सुखबीरसिंग यांनी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे २५% कमी दराने लेखी संमती दिल्यानुसार त्यांची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. उल्का नगरी येथील खडी रस्ते तयार करण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% कमी दराचे गुत्तेदार, श्री. सुखबीरसिंग यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५७३/५ :**

उप अभियंता, स्लम, यांनी प्रस्ताव सादर केला की, मोचीवाडा, पद्मपुरा, भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार, आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. १,६८,०००/- चे आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकल्याची अंतिम दि. ३०-०१-९१ पर्यंत एकूण पाच निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत दि. ०६-०२-९१ रोजी फक्त (२) दोन निविदा प्राप्त झाल्या व दि. १३-०२-९१ रोजी उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. बी. सादवानी | ००.१०% कमी |
| २) | श्री. ए. एम. फारुकी | ०४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. एस. बी. सादवाणी यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी आहे. करीता श्री. एस. बी. सादवाणी यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.१% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोचीवाडा (पद्मपुरा) भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.१% कमी दराचे गुत्तेदार श्री. एस. बी. सादवाणी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७४/६ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५४/९ दि. २०-११-८९ अन्वये शहरात विविध भागात जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था टाकणेसाठी शासनाने विशेष अनुदानातून कामे करण्यास मंजुरी मिळालेली आहे. त्यात मो. पडेगांव येथील २.५० लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचा समावेश आहे. मौजे पडेगांव येथील जलकुंभासाठी महानगरपालिकेची जलकुंभास उपयुक्त अशी जागा नसल्याने खाजगी जागा संपादन करुन जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. हे काम विहित मुदतीत पुर्ण करुन अनुदानाची रक्कम परत होऊ नये. यासाठी या परिसरात साधारणातः जलकुंभासाठी उपयुक्त अशी जागा स. न. ३ (भाग) पडेगांव पैकी भूखंड क्र. ४३ पैकी १३२.०० चौ. मी. जागा श्री. रविंद्र विश्वनाथ त्रिवेदी व श्रीमती सगुनाबाई काशीनाथराव कमद यांचेकडून खाजगी तडजोड करुन ताब्यात घेतली आहे. या जागेचा मोबदला महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक नगर रचना यांनी रु. २९,२६०/- निश्चित केल्याप्रमाणे निश्चित केल्याप्रमाणे जलकुंभ बांधण्याची निकड लक्षात घेऊन हितसंबंधीतांना अदा करुन जलकुंभाचे काम सुरु केले आहे. करीता, कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**संवाद :**

**श्री. मो. इस्माईल :** पडेगांव येथे ज्या स्थानी जलकुंभ बांधणेचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. त्या जागेचे पी. आर. कार्ड वगैरे आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती, सहाय्यक संचालक नगररचना :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. होय सदरील जागेचे पी. आर. कार्ड आहे त्यामुळे सदरची खाजगी जागा संपादन करुन जलकुंभ बांधण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध भागात जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था टाकणेसाठी मंजुरी मिळालेल्या शासनाचे विशेष अनुदानातील कामापैकी मौजे पडेगांव येथील २.५० लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यास महापालिकेची उपयुक्त अशी जागा त्या ठिकाणी उपलब्ध नसल्या कारणाने व शासनाचे या कामावरील अनुदान परत जाऊ नये म्हणून हे काम विहित मुदतीत पुर्ण करणे जरुरीचे असल्यामुळे पडेगांव येथील सर्व्हे न. ३ (भाग) पैकी भुखंड क्र. ४३ पैकी १३२.०० चौ. मीटर जागा श्री. रविंद्र विश्वनाथ व श्रीमती सगुनाबाई काशीनाथराव कमद यांच्या मालकीची सदरील जागा खाजगीरित्या तडजोड करुन ताब्यात घेतलेल्या जागेचा मोबदला सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केल्याप्रमाणे रक्कम रु. २९,२६०/- संबंधित हितसंबंधितांना अदा करण्यात आल्याप्रमाणे त्या खर्चास जलकुंभाच्या बांधकामाची निकड लक्षात घेता सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७५/७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर, मुकुंदवाडी, स्लम भागातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरीता अंदाजपत्रक र. रु. ४५,०००/- ला मा. आयुक्तांची मंजुरी दि. २८-०९-९० ला मिळाल्यानंतर सदर कामा करीता कार्यालयाची निदिा सुचना क्र. १२ द्वारे निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे दि. ३०-०१-९१ पर्यंत एकूण

(७) सात कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकृतीचे दि. ०६-०२-९१ रोजी फक्त (३) तीन निविदा खालील प्रमाणे दर भरलेल्या प्राप्त झाल्या

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शैलेश कन्स्ट्रक्शन | २५% अ. प. दरापेक्षा कमी |
| २) | श्री. के. बी. पठाण | ३४% अ. प. दरापेक्षा कमी |
| ३) | श्री. सुखबीरसिंग | २५.०५% अ. प. दरापेक्षा कमी |

निविदा उघडल्यानंतर त्यात तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराची निविदा श्री. के. बी. पठाण यांची निविदा आहे. परंतु ठेकेदाराने निविदेत दिलेले दर हे बरेच कमी असल्यामुळे ठेकेदाराकडून कार्यालयाचे पत्र दि. २७-०२-९१ नुसार दर पृथ:करण देणे करीता कळविले असता ठेकेदाराने दि. २०-०३-९१ ला पत्र देऊन कळविले की, त्याचे स्वत:चे मालकीचा ट्रक असल्याने नमुद केले आहे व सदर कामात जास्त रक्कम भरतीसाठी आहे. त्यामुळे हे काम त्यांना परवडते असे कळविले आहे.

तरी श्री. के. बी. पठाण यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४% कमी असलेली निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदरील प्रस्तावात कमी दराने निविदा आलेल्या असल्यास कमी दराने कामे काम चांगल्या प्रकारे होऊ शकेल काय? यापुर्वी (३) तीन वेळेस सदरचा प्रस्ताव रिकॉल करण्यात आलेला आहे आणि तीन वेळेस प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. तेंव्हा कमी दराची वाट न पाहता काम अे-१ ने करण्यात यावे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता ग. व. सु. :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदरील कामास कमी दराची निविदा असेल त्यांचे दरास मंजुरी मिळाल्यास कामास लवकरात लवकर सुरुवात करण्यात येईल.

**श्री. कचरु नवपुते :** हाफ राऊंड गटर बाबत जी निविदा रिकॉल करण्यात आलेली होती. ती. चिकलठाणा बाबत काय झाले याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो आणि प्रस्तावातील कामास सुरुवात झाल्यानंतर संबंधित गुत्तेदाराने कामाची व साहित्याची क्वॉलीटी मेंटेन करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी नेहमी लक्ष केंद्रीत करणे योग्य राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर, मुकुंदवाडी, स्लम भागातील रस्त्याची दुरुस्ती करण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराचे गुत्तेदार श्री. के. बी. पठाण यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७६/८ :**

उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकर नगर स्लम भागात (१०) दहा बैठकीचे सार्वजनिक संडास बांधणेसाठी अंदाजपत्रक र. रु. ९९,९००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. २४-०१-९१ ला मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे

नियोजीत तारखेपर्यंत फक्त एकच निविदा प्राप्त झाली असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) श्री. बी. एम. काथार अ. पत्रकाचे दरापेक्षा ११.००% कमी

करीता श्री. बी. एम. काथार यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.००% कमी दराचे टेंडर मंजुरी करीता विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. कचरु नवपुते :** या प्रस्तावासाठी एकच निविदा का आली.

**श्री. केशव सोनवणे :** सदरच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे. तेंव्हा मला असे वाटते की, या प्रस्तावास केवळ कार्योत्तर मंजुर देण्यात यावी.

**मा. सभापती :** या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंबेडकर नगर स्लम भागात (१०) दहा बैठकीचे सार्वजनिक संडास बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९९,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. बी. एम. काथार यांची एकमेव निविदा प्राप्त झाल्यामुळे त्यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.००% काम दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७७/९ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चौसरनगर स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गज (४३) घरांसाठी श्रेणीवाढ योजना राबविणे करीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ६७ दि. ०४-१०-९० द्वारे र. रु. १,७२,०००/- ला मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामाकरीता कार्यालयाची निविदा सुचना क्र. १५ द्वारे प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विकण्यात आली व फक्त एकच निविदा री. कैसरखाँन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७८६% जास्त दराची प्राप्त झाली. ठेकेदारांनी दिलेले दर अ. प. दरापेक्षा ९.७८६% जास्त आहे. याच प्रकारचे काम हर्सुल, चिकलठाणा व नारेगांव स्लम भागात करण्यात येत असून, सदरील कामाची अंदाजपत्रके १९८९-९० चे डी. एस. आर. दराप्रमाणे असल्यामुळे त्या कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% जास्त दराचे टेंडर मंजुर करण्यात आले आहे. व काम एकाच प्रकारचे असल्यामुळे चौसर नगर येथे ४३ घरांसाठी श्रेणीवाढ योजनेचे कामासाठी श्री. कैसरखॉन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७८६% जास्त दराची निविदा मंजुरीसाठी विचारर्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सदरचा प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा. कारण या प्रस्तावासाठी एकच निविदा आलेली आहे.

**मा. सभापती :** सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चौसर नगर स्लम भागात नेहरु रोजगार योजने अंतर्गत (४३) घरांसाठी श्रेणी वाढ योजना राबविणे करीता प्राप्त झालेली श्री. कैसरखॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७८६% जास्त दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७८/१० :**

मो. बन्सीलाल नगर वार्ड क्र. ५७ येथे बन्सीलाल नगर ते हौसिंग बोर्ड पर्यंत सरफेस गटार बांधणेबाबत अंदाजपत्रक र. रु. १,४४,१५६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. १२८ दि. २४-०९-९० अन्वये मंजुरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३-९० अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या होत्या. सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७% कमी दराची श्री. सय्यद टी. अहेमद यांची निविदा फारच कमी दरीच असल्यामुळे मा. आयुक्तांनी फेरनिविदा मागविण्यात यावे असे आदेश दिले.

सदर कामासाठी दुसरी वेळ बी-१ नमुन्यात निविदा सुचना क्र. १५/९१ दि. ०४-०१-९१ द्वारे निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विकण्यात आल्या पैकी केवळ दोनच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गिरीश सिकची | १% कमी |
| २) | श्री. जावेद अहेमद खॉन | ९.९९% जास्त |

तुलनात्मदृष्टया कमी व अं. पत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री. गिरीश सिकची यांची निविदा आहे. मा. आयुक्त साहेबांच्या आदेशावरुन संबंधितांना त्यांचे दर कमी करण्यासाठी कार्यालयात बोलाविण्यात आले असता वाटाघाटी अंती संबंधिताने ६% कमी (अ. प. दरापेक्षा) दराने काम करण्यास तयार असल्याचा लेखी खुलासा केलेला आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५७ बन्सीलाल नगर ते हौसिंग बोर्ड पर्यंत सरफेस गटार बांधण्याच्या कामाकरीता श्री. गिरीश सिकची यांनी लेखी दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७९/११ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर, (बायजीपुरा) स्लम भागात १५० मी. मी. ऐवजी ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अ. पत्रक रक्कम रु. ४९,६००/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १५ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा पाच निविदा विकण्यात आल्या पैकी मे. एस. एच. असोशिएटस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इंदिरानगर स्लम भागात १५० मी. मी. ऐवजी ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरीता मे. एस. एच. असोशिएटस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८०/१२ :**

औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार उस्मानपुरा ते स्टेट बँक कॉलनी जवळून जाणाऱ्या रस्त्याची ८० फुट रुंद आखणी केलेली आहे. या श्री. बालन्ना मालन्ना यांची मिळकत नगरभूमापन क्रमांक १६०२८ क्षेत्र ३१५.२ चौ. मीटर संपुर्ण बाधीत असुनही मिळकत

यापुर्वीच रस्त्यात सामील केलेली आहे. सदर मिळकतीचे जमीन मालक श्री. बालन्ना मलन्ना यांना वरील मिळाकतीचा मोबदला देण्यासाठी महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक नगर रचना यांनी रुपये ८१६३५/- देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** या प्रस्तावाबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा व या जागेचे पी. आर. कार्ड आहे काय याची माहिति द्यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक नगररचना :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा ते स्टेट बँक कॉलनी जवळून जाणाऱ्या रस्त्याची ८० फुट रुंद आखणी केली त्यामुळे ८० फुट आणि ७० फुट अशा प्रकारची रोडची आखणी आहे. यामध्ये आयुक्त यांना १४/४/३ च्या मनपाचे नियमाप्रमाणे कमी जास्त जागेचे बदल करण्याचा अधिकार आहे आणि संबंधित जागेचे पी. आर. कार्ड तपासून पाहिलेले आहे.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार उस्मानपुरा ते स्टेट बँक कॉलनी जवळून जाणाऱ्या ८० फुट रुंद रस्त्यात श्री. बालन्ना मलन्ना यांची मिळकत न. भू. क्र. १६०२८ क्षेत्र ३१५.२ चौ. मी. संपुर्ण बाधीत झालेली असल्याने या मिळकतीचा मोबदला मिळकतीचे जमीन मालक श्री. बालन्ना मलन्ना यांना र. रु. ८१,६३५/- देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/१३ :**

औरंगाबाद विकास योजनेतील प्रस्ताव १०० फुट रुंद रस्ता रंगीन गेट ते सिटीक्लब ते एस. टी. स्टँड, रेल्वे स्टेशन पर्यंतचा अति महत्वाचा रस्ता म्हणून विकसीत करण्याचे कार्यवाही मध्ये काला दरवाजा येथील ४/५ घरे तोडणेत आलेली आहेत. तोडणेत आलेल्या घरांचा तपशील खालील प्रमाणे आहे. हया इसमांना हया ठिकाणी रस्त्याचे कडेला स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. त्यांना मदत अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी खालील तपशीलानुसार सादर.

| **अ. क्र.** | **नांव** | **घराची साईज** | **एकूण क्षेत्र** | **रु. १०.०० प्रति चौ. फुट रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १) | गिताबाई कामाजी आठवले | २० X ११ फुट | <u>२२० चौ. फुट</u><br>२०.०० मी. | २२००.०० |
| २) | काशीनाथ नरवडे, बाळा महादु साळवे, आसाराम महादु साळवे. | १८ X ३० फुट | <u>५४०.००</u><br>५०.०० | ५४००.०० |
| ३) | शरफोद्यीन रहिमोद्यीन | १० X ११ फुट | <u>११०.००</u><br>१०.२ | ११००.०० |
| ४) | इफतेखॉन शमसोद्यीन | १० X ११ फुट | <u>११०.००</u><br>१०.२ | ११००.०० |
| **रक्कम रुपये नऊ हजार आठशे फक्त** | | | | **९८००.००** |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद विकास योजनेतील १०० फुट रुंद रस्ता रंगीन गेट ते सिटी क्लब, ते एस. टी. स्टँड रेल्वे स्टेशन पर्यंत रस्ता विकसीत करण्याचे कार्यवाही मध्ये काला दरवाजा येथील जी ४/५ घरे तोडण्यात आली. त्या घरांसाठी मोबदला म्हणून खालील प्रमाणे रक्कम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गिताबाई कामाजी आठवले | र. रु. २२००/- |
| २) | श्री. काशिनाथ नरवडे, बाळा महादू साळवे व श्री. आसाराम महादू साळवे | र. रु. ५४००/- |
| ३) | श्री. शरफोद्दीन रहिमोद्दीन | र. रु.११००.०० |
| ४) | इफतेखॉन शमसोद्दीन | र. रु. ११००.०० |

अशी एकूण र. रु. ९८००/- संबंधितांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐन वेळचे प्रस्ताव

**विषय क्र. ५२८/१४ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, समर्थनगर ते सिल्लेखाना या ८० फुट रस्ता विकास योजनेत श्री. मोहंमद इस्माईल कुरेशी पिता महंमद याकुब यांची मालमत्ता बाधीत होत असून, त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना रॉक्सी थिएटरच्या लगतची पाठीमागील आतील जागा भाडेपट्टयाने दिल्यास ८० फुट रस्त्यामध्ये बाधीत असलेली त्यांची मालमत्ता बिना मोबदला रस्ता विकासासाठी देण्याची त्यांनी तयार दर्शविली आहे.

रॉक्सी सिनेमांच्या मागील बाजुची जी वॉल कंपाऊंड आहे. त्यांच्या दक्षिणेकडी मागील भागात रस्त्याव्यतिरिक्तची जी जागा उपलब्ध आहे. त्यातील जागा अर्जदार श्री. बिसमिल्ला बी. कुरेशी व इतर यांना मा. आयुक्त ठरवतील त्या अटीवर व शर्तीवर व लिजने देणेबाबत विचार होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर ते सिल्लेखाना या ८० फुट रस्ता विकास योजनेत श्री. महंमद इस्माईल कुरेशी पिना महंमद याकुब यांची मालमत्ता बाधीत होत असल्याने व बाधीत जागा विना मोबदला रसता विकासासाठी देण्यास तयार असल्या कारणामुळे रॉक्सी टॉकीज मागील बाजुची जी वॉल कंपाऊंड आहे. त्यांच्या दक्षिणेकडील मागील भागात जी जागा उपलब्ध आहे. त्यातील जागा अर्जदार श्री. बिसमिल्ला बी. कुरेशी व इतर यांना मा. आयुक्त ठरवतील त्या अटी व शर्तीवर व लिजने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८३/१५ :**

सर्व्हे न. ५५ गारखेडा या सुतगिरणीच्या मालकीच्या जागेतील विकास योजनेचा ८० फुट रुंद रस्ता जात आहे. या प्रस्तावीत ८० फुट रुंद रस्त्याखालील जागा क्षेत्र १३१६० चौ. मी. दि. ०२-०६-८४ रोजी आपसातील तडजोडीने महानगरपालिकेने ताब्यात घेतले आहे. पुर्वी सदर जमीन शासनाच्या मालकीची असल्याने जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. ९१-आरबी-डेस्क-२-जमीन-२ दि. ०३-०४-९१ अन्वये कळविले आहे की, ताबा घेतलेल्या तारखेचे बाजार भावाने मुल्यांकन करुन त्यांच्या ५०% रक्कम शासनाकडे वर्ग करुन उर्वरित ५०%

सुतगिरणीस देण्यात यावे. त्यानुसार सहाय्यक संचालक यांनी सदर जागेचे १९८४ वे मुल्यांकन केले असून, रु. ५,७४,७२५.०० होते त्याच्या ५०% रक्कम म्हणजे रु. २,८७,३६२.०० शासनास जमा करुन उर्वरित ५०% रक्कम रु. २,८७,३६२/- व त्यावरील आजपर्यंतचे व्याज रु. २,७३,७१२/- औरंगाबाद जिल्हा कापूस उत्पादक सहाकारी सुत गिरणीस देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर. सदर जागा नोंदणीकृत दस्तऐवजाने घेणे असल्यास नोंदणावळीचा खर्च ५०% महानगरपालिकेने व ५०% खर्च अर्जदार यांनी करावा.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. एकबालसिंग गिल :** औरंगाबाद शहरातील ज्या बाधीत होणाऱ्या नागरिकांना जागा ताब्यात घेतेवेळी जी किंमत मनपाला मोजली लागली तीच किंमत सर्व्हे न. ५५ गारखेडा या सुतगिरणीच्या मालकीच्या जागेतील विकास योजनचा ८० फुट रुंद रस्त्याखालील जागेसाठी मोबदला म्हणून देण्यात यावा व जसजसा नविन कर मनपातर्फे देण्यात येईल तोच दर तेथील लोकांना लागू करावा व त्याच दराने जास्त कालावधी लागल्यास व्याजासहित पैसे देण्याचा विचार करावा या परिसरात जो सध्या जागेचा दर लागू आहे. त्याच प्रमाणे पाहणी करुन दराची निश्चिती व्हावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे सर्व्हे नं. ५५ गारखेडा या सुतगिरणीच्या मालकीच्या जागेतील विकास योजनेचा ८० फुट रुंद रस्ता जात आहे. या ८० फुट रुंद रस्त्याखालील जागा क्षेत्रफळ १३१६० चौ. मी. मनपाने ताब्यात घेतली आहे. त्या भागातील इतर स्थळी जाऊन त्याची पाहणी करण्यात येईल व इतर ठिकाणचे जागेचा दर काय आहेत. ते जाणून घेण्यात दराप्रमाणेच या जागेसाठीचा मोबदला देण्यात येईल. त्याचप्रमाणे कम्प्लेशन सुध्दा ज्या जागेतील घरे बाधीत घेताहेत त्यांना देण्यात येईल.

**ठराव :**

सर्व्हे नं. ५५ गारखेडा या सुतगिरणीच्या मालकीच्या जागेतील विकास योजनेचा ८० फुट रुंद रसता जात असल्याने त्या रस्त्याखालील जागा क्षेत्रफळ १३१६० चौ. मी. महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. त्या भागातील इतर स्थळी जाऊन त्याची पाहणी करण्यात येऊन इतर ठिकाणचे जागेचा दर काय आहे ते जाणून घेतल्यानंतर महानगरपालिकेने ठरविलेल्या त्या दराप्रमाणेच या जागेसाठीचा मोबदला देण्यात यावा. त्याचप्रमाणे कम्प्लेशन सुध्दा ज्या जागेतील घरे बाधीत घेताहेत त्यांना देण्यात येईल. ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. ५८४/१६ :**

वार्ड क्र. ३८ सुराणानगर येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत र. रु. १,१४,७५५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ८१३ दि. १८-०१-८९ द्वारे मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामाचे निविदेद्वारे काम सुरु करण्यात आले होते. मात्र या कामा दरम्यान काही भागाकरीता भूसंपादनाचे कार्यवाही संबंधाने कामास उशीर होत असल्याने नमुद निविदेचे अंतिम बील र. रु. ७१,३०१/- देण्यात आले.

उर्वरित कामाकरीता सहाय्यक संचालक नगर रचना यांनी दि. १५-०९-९० च्या पत्राद्वारे ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता भूसंपादनाचा ताबा घेतलेल्या जागेच्या उपलब्धतेनंतर सदर लाईन करीता नव्याने र. रु. ३५,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले व मा. आयुक्त साहेब यांनी सदर कामास मंजुर दिल्यानंतर सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७/१०४/९१ दि. २४-०१-९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या

होत्या व सदर काम अंदाजपत्रकीय दराने श्री. शंकर भैरव यांना मिळाले होते. परंतु मा. आयुक्त साहेब यांनी फेर निविदा मागवावी असा आदेश दिल्यानंतर सदर कामासाठी कार्यायलीन निविदा सुचना क्र. १८/३३२/९१ दि. ०७-०३-९१ द्वारे दुसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या होत्या. सदर दोन्ही निविदा वसुल झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शंकर भैरव | ०.१०% कमी |
| २) | श्री. सय्यद रफिकउद्यीन | ५.०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री. शंकर भैरव यांचे दरपत्रक आहे. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३८ सुरणानगर येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या भूसंपादनाचा ताबा घेतल्यानंतर उर्वरित कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री. शंकर भैरव याच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर आजची सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहरी केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २६-०४-१९९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त शुक्रवार दिनांक २६-०४-९१ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहामध्ये, स्थायी समिती सभेस मा. सभापती, श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली सुरवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. जैस्वाल प्रदिपकुमार शिवनारायण
२) श्री. नवपुते कचरु चंद्रभान
३) श्री. मगर शंकर जिजाराम
४) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
५) श्री. फैय्याजखान अहेमदखान
६) स. अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. मो. इस्माईल अ. करीम
९) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
१०) श्री. सोनवणे केशव काशीनाथ

**विषय क्र. ५८५/१ :**

दि. १६-०४-९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** काही दिवसापुर्वी सुपारी हनुमान रोडवरील एक दुकान आगीमध्ये जळून भस्मसात झाले. या दुकानदाराचे त्यात ५ ते १० लाक्ष रुपयांचे नुकसान झाले दुकानदाराने महानगरपालिकेकडे सदरील दुकान दुरुस्ती करुन शटर लावण्याकरीता परवानगी करीता विनंती अर्ज सादर केला आहे. परंतु सहाय्यक संचालक, नगर रचना विभागाकडून अद्यापपर्यंत दुकान दुरुस्तीची व शटर लावण्याची परवानगी देण्यात आली नाही. यासंबंधी अर्जदाराने, घरमालकाने " ना हरकत प्रमाणपत्र " देखील सादर केले आहे. तरी याबाबतची संचिका मागवून सविस्तर माहिती द्यावी.

**मा. सभापती** : या प्रकरणी सहाय्यक संचालक, नगररचना यांनी खुलासा

**सहाय्यक संलचाक नगररचना :** याप्रकरणात घरमालक आणि भाडेकरुन यांचा आपसात काही वाद निर्माण झालेला आहे. असे समजते. परवानगी बद्दल सदरील संचिका मा. आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : या संदर्भात असा खुलासा करण्यात येतो की, अर्जदारास परवानगी देण्याचे अधिकार स्थायी समिती सभेला नाही. अर्जदाराचे पोट भरण्याचे मुख्य साधन दुकानच आहे. म्हणून त्वरीत परवानगी देण्यात यावी. अशी विनंती सभागृहातर्फे आपण मा. आयुक्त यांना करु शकतो.

**श्री. केशव सोनवणे :** इतिवृत्ताचे पान (७) वर मागील सभेत निवडणूक विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यासंबंधी प्रश्न उपस्थित झाला असता एक कमीटी स्थापन करण्यात आली आहे. असे. मा. उप आयुक्त

यांनी सांगितले होते. याबाबत अद्यापपर्यंत काय कार्यवाही झाली याचा (विचार) खुलासा व्हावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** फक्त निवडणूकीचे काम केले म्हणून निवडणूकीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देणे योग्य नसते, यासाठी नेमलेली कमीटी, प्रशासनाने शिफारस केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत त्या त्या कर्मचाऱ्यांचे मागील ३ ते ४ वर्षाचे गोपनिय अहवाल आणि समधानकारक कार्यालयीन काम व सेवा केली का, या सर्व बाबी विचारात घेऊन कमीटी कर्मचाऱ्यांस वेतनवाढ देण्याबाबत, योग्य तो विचार करते.

**श्री. केशव सोनवणे :** महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणूकीच्या वेळी ज्या कर्मचाऱ्यांनी समाधानकारक व चांगले काम केले त्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याकरीता श्री. आर. एस. कुलकर्णी यांनी सविस्तर खुलासा करुन शिफारस केली होती ही संचिका अस्थापना विभागात आहे. याबद्दल काय झाले.

**मा. सभापती** : कर्मचाऱ्यांला वेतनवाढ देण्याबाबत मुख्य लेखा परीक्षक यांनी वरील खुलासा केलेला आहे. त्यानुसार कमीटीकडून संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामाचा वार्षिक अहवाल तथा गोपनिय अहवाल पाहून पुढील वेतन वाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** आज दुपारी सिडको आणि एन-६ या भागातून पिण्याच्या पाण्याकरीता नागरिकांच्या मोर्चा आला होता. सदरील भागात गेल्या ३/४ दिवसापासून अजिबात पाणी आले नाही. त्यामुळे नागरिकांना पाण्याकरीता फार त्रास सहन करावा लागतो. तसेच बेगमपुरा भागात पिण्याच्या पाण्याबद्दल फारच त्रास आहे. तरी यासंबंधी अद्याप पर्यंत काही कार्यवाही करण्यात आली नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : सध्या उन्हाळयाचे दिवस आहेत. पिण्याच्या पाण्याबद्दल नागरिकांना सहन करावा लागणारा त्रास व अडचणी लक्षात घेऊन जलगृह अभियंता यांनी स्वतः सदरील भागात जावे. सिडाको भागातील पाण्याची पाईप लाईन कोणी फोडली आहे. त्या व्क्ती विरुध्दा कायदेशीर कार्यवाही करुन त्वरीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी व नागरिकांना होणारा त्रास दूर करावा.

**श्री. शंकर मगर :** इतिवृत्ताच्या पान क्र. ११ वरील पाच हॉर्स पॉवरच्या मोटार ऐवजी माझ्या वार्डामध्ये दोन पाण्याच्या टाक्या व पाईप लाईनसाठी लागणारा खर्च सन १९९०-९१ च्या माझ्या स्वेच्छा निधीतून करणे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : सदरील दुरुसती करण्यास मान्यता देण्यात येते. इतिवृत्तात ही दुरुस्ती (करण्यात यावी.) करावी.

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. कचरु नवपुते :** डांबरीकरणाबाबतची जी कामे अद्यापपडून आहेत. त्यास मा. सभापती यांनी, जी निविदा सर्वात कमी असेल ती निविदा मंजुर करण्यात यावी. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : इतिवृत्ताचे पान क्र. १० वर वरील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येते. इतिवृत्ता तशी नोंद घ्यावी.

**श्री. कचरु नवपुते :** सन १९८९-९० साली मंजुर झालेल्या ठरावाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, हे ठराव नंतरच्या मिटींगमध्ये मंजुर करुन घ्यावे.

**श्री. शंकर मगर :** माझ्या वार्डातील ड्रेनेज व खडी टाकण्याच्या कामाचे गेल्या २-३ वर्षाचे प्रस्ताव अद्यापपर्यंत मंजुर करण्यात आले नाही.

**श्री. कचरु नवपुते :** दि. ३१-०१-९० रोजी माझ्या वार्डातील कामाबद्दल एक अर्ज सादर केला होता. त्यासंबंधी मागील सभेत चर्चा पण झालेली आहे. परंतु अद्यापपर्यंत काम झाले नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** नियमाप्रमाणे बजेट प्रोव्हीजन दरवर्षी ३१ मार्च रोजी संपते. परंतु मा. आयुक्त यांच्या आश्वासनानुसार ज्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे. त्या कामांना पुढील वर्षाच्या बजेटमधून खर्च करण्यास मंजुरी देण्यात येईल.

**मा. सभापती** : ज्या कामास सभेची मंजुरी मिळालेली आहे. परंतु अद्यापपर्यंत काम झालेले नाही. अशी सर्व कामे पुढील बजेटमध्ये घेण्यात यावी. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

**श्री. मो. इस्माईल :** १९८९-९० साली मंजुर झालेले कामे अद्याप पर्यंत झालेली नाहीत त्या कामास त्वरीत मंजुर देऊन फायनल करावे.

**मा. सभापती** : १९९०-९१ च्या साली पारीत झालेले प्रस्ताव १९९१-९२ च्या बजेटमध्ये घेण्यात येतील सन १९८९-९० साली ज्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे. परंतु कामे अद्यापपर्यंत पुर्ण झालेली नाहीत. अशा प्रस्तावास देखली या बजेट मध्ये घेण्यात यावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** जी कामे " पॉलीशी मॅटर " मध्ये येतात, तसेच ज्या कामाचे प्रस्ताव व अंदाजपत्रक मंजुर करुन कामे सुरु करण्यात आलेले आहेत. असे सर्व प्रस्तावास नियमीत बजेटमध्ये घेण्यात यावे.

**श्री. मो. इस्माईल :** डांबरीकरणाच्या कामाचे टेंडर उघडण्यात येऊन तीन महिन्याचा कालावधी झाल. परंतु अद्यापपर्यंत त्या कामाचा कार्याआदेश देण्यात आलेला नाही. त्यामुळे ठेकेदार सदरील काम त्या दराने करण्यास तयार नाही. याबाबत आपण काय कार्यवाही केली?

**मा. सभापती** : अशा प्रकारची किती कामे आहेत. त्यांची यादी करुन सभागृहात सादर करावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** मंजुरी मिळाल्यानंतर तीन-तीन महिने कामाची संचिका प्रलंबीत राहते. यास कोण जबाबदार आहे. अशा प्रलंबनामुळे ठेकेदार जुन्या दराने काम करण्यास तयार होत नाही. यास कोण जबाबदार आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करुन अशा प्रकारच्या प्रलंबीत कामाची यादी सादर करावी. यापुढे निविदा पत्रके उघडल्यानंतर त्वरीत पहिल्या सभेत त्यास मंजुरी देऊन कामे त्वरीत सुरु करण्याच्या दृष्टीने उचित कार्यवाही करावी.

**श्री. मो. इस्माईल :** सध्या डांबराच्या भावात वाढ झाल्यामुळे माझ्या वार्डातील २-३ कामे ठेकेदाराकडून होण्याची शक्यता नाही. यास जबाबदार कोण?

**श्री. केशव सोनवणे, श्री. मो. इस्माईल :** शहरातील मोठ मोठाल्या रस्त्याची कामे गुत्तेदाराच्या मार्फत करण्यात येतात. परंतु लहान गल्यातील व स्लम / रस्त्याचे कामे मोठे ठेकेदार करत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांना फार त्रास सहन करावा लागतो.

**श्री. केशव सोनवणे :** कार्यालयाकडे स्वतःचे रोलर व डांबर नसल्यामुळे कामात अडथळा येतो.

**श्री. मो. इस्माईल :** अशा प्रकारच्या लहान रस्त्याची व गल्ल्यामधील कामे करणे फार जरुरीचे व महत्वाचे आहे. या करीता काही मागे काढणे अत्यंत जरुरीचे आहे.

**मा. सभापती** : या विषयावर श्री. सिंकन्दर उप अभियंता बा. क्र.-२ खुलासा करतील.

**श्री. सिकन्दर, उप अभियंता बां. क्र.-२ :** पुर्वी कार्यालयाकडून डांबर पुरविण्यात येत होते. म्हणून गुत्तेदाराकडून काम करुन घेणे सोपे होते. परंतु आता कार्यालयास गुत्तेदारांवरच अवलंबून रहावे लागते.

**मा. सभापती** : पुर्वीप्रमाणे डांबर खरेदी करुन कार्यालयातर्फे ठेकेदारास पुरविण्यात यावे व लहान लहान गल्ल्यातील कामे करुन घेण्यात यावीत. या बाबत संबंधित अधिकारी यांनी याची दक्षता घ्यावी. शहरातील डांबरीकरणाच्या कामाकरीता कार्यालयातर्फे डांबर खरेदीची निविदा मागवून त्वरीत डांबर खरेदी करण्यात यावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** भडकल गेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ लाईट नाही. तसेच तेथील हौदात मुले आंघोळ करतात. त्यामुळे हौदाचे पाणी घाण होते. म्हणून तेथे लाईटची व्यवस्था करुन एक चौकीदाराची नेमणूक करण्यात यावी. तसेच औरंगपुरा येथील महात्मा फुले यांच्या पुतळया जवळील लाईट फक्त दोन दिवस चालु होते. फवारे पण चालु नाही. महावीर चौक येथील आयलँडला गेट नाही.

**मा. सभापती** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळयाजवळ लाईटची व्यवस्था करण्यात यावी व चौकीदाराची नेमणूक करण्यात यावी. तसेच महावीर चौकाच्या आयलँडला गेट बसविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढ देण्याकरीता काय पात्रता निश्चित करण्यात येते.

**मुख्य लेखा परीक्षक :** संबंधित कर्मचाऱ्यांचे ३/४ वर्षाचे गोपनिय अहवाल पाहण्यात येतात.

**श्री. केशव सोनवणे :** काही कर्मचाऱ्यांचे मागील वर्षाचे गोपनिय अहवाल समाधानकारक नाहीत व काही कर्मचाऱ्यांचे मागील वर्षाचे गोपनिय अहवालच अद्यापपर्यंत उपलब्ध झाले नाहीत. तरी अशा कर्मचाऱ्यांना वेतनवाढ कशी देण्यात आली?

**मा. सभापती** : नियमाप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा व गोपनिय अहवाल विचारात घेऊन या प्रकरणी त्वरीत पुढील कार्यवाही करण्यात यावी. पुढच्या सभेत या विषयी संपुर्ण माहिती सादर करावी.

**श्री. शंकर मगर :** बायजीपुरा इंदिरानगर या भागातील उंच भाग असलेल्या २/३ गल्लयांमध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. खालच्या व उत्तरातील नागरिकांना जास्त प्रमाणात पाणी मिळते. याबाबत मागील सभेत पुर्ण चर्चा करण्यात आली. त्याबाबत काय कार्यवाही केली. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : श्री. गायकवाड, कार्यकारी अभियंता आज कोर्टात गेलेले आहेत. ते आल्यानंतर त्यांना त्याबाबत स्वत: पाहणी करुन पाण्याबाबत नागरिकांच्या अडचणी दूर करण्यास सांगण्यात यावे.

**श्री. शंकर मगर :** लक्ष्मी कॉलनीमध्ये दोन लाईटचे पोल लावावयाचे होते त्याचे काय झाले?

**श्री. बनसोडे लाईट विभाग :** लाईटच्या पोल करीता निविदा मागविण्यात आल्या आहेत. पुढील आठवडयात पोल लावण्यात येतील.

**श्री. केशव सोनवणे :** मागील सभेत मा. उप आयुक्त यांनी सांगितल्याप्रमाणे सिडको हडको भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी तातडीची

उपाययोजना करण्याकरीता पाणी पुरवठा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची उदा. पाणी पुरवठा उप अभियंता, कनिष्ठ अभियंता व सब ओव्हर सिअर यांची बैठक उप आयुक्त यांनी घेऊन ज्या ज्या ठिकाणी पाणी पुरवठा होत नाही. त्या ठिकाणी हाफसा बसविण्याची व्यवस्था करण्यात येईल. असे ठरले होते. त्यासंबंधी अद्यापपर्यंत काय कार्य झाले. याची सविस्तर माहिती द्यावी.

**श्री. कलीम अख्तर :** सिडको हडको या भागाचा सध्या सर्व्हे चालु आहे. संबंधित सर्व्हे अधिकाऱ्यांकडून अद्याप पर्यंत रिपोर्ट आला नाही.

**मा. सभापती** : या ठिकाणी मा. उप आयुक्त यांनी स्वत:च लक्ष घालुन सर्व्हे रिपोर्ट मागवून घ्यावा. सिडको-हडको भागातील नागरिकांची पिण्याच्या पाण्यासंबंधी असलेल्या अडचणी दुर करण्यात सदरील भागात नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा फार त्रास आहे. हे लक्षात घेऊन त्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी. ज्या ठिकाणी विहीर उपलब्ध आहे. त्या ठिकाणी मोटर बसविण्याची व्यवस्था करावी ज्या भागात विहिर नाही तेथे हाफसे बसविण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे :** दिल्ली गेट येथील पिण्याच्या पाण्याची टाकी भरत नाही. कारण काही लोक पाण्याची पाईप लाईन फोडून पाणी घेतात.

**मा. सभापती** : याबाबत पाणी पुरवठा अधिकाऱ्यांनी त्या भागात जाऊन चौकशी करावी. व पाण्याची पाईप लाईन ज्या लोकांनी फोडली असेल त्यांच्या विरुध्द कार्यवाही करावी. नागरिकांना पाण्या करीता होणारा त्रास लवकरात लवकर दुर करावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरुपाचा असुनही उप आयुक्त यांनी अद्यापपर्यंत त्या संबंधित पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची मिटींग घेऊन नागरिकांच्या अडचणी दुर केल्या नाहीत. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : मा. उप आयुक्त यांनी त्वरीत संबंधित पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची मिटींग घेऊन नागरिकांच्या पाण्या विषयीच्या अडचणी त्वरीत दुर कराव्यात.

तसेच सन १९८८-८९ मध्ये मेसर्स सुरज टयूबवेल्स, औरंगाबाद या एजन्सीकडून शहरात बोर घेवून हापसे बसविण्यात आले होते. त्याच प्रमाणे यावर्षी मे. सुरज टयुब वेल्स यांच्याकडून ज्या भागात पाण्याचा त्रास आहे. तेथे बोर घेऊन हापसे बसविण्यात यावे. नगर रचना विभागाने जो ठराव पाठविला त्याप्रमाणे मोबदला देण्यात यावा. आजुबाजुच्या लोकांना ज्या ठरावीक दर दिले आहेत. त्याप्रमाणे इतरांनाही मोबदला देण्यात यावा.

**ठराव :**

वरील सर्व दुरुस्त्यांसह दि. १६-०४-९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८६/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. १३ मकसुद कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मी. मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करण्याबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ९८,१७०/- ला मा. आयुक्तयांची मंजुरी दि. १५-०१-९१ ला मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ८/जा. क्र./मनपा/बांध वि/१/१८८/९१ दि. १५-०१-९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा

विकल्या गेल्या व त्यापैकी दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-०१-९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रे. कन्स्ट्रक्शन | १६% जास्त |
| २) | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | २०% जास्त |

वरील पैकी अ. क्र. १ श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांची निविदा दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १६% जास्त दराची निविदा आहे.

दर कमी करण्याकरीता जा. क्र./मनपा/बांध वि./१/११५१/९१ दि. १९-०३-९१ रोजी पत्र दिले असता त्यांनी लेखी कळविले आहे की, मी १६% जास्त दराऐवजी १४.५०% जास्त दराने काम करण्यास तयार आहे.

सन १९९०-९१ चे दराशी तुलना केली असता गुत्तेदाराची निविदा २.२३% कमी येते. तरी सर्वात कमी दराची निविदा १४.५०% जास्त दराची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ मकसुद कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मी. मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करण्याबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% जास्त दराऐवजी १४.५०% जास्त दराने श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांनी सदरील काम करण्यास लेखी कळविल्यानुसार गुत्तेदार श्री. रे. कन्स्ट्रक्शन याचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८७/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टेटवार कॉलनी अजबनगर येथील अंतर्गत रोडचे काम करण्यासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. २७,९५०/- च्या अंदाजपत्रकास दि. २८-१२-९० ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना ( ) १९९०-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ०८-०१-९१ पर्यंत एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दिनांक ११-०१-९१ ला एकूण तीन (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | २५% कमी दराने |
| २) | श्री. गिरीश सिकची | २५% कमी दराने |
| ३) | श्री. मौला अली यार खॉंन | २% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षस २५% कमी दराने श्री. सुखबीरसिंग व श्री. गिरीश सिकची या दोन ठेकेदाराचे दर समसमान आलेले आहे. म्हणून दोघा ठेकेदारांना दर वाटाघाटीसाठी बोलावले असता श्री. गिरीश सिकची यांनी प्रकृती अस्वास्थामुळे काम करण्याची असमर्थता दर्शविल्यामुळे श्री. सुखबीरसिंग याची २५% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. टेटेवार कॉलनी, अजबनगर येथील अंतर्गत रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराने गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८८/४ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्षनगर स्लम भागात खांडकी पेव्हिंगचे काम करणे तसेच अस्तित्वात असलेल्या जुन्या पेव्हिंगची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ३०,४००/- ला मा. आयुक्त, महानगरपालिका यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (७) सात निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (३) तीन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक के. साबळे | १% जास्त |
| २) | श्री. ए. एम. फारुकी | २% जास्त |
| ३) | श्री. सलीम अहेमद | २% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. सलीम अहमद यांचे टेंडर कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी आहे.

करीता श्री. सलीम अहमद यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्षनगर स्लम भागात खांडकी पेव्हिंगचे काम करणे तसेच अस्तित्वात असेलेल्या जुन्या पेव्हिंगची दुरुसती करणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे गुत्तेदार श्री. सलीम अहमंद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८९/५ :**

मोहल्ला मजनुहिल येथील नगर भूमापन क्र. ११४३२ व ११४३६ पैकी ११ एकर जमिन ४०४६ चौ. मी. विभागीय कार्यालयाचे मागील जमीन खाजगी वाटाघाटीने संपादन करुन विभागीय कार्यालय झोन क्र. ३ चा विस्तार करणेबाबतची इमारत बांधणेसाठी जमिन मालक श्रीमती नवाब जानी बेगम भ्र पीर आलमशाह खान व श्री. मुजीब आलमशाह खाँन व इतर हयांचे मालकीची जमीन आपसातील तडजोडीने विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिका संपादन करीत असून, सदरचे मुल्यांकन करण्यात आले असून, ३० फुट रुंद रस्त्यासाठी येणारे क्षेत्र १११०.५१ चौ. मी. व एक एकर जमिन (की.) साठी (४०४६.०० चौ. मी.) मुल्यांकननुसार येणारी रक्कम अनुक्रमे ८,७७,९८२/- व ३,४४,२५८/- अशी एकूण येणारी रक्कम रु. १२,२२,२४०/- रु. बारा लाख बावीस हजार दोनशे चाळीस फक्त संबंधित जमीन मालक हयांना देण्यासाठी व जमीनीचा ताबा विकासासाठी घेणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीत आयुक्त कार्यालयाच्या मागील मजनुहिल येथील नगर भु. क्र. ११४३२ व ११४३१ पैकी १ एकर जमीन विभागीय कार्यालय झोन क्र. ३ करीता इमारत बांधण्याकरीता जमीन मालक श्रीमती नवाबजानी बेगम भ्र. पिर आलमशाह खान व मुजिब आलमशाह खान व इतर यांच्याशी खाजगी वाटाघाटीने व आपसातील तडजोडीने शहर विकासासाठी संपादन करुन जमीनीचे मुल्यांकन करण्यात आल्यानुसार येणारी रक्कम अनुक्रमे रु. ८,७७,९८२/- व रु. ३,४४,२५८/- अशी एकूण रक्कम रु. १२,२२,२४०/- संबंधित जमीन मालकास देण्यास व जमिनीचा ताबा घेण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**विषय क्र. ५९०/६ :**

औरंगाबाद विकास योजनेतील १०० फुट रुंद रस्ता मकाई गेट ते बिबीका मकबरा हया रस्त्याचा विकास करण्याचे काम महानगरपालिका तर्फे हाती घेण्यात आलेले असून, यात न. भू. क्र. १२०६-१२४४-१२४६-१२४७-१२४५-१२४८-१२४९-१२५१-१३०४ इत्यादी बाधीत होतात. यापैकी न. भू. क्र. १२४४ चे मालकाशी जमीन रस्त्यासाठी घेणेबाबतची तडजोड करण्यात आलेली आहे.

बिबीका मकबरा हे प्रेक्षणीय स्थान असून, पर्यटक हया स्थळाला भेटी देतात. त्यामुळे हा रस्ता विकसीत करणे आवश्यक असल्याने विकासाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदरचे रस्त्यात न. भू. क्र. १२४४ ही मिळकत क्षेत्र ५७७.४० चौ. मी. बाधीत होते. बाधीत होणारे भागाचे मुल्यांकन करण्यात आलेले असून, बाधीत भाग क्षेत्र १९१.४० चौ. मी. यास द्यावी लागणारी र. रु. १,१४,६००/- शहर अभियंता यांनी कळविली आहे. तसेच जमीन मालकास जमीनीचा दर प्रत्येक चौरस मीटरला रु. ३००/- (रुपये ३००/-) नुसार रु. १,७२,२२०/- देण्याचे ठरले आहे. सबब एकूण द्यावी लागणारी रक्कम रुपये २,८७,८२०/- (दोन लाख सत्याऐंशी हजार आठशे वीस) देऊन जमीन ताब्यात घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** दुसऱ्या एका अशाच प्रकरणात ज्या ठिकाणी ८० फुट रोड होता तो आपण ६५ फुटाचा केलेला आहे. प्रस्तावातील ठिकाणी १२/१५ नागरिकांची घरे रोडमध्ये बाधीत होत असतील तर हीच पध्दत याठिकाणी का अवलंबीत नाही.

**मा. सभापती** : सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येते. संबंधित नगरसेवक श्री. प्रभाकर विधाते व नगररचना विभागातील संबंधित अधिकारी यांनी स्वतः जाऊन व सदरील ठिकाणी किती जागा रोडमध्ये जाते ते पाहुन तेथील नागरिकांना मोबदला देण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर विकास योजने अंतर्गत मकई गेट ते बिबीका मकबरा या १०० फुट रुंद रस्त्यात बाधीत होणाऱ्या जमीनीपैकी न. भू. क्र. १२४४ च्या जमीन मालकाशी प्रत्यक्ष तडजोड करण्यात आल्या प्रमाणे न. भू. क्र. १२४४ मिळकतीचे क्षेत्र ५७७.४० चौ. मी. बाधीत होणाऱ्या भागाचे शहर अभियंता यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार बाधीत क्षेत्र १९१.४० चौ. मी. करीता रु. १,१४,६००/- तसेच जमीन मालकास जमिनीचा

(मोबदला) दर रु. ३००/- प्रति चौ. मिटर या दराने र. रु. १,७२,२२०/- असे एकूण रु. २,८७,८२०/- देऊन जमिन ताब्यात घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलिंद नगर व कबीर नगर येथील २० व ६ बैठकीचे सार्वजनिक शौच्यालयाची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ८९,४००/- ला मा. आयुक्त महानगरपालिका यांनी मंजुर केल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (८) आठ निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात आल्या असता ठेकेदाराने दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मेसर्स, शैलेश कन्स्ट्रक्शन | २४.८१% कमी |
| २) | श्री. राजसिंग | १५.६% कमी |

तुलनात्मकदृष्टया मसेर्स शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४.८१% कमी दराचे टेंडर मंजुरी साठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंद नगर, कबीर नगर येथील २० व ६ बैठकीचे सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.८१% कमी दराचे मेसर्स शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९२/८ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलिंद नगर स्लम येथे रेल्वे पुलाजवळील नाल्याच्या काठावर दगड कामात संरक्षित भिंत बांधण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ६७,७००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त महानगरपालिका यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) चार निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त झालेली निविदा उघडली असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मेसर्स शैलेश कन्स्ट्रक्शन | २२.८१% कमी |

प्राप्त झालेले एकच टेंडर मेसर्स शैलेश कन्स्ट्रक्शन यांचे असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.८१% कमी आहे.

करीता मे. शैलेश कन्स्ट्रक्शन याचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.८१% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंद नगर रेल्वेपुलाजवळ भिंत बांधण्यासाठी प्राप्त झालेली अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.८१% कमी दराची मसेर्स शैलेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९३/९ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव स्लम भागात खडी रस्त्याचे काम करणे तसेच खांडकी पेव्हिंगचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ७६,५५०/- ला मंजुरी मिळाल्यानुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (९) नऊ निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (३) तीन निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कैसरखान | १२.७८% कमी |
| २) | मे. एस. एच. असोशिएटस | १४% कमी |
| ३) | श्री. राजसिंग | २७.६% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री राजसिंग यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.६% कमी आहे.

करीता श्री. राजसिंग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.६ कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. नारेगांव स्लम भागात खडी रस्त्याचे काम करणे तसेच खांडकी पेव्हिंगचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.६% कमी दराचे गुत्तेदार श्री. राजसिंग यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९४/१० :**

वार्ड क्र. ११ जिव्हेश्वर को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी हस्तेसिंगपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. १,३२,५००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सदर रेखांकनात अद्यापही ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेली नाही व सदर सोसायटीचा १००% विकास निधी जमा झालेली आहे. मोहल्ल्यातील लोकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ११ जिव्हेश्वर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी हस्तेसिंगपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत चे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,३२,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९५/११ :**

वार्ड क्र. ४१ सादीया सिनेमा मागून रोषन मस्जिद पर्यंत दगडी नाली बांधणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,४५,६१५/- चे बनविण्यात आले आहे. सदरील नालीची लांबी २१६ मिटर आहे.

खोकडपुरा मधून येणारी नाली सादिया सिनेमाच्या खाजगी जागेतुन जाऊन टिळक रोड वरील नालीस येऊन मिळते. सादीया सिनेमाचे मालक सदरची नाली बंद करतात

त्यामुळे नालीचे घाण पाणी वाहुन रस्त्यावर जमा होते. त्यामुळे रहदारीस व येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो.

करीता सदरील नाली ही दलालवाडी रोषण मस्जिद जवळील अस्तित्वात असलेल्या नालीस जोडणे आवश्यक आहे.

तसेच सदरील अंदाजपत्रकातून रक्कम रु. ५०,०००/- हे संबंधित नगर सेवकाच्या निधीतुन करुन घेण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४१ सादिया सिनेमा मागून रोषन मस्जिद पर्यंत दगडी नाली बांधणेबाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,४५,६१५/- चे अंदाजपत्रकास तसेच अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी र. रु. ५०,०००/- चे संबंधित प्रभागाचे नगर सेवकाचे स्वेच्छा निधी मधून खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९६/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. ३१ राजा बाजार, जाधवमंडी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी सन १९९०-९१ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ३,८८,४७०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३१ राजाबाजार जाधवमंडी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ३,८८,४७०/- चे तयार अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९७/१३ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर (बायजीपुरा) स्लम भागात खडी रस्त्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ७१८५५/- ला मा. आयुक्त महानगरपालिका यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण बारा (१२) निविदा किवण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (तीन (३) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्यानंतर ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | अ. प. दरापेक्षा २५% कमी |
| २) | श्री. सै. तौफिक अहमद | अ. प. दरापेक्षा २५% कमी |
| ३) | श्री. गिरीश सिकची | अ. प. दरापेक्षा २०% कमी |

वरील प्रमाणे श्री. सुखबीरसिंग व सौ. तौफिक अहेमद यांचे दर समान म्हणजे २५% कमी आहे. त्यामुळे या समान दर असलेल्या ठेकेदारांना गोपनिय पत्र देऊन आणखी दर कमी करण्यास तयार असल्यास लेखी खुलासा मागविला असता.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग यांनी | २६% कमी |
| २) | श्री. सौ. तौफिक अहेमद | २५% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री सुखबीरसिंग यांचे दर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६% कमी आहे. करीता श्री. सुखबीरसिंग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संजयनगर (बायजीपुरा) स्लम भागात खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ७१,८५५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराचे गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग याचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९८/१४ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी स्लम भागात गटार बांधणे व ॲप्रोच रोड तयार करणे तसेच ४५० मी. मी. व्यासाची रोड क्रॉसिंग पाईप टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ७९,७००/- ला दि. १९-०२-९१ ला मंजुरी मिळाल्या नंतर सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (११) अकरा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्यां असता ठेकेदारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | २५.५% कमी |
| २) | मे. एस. एच. असोशिएटस | १५% कमी |
| ३) | श्री. कैसरखान | १८.७८६% कमी |
| ४) | श्री. स. रफिक | २०.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. सुखबिरसिंग यांचे तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.५% कमी दराचे टेंडर आहे. करीता श्री. सुखबिरसिंग यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.५% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बनेवाडी स्लम भागात गटार बांधणे व ॲप्रोच रोड तयार करणे तसेच ४५० मी. मी. व्यासाची रोड क्रॉसिंग पाईप टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ७९,७००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे गुत्तेदार श्री. सुखबीसिंग यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९९/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या ॲम्बॅसेडर कर्सचे ९१-९२ वर्षाकरीता स्पेअर पाटर्स खरेदीचे वार्षिक करार करण्यासाठी वर्तमान पत्रातून जाहिरात देऊन निविदा पत्रके मागविली असता एकच निविदा पत्रक प्राप्त झाले.

१) मे. वर्धमान मोटर्स, औरंगाबाद कंपनीचे प्राईजलीस्ट २२%

सदरील एजन्सी एच. एम. कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याने दरपत्रक मंजुरीस्तव व सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या ॲम्बेसेडर कार्सचे ९१-९२ या वर्षाकरीता स्पेअर पार्टस खरेदीचे वार्षिक करार करण्यासाठी प्राप्त झालेले एकमेव निविदा धारक मे. वर्धमान मोटर्स औरंगाबाद हे एच. एम. कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्यामुळे कंपनीचे प्राईजलिस्ट - २२% या दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६००/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या विविध जिपचे स्पेअर पार्टस खरेदीसाठी ९१-९२ वर्षाकरीता वर्तमानपत्रातुन जाहीरात देऊन निविदापत्रके मागविली असता एकूण दोन निविदापत्रके वसुल झाली. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. विकास ट्रेडर्स, औरंगाबाद | प्राईजलीस्ट | १९% |
| २) | मे. उदय ॲटोमोबाईल्स, | कंपनीचे प्राईजलिस्ट | २२% |

तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. विकास ट्रेडर्स औरंगाबाद यांचे आहे. मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या विविध जिपचे स्पेअर पार्टस खरेदीसाठी ९१-९२ वर्षाकरीता वार्षिक करार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे. विकास ट्रेडर्स औरंगाबाद यांचे कंपनीचे प्राईजलीस्ट = १९% चे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०१/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महापालिकेच्या विविध वाहनांसाठी टाटा कंपनीचे वाहनांसाठी लागणारे स्पेअर पार्टस खरेदीसाठी वर्तमान पत्रातुन जाहिरात देवून निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन दरपत्रके वसूल झाली. (वार्षिक करारासाठी)

| | | |
|---|---|---|
| १) | मे. तिरुपती ॲटोमोबाईल्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिटस | २०% |
| २) | मे. जैन ट्रेडर्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिटस | १८% |

सदरील दर ९१-९२ वर्षासाठी आहेत. सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांचे असून कंपनीचे प्राईज लिस्ट = १८% आहे. तरी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या विविध वाहनांसाठी टाटा कंपीनचे वाहनासाठी लागणारे स्पेअर पार्टस खरेदीसाठी वार्षिक करार करण्साठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे ९१-९२ वर्षासाठी असलेले दर मे. जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांचे कंपनीचे प्राईज लिस्ट = १८% या दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०२/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ९१-९२ वर्षाकरीता मेटॅडांर वाहनांचे स्पेअर पार्टस खरेदीसाठी करार करण्यासाठी वर्तमना पत्रातून जाहीरात देऊन निविदापत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झाली ती खालील प्रमाणे.

१) मे. विकास ट्रेडर्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिस्ट १९%
२) मे. उदय ॲटोमोबाईल्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिस्ट २१%

हयापैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. विकास ट्रेडर्स, औरंगाबाद यांचे आहे. मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९१-९२ वर्षाकरीता मेटॅडोर वाहनांचे स्पेअर पाटर्स खरेदीसाठी वार्षिक करार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे म्हणजे कंपनीचे प्राईज लिस्ट १९% कमी दराचे मे. विकास ट्रेडर्स, औरंगाबाद यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०३/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ९१-९२ हया वर्षाकरीता रोडरोलरला लागणारे स्पेअर पाटर्स खरेदीसाठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमान पत्रातुन जाहिरात देऊन निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदापत्रके वसुल झाली ती खालील प्रमाणे

१) मे. जैन ट्रेडर्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिस्ट १७%
२) मे. तिरुपती ॲटोमोबाईल्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिस्ट १८%

सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. जैन ट्रेडर्स औरंगाबाद यांचे असून, मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९१-९२ हया वर्षाकरीता रोडरोलरला लागणारे स्पेअर पाटर्स खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्यबाबत प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दर पत्रक प्राईजलिस्ट = १७% या दराने मे. जैन ट्रेडर्स औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०४/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ९१-९२ हया वर्षाकरीता ॲटो इलेक्ट्रीक जॉबवर्क साठीचे वार्षिक करारासाठी वर्तमान पत्रातुन जाहिरात देऊन निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झाली ती खालील प्रमाणे

१) मे. डी. सी. ॲटो इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद कंपनीचे प्राईज लिस्ट १३%
२) मे. विकास ट्रेडर्स औरंगाबाद प्राईज लिस्ट २१.५%

तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. डी. सी. ॲटो इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद याचे असून, मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९१-९२ हया वर्षाकरीता ॲटो इलेक्ट्रीक जॉबवर्क साठीचे कामासाठी वार्षिक करार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकापैकी सर्वात कमी दराचे प्राईज लिस्ट = १३१३% कमी दराचे मे. डी. सी. ॲटो इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०५/२१ :**

अतिरिक्त शहर अभियांत यांनी प्रस्ताव सादर केला की, ९१-९२ हया वर्षाकरीता स्प्रे पेंटींग साठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमान पत्रातून जाहिरात देऊन निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झाली.

१) मे. उस्मान गॅरेज, औरंगाबाद
२) मे. परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद

सर्वात कमी दर मे. परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद यांचे आहेत. ते मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९१-९२ हया वर्षाकरीता स्प्रे पेंटींगसाठी वार्षिक करार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे. परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०६/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ॲम्बॅसेडर कारचे जॉबवर्कसाठी वर्तमान पत्रातून जाहिरात देऊन निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन दरपत्रके वसूल झाली. ती खालील प्रमाणे (९१-९२ वार्षीक करारासाठी)

१) मे. डेक्कन मोटर्स वर्क्स, औरंगाबाद १३%
२) मे. फेमस गॅरेज, औरंगाबाद प्राईजलिस्ट ८%

हया पैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. फेमस गॅरेज, औरंगाबाद हयांचे असून, सदरील दर ९१-९२ हया वर्षाकरीता आहेत. तरी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ॲम्बेसडर कारचे जॉबवर्कसाठी सन ९१-९२ हया वर्षासाठी करार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकांपैकी तुनात्मकदृष्टया सर्वात कमी प्राईज लिस्ट ८% या दराने मे. फेमस गॅरेज औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०७/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, अजिंठा होटल सराफा ते नगरखाना गल्ली तसेच सु. ह. रस्त्यास तसेच नासगल्ली येथे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामासाठी सन १९९०-९१ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. २,२८,६५०/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदरखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजिंठा होटल सराफा ते नगरखाना गल्ली तसेच सु. ह. रस्त्यास तसेच नासगल्ली येथे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामासाठी सन १९९०/९१ च्या

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे तयार करण्यात आलेले र. रु. २,२८,६५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## ऐन वेळचे विषय

**विषय क्र. ६०८/२४ :**

वार्ड क्र. २ बेगमपुरा, विद्युत कॉलनी येथे दगडी गटार बांधणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ५९४२०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. ५१७/ दि. २६-०२-९० द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १९/२५६/९० दि. ०६-०३-९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता सव्वीस निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी दहा निविदा वसुल झाल्या असून, सर्वात कमी म्हणजे २८.२५% कमी दराची निविदा श्री. मो. इलियास यांची निविदा होती. संबंधित गुत्तेदार यांचे दर फारच कमी असल्यामुळे त्यांना रेट ॲनॅलिसिस दाखल करणेबाबत पत्रक देण्यात आले होते. परंतु सदर दर पृथ:करण ठिक वाटत नसल्यामुळे मा. आयुक्त साहेब यांनी फेरनिविदा मागविण्यास्तव दि. २३-०५-९० ला आदेश दिला.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/२९५/९० दि. ०१-०६-९० द्वार दुसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सतरा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी नऊ निविदा वसूल झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सिध्दार्थ आहेरे | २५.२५% |
| २) | श्री. शैलेश कन्स्ट्रक्शन | २७.२% |
| ३) | श्री. एम. बी. पाथरीकर | १७.७% |
| ४) | श्री. एम. ए. माईद | २०.०% |
| ५) | श्री. स. अथर अली | ११.०% |
| ६) | श्री. स. आलम जाफरी | १२.९९% |
| ७) | श्री. अमिनउद्यीन खान | २३.०% |
| ८) | श्री. स. सिराजुद्यीन | २३.०% |
| ९) | श्री. एस. ए. बहाउद्दीन | २९.०% |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०% कमी दराचे श्री. एस. ए. वाहोद्यीन यांचे दरपत्रक आहे. व सदरील निविदेस दरपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र. २३३/२२ दि. १४-११-९० द्वारे मंजुरी मिळालेली आहे. तद्‌नंतर संबंधित गुत्तेदार २% अनामत व करारनामा दाखल करणेस्तर पत्रक देण्यात आलेले होते. तरी संबंधित गुत्तेदार एस. ए. वाहोद्यनी यांनी दि. ०६-१२-९० ला कळविले की, मी निविदा कार्यालयात दाखल करुन ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. मार्केट मध्ये मटेरियलचे दर वाढलेले आहेत. तरी मी काम करु शकत नाही. माझे १% इसाऱ्याची रक्कम परत (द्यावी) करावी. असे लेखी दिले नंतर मा. आयुक्त साहेब यांच्या दि. १७-०२-९१ च्या आदेशानुसार संबंधित दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या लोयेस्ट क्रमांकावरील गुत्तेदार यांना दिनांक १२-०३-९१ ला वाटाघाटी करीता पत्र देण्यात आले होते. तरी सदर दोन गुत्तेदाराने अर्ज देऊन आपले दर कार्यालयात दाखल केलेले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सिराजुद्यीन | १८.१०% कमी |
| २) | सिध्दार्थ अहिरे | १८.२०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२०% कमी दराचे श्री. सिध्दार्थ अहिरे यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २ बेगमपुरा, विद्युत कॉलनी येथे दगडी गटार बांधणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२०% कमी दराचे गुत्तेदार श्री. सिध्दार्थ अहिरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०९/२५ :**

उप अभियंता विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, विशेष कार्यक्रमाअंतर्गत जलनिःसारणाची पाईप लाईन टाकण्याचे काम चाुल आहेत. त्या अंतर्गत मेनहोल चेंबर बांधून तयार आहेत. व त्यावर पुर्ण कास्टींम, एस. एफ. आरसी फ्रेम व कव्हर बसविणे बाकी आहेत. एस. एफ आरसी फ्रेम व कव्हर कंपनीकडून खरेदी करण्यासाठी (रु. १०,४२,३००/-) प्रगट निविदा बोलावल्या असता फक्त एकच निविदा विकली गेली व एकच निविदा श्री. के. के. मेनहोल आणि ग्रेटींग कं. नासीक यांची प्राप्त झाली आहे. एस. एफ. आरसी फ्रेम कव्हर हेवी डयुटी साठी रु. ६५९=०० प्रति नग असा दर आला आहे. हा दर अंदाजपत्रकापेक्षा ५. ८५% कमी आहे.

तेव्हां के. के. मेनहोल आणि ग्रेटींग कं. नासीक यांचा प्रतिनग रु. ६५९=०० चा दर (अंदाजपत्रकापेक्षा ५.८५% कमी) मंजुरीचा प्रस्ताव स्विकारण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशेष कार्यक्रम अंतर्गत जलनिःसारणाची पाईप लाईन टाकणेचे काम चालु असून, त्या अंतर्गत मेन होल चेंबर बांधून तयार आहेत त्यावर पुर्व कास्टींग एस. एफ. आरसी फ्रेम व कव्हर कंपीनकडून खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १०,४२,३००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेले श्री. के. के. मेनहोल आणि ग्रेटींग कंपनी, याचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.८५% कमी तसेच रु. ६५९/- प्रति नग या दराचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६१०/२६ :**

उप अभियंता जलनिःसारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन नगर व कबीर नगर स्लम भागात १५० मी. मी. व २५० मी. मी. तसेच ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ५,८६,१००/- ला मा. आयुक्त म.न.पा. यांची मंजुरी मिळाली. सदर काम ९१-९२ च्या शासकीय विशेष अनुदानातून करुन घ्यावयाचे आहे. सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोरी निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) पाच कोऱ्या निविदा विकण्यात आल्या. मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस एकूण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडया असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पि. जे. तमखाने | १३.३३% जास्त |
| २) | श्री. बी. अे. काल्डा | २५% जास्त |
| ३) | श्री. एल. एम. चंचालाणी | १९.००% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. पि. जे. तमखाने यांचे टेंडर कमी दराचे असून, अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३.३३% जास्त आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक जुन्या डी. एस. आर. चे दराप्रमाणे आहे. व ठेकेदाराचे दराची चालु वर्षाचे डी. एस. आर. चे दराशी तुलना केले असता त्यांचे दर २.४१% कमी येतात. करीता श्री. पी. जे. तमखाने यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३.३३% जास्त दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेननगर, कबीरनगर स्लम भागात १५० मी. मी., २५० मी. मी., ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.३३% जास्त दराचे गुत्तेदार श्री. पि. जे. तमखाने याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या नंतर आजची सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३० एप्रिल १९९१ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभागृहात मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष स्थायी समितीचे आयोजन करण्यात आले होते. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सदस्य मा. आयुक्त, उप आयुक्त व इतर अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
२) श्री. जैस्वाल प्रदिपकुमार शिवनारायण
३) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
४) स. अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
५) श्री. बारवाल गजानन रामकिसन
६) श्री. मो. इस्माईल अ. करीम
७) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
८) श्री. सोनवणे केशव काशीनाथ

**संवाद :**

**मा. सभापती** : आजच्या विशेष स्थायी समितीमध्ये दोन विषय स. सदस्यांच्या निर्णयास्तव ठेवण्यात आलेले आहेत. विषय क्र. १ चा अहवालही आपणासमोर ठेवण्यात आलेला आहे. तेंव्हा त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** विषय क्र. १ हा न्यायप्रविष्ट असल्यामुळे या सभागृहात त्यावर चर्चा करता येणार नाही. तेंव्हा हा विषय वगळून विषय क्र. २ वर चर्चा करण्यात यावी.

**मा. उपायुक्त** : श्री. सोनी यांनी कार्यालयात दाखल केलेले प्रकरण व विषय पत्रिकेवरील विषय हे भिन्न आहेत. याबाबत महापालिकेने श्री. पी. आर. देशमुख " ॲडहोकेट " यांचे मत मागविले. त्यांनी कळविले आहे की, दोन्ही प्रश्न भिन्न आहेत.

त्यावर या सभेत चर्चा करता येऊ शकते. (श्री. देशमुख, ॲडहोकेट यांचे मुळ इंग्रजी पत्र मराठीत अनुवाद करुन सभागृहात उप आयुक्तांनी वाचून दाखविले.) कारण या विषाया अंतर्गत श्री. सोनी यांच्यावर आर्थिक स्वरुपाचे अकेक्षण विभागाचे आक्षेप लावलेले आहेत व त्यासंदर्भानेच ही चौकशी आहे. त्यामुळे ही चौकशी करण्यात काही गैर नाही. श्री. देशमुख यांनी त्यांच्या पत्रात नमुद केलेले आहे की, संबंधितावर जे अकेक्षण आक्षेप आहेत त्यास उत्तर देण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात यावा. त्यानुसार कार्यालयाने श्री. सोनी यांना आपले म्हणणे प्रशासनासमोर मांडता यावे. यासाठी पुरेसा अवधी दिलेले असून, त्यांनी आपले म्हणणेही प्रशासनासमोर लेखी स्वरुपात सादर केलेले आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** श्री. सार्नी यांना काही कागदपत्रे हवी होती. त्यांनी तशा स्वरुपाचे पत्रही कार्यालयास सादर केले होते. परंतु अद्याप त्यांनी मागतिलेली कागदपत्रे त्यांना पुरविण्यात आलेली नाहीत. उच्च न्यायालयाने श्री. सोनी यांच्या केसमध्ये असा निर्णय दिला होता की, स्थायी समितीने एखाद्या

प्रकरणात निर्णय दिल्या नंतर आयुक्तांना सर्वसाधारण सभेसमोर ते प्रकरण पाठविता येत नाही.

**मा. आयुक्त** : अशा प्रकारी रुलींग उच्च न्यायालयाने दिली म्हणता रेकॉर्डवर ते तसे नाही. सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासन जाऊ शकते किंवा नाही हा मॅटर पेंडींग आहे. स्थायी समिती नंतर ॲपीलेट ॲथॉरिटी ही सर्वसाधारण सभा आहे. सर्वसाधारण सभेने यात रि-डिसीजन घ्यावा असा निर्णय दिलेला आहे. ऑडीट रिपोर्टमध्ये श्री. सोनीयांच्या विरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केलेले आहेत. यात आर्थिक बाबींचा संबंध असल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या निर्देशाप्रमाणे स्थायी समितीसमोर पाठविणे अगत्याचे आहे. ऑडीट रिपोर्टवर स्थायी समितीसमोर ठेवणे हे प्रशासनाचे कर्तव्यच आहे.

**श्री. केशव सोनवणे :** दि. २०-०३-९१ आदेशान्वये होणारी विभागीय चौकशी थांबवावी असा उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे.

**मा. सभापती** : श्री. सोनी यांनी न्यायालयात अपिल केलेला प्रश्न व आज समितीसमोर ठेवण्यात आलेला प्रश्न हे दोन्ही भिन्न स्वरुपाचे आहेत.

**मा. आयुक्त** : विभागीय चौकशी थांबविण्यात यावी असा न्यायालयाने आदेश दिलेला नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** संबंधित अधिकाऱ्यांची बाजू ऐकल्यानंतर या प्रश्नावर चर्चा करण्यात यावी. व नंतरच निर्णय घेण्यात यावा.

**श्री. केशव सोनवणे :** स्थायी समितीकडे न्याय मागण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने अपिल केलेले आहे. जसेच ते कोर्टातही गेलेले आहेत. एकाच विषयाच्या संदर्भाने दोन केसेस चालविता येऊ शकतात का?

**मा. सभापती** : दोन्ही केसेस वेगवेगळया स्वरुपांच्या आहेत.

**श्री. प्रभाकर विधाते :** केस कशाच्या संदर्भाने चालु आहे.

**मा. आयुक्त** : ऑडीट रिपोर्ट आपणासमोर ठेवण्यात आलेला आहे. यात आर्थिक स्वरुपाचे आरोप असल्यामुळे या स्थायी समितीचा निर्णय झाल्यानंतर ते पुढील कार्यावाहीस्त सर्वसाधारण सभेसमोर मांडले जातील. सर्वसाधारण सभेसमोर असे प्रश्न पाठविण्यापुर्वी स्थायी समितीसमोर ते ठेवणे आवश्यक आहे. म्हणून आज हा प्रश्न स्थायी समिती समोर विचारार्थ व निर्णयास्तव ठेवलेला आहे. सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणेच हा प्रस्ताव आज विचारार्थ स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** ऑडीट रिपोर्टच्या प्रति संबंधित अधिकाऱ्यांस देण्यात याव्यात. त्यावर त्याची बाजू ऐकून घेऊन नंतरच त्यावर निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्याने मागितलेली कागदपत्रे व रिपोर्टची प्रतही त्यांना देण्यात आलेली आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. केशव सोनवणे :** संबंधित अधिकाऱ्याने ऑडीट रिपोर्टवर आपला खुलासा सादर केल्यानंतरच या प्रकरणात निर्णय घेण्यात यावा. यापुर्वी प्रशासनातर्फे स्थायी समिती व सर्वसाधारण यांच्या समोर ठेवण्यात आलेले प्रश्न हे वेगवेगळया स्वरुपाचे कसे होते. याचा खुलासा करावा.

**श्री. गील इकबालसिंह :** आजच्या सभेत विधी सल्लागार का उपस्थित नाहीत. तसेच ऑडीट रिपोर्टची कॉपी संबंधित अधिकाऱ्यास दिली काय हे स्पष्ट करण्यात यावे.

**उप आयुक्त** : श्री. सोनी यांना १६-०३-९१ रोजी चार्ज शिट देण्यात आलेले आहे. त्याबरोबरच सर्व कागदपत्रेही दिलेली आहेत.

**श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. इकबालसिंग गील :** ऑडीट रिपोर्टवर संबंधित अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात यावी व त्या उत्तरासह संपुर्ण प्रकरण एकत्रीतपणे विचारार्थ स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** श्री. सोनी यांनी मागितलेली संपुर्ण कागदपत्रे त्यांना देण्यात आलेली नाहीत. प्रथम ती कागदपत्रे त्यांना देण्यात यावीत.

**मा. आयुक्त** : संबंधित अधिकाऱ्याने मागितलेली कागदपत्रे प्रशासनातर्फे अगोदरच देण्यात आलेली आहेत. केवळ चौकशीत विलंब कसा करता येईल. यासाठी हे सर्व चालु आहे.

**श्री. केशव सोनवणे :** विषय क्र. १ वर चर्चा न करता विषय क्र. २ चर्चेसाठी घेण्यात यावा.

**विधी सल्लागार** : श्री. सोनी यांनी उच्च न्यायालयात एक अर्ज दाखल केलेला आहे की, सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये. त्यावर २०-०४-९१ रोजी सुनावणी होऊन संबंधिताने हे प्रकरण न्यायालयातून काढून घ्यावे असा न्यायालयाने हुकूम दिलेला आहे. त्यामुळे महानगरपालिका त्यांच्या विरुध्द कोणतीही ॲक्शन घेऊ शकते.

**मा. आयुक्त** : संबंधित अधिकाऱ्यांस दोषारोपन पत्रावर वेळ देण्यास कोणतीही हरकत नाही. मात्र स्थायी समितीची जबाबदारी आहे की, प्रशासनाने तिच्यासमोर ठेवलेली कागदपत्रे एकदा वाचून पहावीत व नंतरच त्यावर निर्णय घ्यावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** प्रथम या ऑडीट रिपोर्टवर संबंधिताचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. जर ते यात खरोखरच दोषी असतील तर, त्यांच्या विरुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्याने ऑडीट रिपोर्टवर आपले म्हणणे प्रशासनासमोर सादर केलेले असून, त्याची एक प्रत सर्व स्थायी समिती सदस्यांना दिलेली आहे. आपण ते वाचलेच असेल तेंव्हा त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**श्री. केशव सोनवणे :** येथे कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. घाई गर्दीत निर्णय घेऊन कोणावर अन्याय होवू नये. एव्हढेच आमचे म्हणणे आहे.

**श्री. गजानन बारवाल :** संबंधित अधिकाऱ्याचे म्हणणे मला आज सभेत येत असतांनाच प्राप्त झालेले आहे. बहुतेक सदस्यांनाही ते आजच मिळाल्याचे समजते.

**मा. आयुक्त** : प्रशासनाने बनवलेला अहवाल प्रथम सभासदांनी वाचून पहावा. कोणाबद्दलही आक्रश दृष्टीने निर्णय घेण्यात आलेला नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** या सभेत चर्चा करण्यात यावी किंवा कसे याबाबत मतदान घेण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे :** बहुसंख्य सभासदांनी मागणी केली तर कोणता प्रश्न चर्चेस घेता येऊ शकतो. याची कायद्यात तरतुद आहे.

स. सभासदांनी सभात्याग करण्यास सुरुवात केली असतांनाच मा. सभापतींनी १२.१५ वाजता सभा संपल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-०५-९१ रोजी सकाळी ११.०० वाजता टाऊन हॉल येथे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापतीच्या निवडणूकीस्त दिनांक १०-०५-९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीचे इतिवृत्तांत व विशेष बैठक आयोजीत करण्यात आली होती. बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४) श्री. मो. इस्माईल अ. करीम
५) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
६) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
९) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
१०) श्री. जावेद हसनखॉ कासीम हसनखॉ

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापतीची निवड करणे.

**संवाद :**

**मा. आयुक्त** : सर्वप्रथम मा. आयुक्तांनी विषयपत्रिका वाचून दाखविली अधिनियमाचे अनुसूचीतील प्रकरण २ कलम ३ (५) तसेच कलम २१ (ए) अन्वये स्थायी समितीच्या सभापतीची निवड करण्यासाठी आजची सभा आयोजीत करण्यात आली आहे. श्री. रतनकुमार पंडागळे यांची स्थायी समिती सभापती पदाची मुदत संपलेली असून सध्या स्थायी समितीची कुणीही सभापती नाही. आजच्या सभेचे कामकाज चालविण्याकरीता तात्पुरता सभापती निवडणे आवश्यक आहे. जो आजच्या सभेचे कामकाज पाहिल. उपस्थित सभासदांपैकी सर्वानुमते एका उमेदवारास आजरी सभा चालविण्यासाठी सभापती म्हणून निवडण्यात यावे. या सभापतीस निर्णायक मत देण्याचा अधिकारही असेल. तेंव्हा आपण एका सभासदास आजच्या सभेचे तात्पुरते सभापती पद स्विकारण्याबाबत सुचवावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** आजच्या सभेचे तात्पुरते सभापतीपद सांभाळण्यासाठी मी श्री. गजानन बारवाल यांचे नांव सुचवित आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** श्री. हाळनोर यांनी दिलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** आजच्या सभेचे तात्पुरते सभापती पद श्री. मं. इस्माईल यांना देण्यात यावे.

**श्री. अलिम बेग :** श्री. भगुरे यांच्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त** : आजच्या सभेचे तात्पुरत्या सभापती पदांसाठी दोन उमेदवारांची नांवे पुढे आलेली आहेत. अशा परिस्थितीत मतदानाने हे सभापती पद कोणास द्यावे ते ठरवावे लागेल. मतदानाच्या दोन पध्दती आहेत. एक गोपनिय मतदान व दुसरी हात वर करुन मत दर्शविणे. आजच्या सभेचे सभापती पद हे तात्पुरते असल्यामुळे हात वर करुन आपले मत दोन्ही पैकी एका उमेदवारास दर्शवावे. म्हणजे त्यांना तात्पुरते सभापती पद देता येईल.

**श्री. इकबालसिंग गील :** हात वर करुन मतदान घेण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे :** विधी सल्लागार यांनी याबाबतीत आपले मत दर्शवावे.

**विधी सल्लागार :** नियमामध्ये अशाप्रकारची तरतुद नाही. सर्वानुमते जो निर्णय होईल तो अंतिम असेल.

**श्री. केशव सोनवणे :** असे असेल तर हा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा.

**मा. आयुक्त** : आयुक्त हे एक महिन्याच्या आत सभापती पदासाठीची निवडणूक दुसऱ्यांदाही बोलावू शकतो. त्यामुळे हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्याची आवश्यकता वाटत नाही. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २ मध्ये सभापतीच्या निवडी बाबत माहिती दिलेली आहे. अनुसूचीचे प्रकरण २ मधील कलम (ई) मध्ये सभापती पदाच्या निवडीबाबत माहिती दिलेली आहे. यामध्ये तात्पुरत्या सभापतीची निवड गुप्त मतदानाने घेण्याबाबत उल्लेख नाही.

तात्पुरत्या सभापतीसाठी जी दोन नांवे सभागृहासमोर आली होती. त्यांचेसाठी हात वर करुन मतदान घेतले असता श्री. बारवाल यांचे नांव श्री.सोनवणे यांनी सुचित केले व त्यास श्री. विधाते यांनी अनुमोदन दिले, श्री. बारवाल यांना उपस्थित सभासदांपैकी चार तर श्री. इस्माईल याचे नांव श्री. भगुरे यांनी सुचविले, त्यांना उपस्थित सभासदांपैकी चार मते मिळाली दोन सभासद तटस्थ राहिले.

**श्री. केशव सोनवणे :** दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाली आहेत. तेव्हा विषय सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्यात यावा.

**मा. आयुक्त** : या पुर्वी मुंबई महानगरपालिका सारख्या महानगरपालिकेस अशा प्रकरचा प्रश्न उद्‌भवला होता. आयुक्त दुसऱ्यांदा बैठक बोलावू शकतात.

**श्री. म. इस्माईल :** एक महिन्यानंतर हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर जाऊ शकते.

**श्री. इकबालसिंग गील :** आपणास बैठक बोलविण्याचा अधिकार आहे. तेंव्हा आपण पुढील तारीख द्यावी.

**मा. आयुक्त** : एक महिन्याच्या आत जर स्थायी समितीच्या सभापतीची निवड झाली नाही. ते हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर जाऊ शकते. स्थायी समिती सभापतीची निवड करण्याबाबतची पुढील बैठक १८ मे. ९१ रोजी सकाळी ११=०० वाजता घेतली जाईल.

**श्री. गजानन बारवाल :** आपण पुढील बैठक १७ तारखेस घेण्यात अशी रुलिंग दिलेली आहे. तेंव्हा ही बैठक १७ तारखेस घेण्यात यावी.

**श्री. म. इस्माईल :** आपण स्थायी समितीच्या सभापतीच्या निवडी बाबतची बैठक १८ तारखेस सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल असे घोषित केलेले आहे. तेंव्हा ही बैठक १८ तारखेसच घेण्यात यावी.

आजच्या बैठकीत स्थायी समिती सभापतीची निवड न झाल्यामुळे सभापतीची निवड दिनांक १८ मे ९१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेतली जाईल. अशी घोषणा करुन सभेचे कामकाज संपल्याचे मा. आयुक्तांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-०५-९१ रोजी तहकूब झालेली व दि. १८-०५-९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त दिनांक १०-०५-९१ रोजी तहकुब करण्यात आलेली विशेष स्थायी समितीची सभा शनिवार दि. १८-०५-९१ रोजी सकाळी (अकरा वाजता) ११.०० वाजता आयोजित करण्यात आली. या सभेस मा. उप आयुक्त, स. नगरसेवक व निवडणूकीच्या कामाकरीता नियुक्त करण्यात आलेले मनपा अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४) श्री. मो. इस्माईल अ. करीम
५) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
६) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
९) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
१०) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
११) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
१२) श्री. जावेद हसनखॉ कसीम हसनखॉ

सभेस ११.०० वाजता सुरुवात झाली.

**मा. उप आयुक्त :** दि. १०-०५-९१ रोजी घेण्यात आलेल्या विशेष स्थायी समितीची सभा स्थगित झाल्यामुळे आज दिनांक १८ मे ९१ रोजी अधिनियमातील अनुसुचिचे प्रकरण २ मधील कलम ३ (ब) तसेच कलम २१ (१) अन्वये स्थायी समितीच्या सभापतीची नेमणूक करण्याकरीता सभा बोलावण्यात आलेली आहे. सभापतीचे पद रिकामे असल्यामुळे व या सभेला सभापतीची निकड असल्यामुळे अनुसुचीचे प्रकरण २ मधील ३ (ई) अन्वये आजच्या सभेच्या सभापतीसाठी सर्वानुमते तात्पुरता सभापती नियुक्त करावा. सर्वानुमते नियुक्त केलेला सभापती हा तात्पुरत्या स्वरुपाचा असला तरी त्यांना दुसरे किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील. तरी आपण आजच्या सभेसाठी आपणामधून सर्वानुमते सभापती म्हणून कोणाही एका सदस्यांची तात्पुरती नेमणूक करुन त्यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करावे.

**श्री.गजानन बारवाल :** आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी तात्पुरते सभापती म्हणून मी श्री. इकबालसिंग गील यांचे नांव सुचवितो.

**श्री.प्रभाकर विधाते :** श्री. बारवाल यांनी सुचविलेल्या श्री. गील यांच्या नांवास मी अनुमोदन देतो.

**श्री.अलिम बेग :** आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी तात्पुरत्या सभापती पदासाठी मी. श्री. तुळशीराम भगुरे यांचे नांव सुचवितो.

**श्री म. इस्माईल :** श्री. भगुरे यांच्या नांवास माझे अनुमोदन आहे.

**मा. उप आयुक्त :** आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी तात्पुरत्या सभापतीची निवड करण्यासाठी दोन नांवे सुचविण्यात आलेली आहेत. श्री. इकबालसिंग गील यांचे नांव श्री. गजानन बारवाल यांनी सुचविले आहे. व त्यास श्री. विधाते यांनी अनुमोदन दिले आहे. तसेच श्री. तुळशीराम भगुरे यांचे नांव श्री. अलिम बेग यानी सुचविले आहे. व त्यास श्री. मोहंमद इस्माईल यांनी अनुमोदन दिलेले आहे. प्राप्त परिस्थितीत तात्पुरता सभापती निवडण्यासाठी हात वर करुन मतदान घेण्यात येत आहे.

१) श्री. इकबालसिंग गील ६ मते
२) श्री. तुळशीराम भगुरे ६ मते

उप आयुक्तांनी हात वर करुन मतदानाचे आवाहन केले असता दोन्ही उमेदवारांना सहा मते मिळाली.

**श्री. मो. इस्माईल :** ३० तारखेपर्यंत या प्रकरणात स्थायी समितीच विचार होईल. तत्पुर्वी हे प्रकरण आपण हे प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे पाठवू शकत नाही.

**श्री. केशव सोनवणे :** आतापर्यंत झालेल्या दोन्ही स्थायी समितीच्या बैठकांमध्ये तात्पुरत्या अध्यक्षासाठी समसमान मते पडल्यामुळे बैठक तहकूब करण्यात आली. तेंव्हा हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर पाठविणे उचित होईल.

**श्री. मो. इस्माईल :** ३१ तारखेपर्यंत आपण या विषयावर स्थायी समितीतच निर्णय घेऊ शकतो. ते सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्याची आवश्यकता नाही. कायद्याच्या आधारे हे प्रकरण आपण ३० तारखेपर्यंत सर्वसाधारण सभेसमोर पाठवू शकत नाही.

**श्री. गजानन बारवाल :** एकाच प्रश्नावर दोन वेळा बैठक तहकूब झालेली आहे. आता हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर निर्णयार्थ पाठविण्यात यावे.

**मा. उप आयुक्त :** दोन्ही बाजुस समान मते मिळालेली आहेत. ३० दिवसाच्या आंत स्थायी समिती सभेत तिचा सभापती निवडला जातो. आजची सभा तहकूब करण्यात येते व पुढील बैठक दि. २९ मे ९१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल व त्यात स्थायी समिती सभापतीची निवड केल्या जाईल.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९ मे. ९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त दिनांक २९ मे. १९९१ रोजी स्थायी समिती सभापतीची निवडणूक घेण्याकरीता विशेष स्थायी समितीचे आयोजन करण्यात आले होते. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सभासद तथा मा. उप आयुक्त व निवडणूक कामाकरीता नियुक्त करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४) श्री. मो. इस्माईल अ. करीम
५) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
६) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
९) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
१०) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
११) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
१२) श्री. जावेद हसनखॉ कसीम हसनखॉ

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापतीची निवड करणे.

**संवाद :**

**मा. उप आयुक्त :** दि. १८-०५-९१ रोजी घेण्यात आलेल्या विशेष स्थायी समितीची सभा स्थगित झाल्यामुळे आज दि. २९-०५-९१ रोजी अधिनियमामधील अनुसुचीचे प्रकरण २ मधील कलम ३ (ब) तसेच कलम २१ (१) अन्वये स्थायी समितीच्या सभापतीची नेमणूक करण्याकरीता सभा बोलावण्यात आलेली आहे. सभापतीचे पद सध्या रिक्त असल्यामुळे व या सभेला सभापतीची निवड करावयाची असल्यामुळे अनुसुचीचे प्रकरण २ मधील कलम ३ (ई) अन्वये आजच्या सभेच्या सभापतीसाठी सर्वानुमते तात्पुरता सभापती नियुक्त करावा सर्वानुमते नियुक्त केलेले सभापती हे तात्पुरत्या स्वरुपाचे असेल तरी, त्यांना दुसरे किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील तरी आपण आजच्या सभेसाठी उपस्थित असलेल्या सभासदांमधून सर्वानुमते या सभेसाठी सभापती म्हणून कोणही एका स. सदस्यांची नेमणूक करुन त्याचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करावे.

**श्री. मो. इस्माईल :** आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी मी तात्पुरते सभापती म्हणून श्री. भगुरे तुळशीराम यांचे नांव सुचवितो.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** श्री. भगुरे यांच्या नांवास माझे अनुमोदन आहे.

**मा. उप आयुक्त** : आजच्या सभेसाठी तात्पुरते सभापती म्हणून श्री. भगुरे तुळशीराम यांचे नांव आलेले आहे. श्री. भगुरे तुळशीराम यांनी आजच्या सभेसाठी तात्पुरते सभापती म्हणून काम पहावे.

**मा. सभापती** : सभापती पदासाठी जी नामांकन पत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी जर कोणास आपले नामांकन पत्र परत घ्यावयाचे असेल तर त्यासाठी १० मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. तथापी मतपत्रिका वगैरे तयार करण्यासाठी लागणार अवधी लक्षात घेता सभा १२.०० वाजता पुर्ववत सुरु होईल. तोपर्यंत सभा तहकूत करण्यात येते.

सभा १२.०० वाजता पुर्ववत सुरु होईल. तोपर्यत सभा तहकुब करण्यात येते.

१२.०० वाजता सभेस पुर्ववत सुरुवात झाली.

मतपेटी सर्वांसमक्ष उघडून दाखवून सिलबंद करण्यात आली व मतदानास प्रारंभ करण्यात आला. १२.०० वाजता मतदान संपले. मतदान अधिकाऱ्यांनी मतपेटी मा. सभापतींकडे सुपुर्द केली मत पत्रकांची छाननी झाल्यानंतर स. सभापतींनी आपला निर्णय जाहीर केला.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. म. इस्माईल | ८ मते |
| २) | श्री. केशव सोनवणे | ४ मते |
| | वैध मते | १२ |
| | अवैध मते | ० |
| | **एकूण मते** | **१२** |

श्री. म. इस्माईल यांना १२ पैकी ८ मते मिळून ते सभापती पदासाठी विजयी उमेदवार ठरल्याचे स. सभापतींनी जाहरी केले.

नवनिर्वाचित सभापतींनी सुत्रे स्विकारुन सर्व उपस्थितांचे आभार मानले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ६ जून १९९१ रोजी दुपारी ३.०० वाजता विशेष स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसे खालील सन्माननीय सदस्य व मा. आयुक्त उप आयुक्त तथा इतर अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. जावेद हसनखॉ कसीम हसनखॉ
५) श्री. भगुरे तुळशीराम छगन
६) श्री. बारवाल गजानन रामकिसन
७) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
८) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
९) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

**सचिव** : मा. सभापती श्री. मो. इस्माईल यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे आजच्या विशेष स्थायी समिती सभेस ते उपस्थित राहु शकत नाहीत. तेंव्हा उपस्थित सभासदांमधून सर्वानुमते एका सभासदांची आजच्या सभेपुरते सभापती म्हणून निवड करण्यात यावी.

**श्री. इकबालसिंग गील :** आजच्या सभेचे सभापतीचे काम पाहण्यासाठी मी श्री. भगुरे यांचे नांव सुचवितो.

**श्री. मिर्झा अलिम बेग :** भगुरे यांच्या नांवास माझे अनुमोदन आहे.

**विषय क्र. २ :**

प्रस्तावित करण्यात येते की, दि. ०१-०४-९० पासून महानगरपालिकेने सिडको परिसरातील मालमत्ता कर वसुलीचे काम सुरु केल्यामुळे सिडको प्रशासनाने दि. ०१-०४-९१ पुर्वी घेत असलेल्या साफसफाई कर (सर्व्हिस चार्जेस) घेणे बंद केले आहे. ज्यामुळे सिडको विभागाचे साफसफाईचे काम महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. सध्या सिडको येथे प्रचलीत असलेली साफसफाईच्या कामाची कॉन्ट्रक्ट पध्दत महानगरपालिकेला फायदेशीर पडणार आहे. असे महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या पाहणीत निदर्शनास आलेले आहे. कारण गुत्तेदाराला दरमहा रक्कम रु. ३९,०००/- इतका खर्च येतो. त्यामुळे सध्या ज्या गुत्तेदारामार्फत साफसफाईचे काम करुन घेण्यात येते. त्यांनाच दिनांक ३१-०३-१९९२ पर्यंत कायम ठेवणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** दि. ०१-०४-९० पासून सिडकोतील मालमत्तांना टॅक्स लावण्यात आलेला आहे. असे विषय पत्रिकेत म्हटलेले नाही. ०१-०४-९० ते ०१-०६-९१ पर्यंतच्या कालावधीत अनेक सर्वसाधारण सभा झालेल्या आहेत. लोकनियुक्त प्रतिनिधीही मनपामध्ये आहेत. परंतु सिडकोच्या टॅक्स बाबत अशा बैठकीमध्ये काहीही माहिती देण्यात आलेली नाही. त्या कालावधीत सिडकोतील

मालमत्ता कराबाबत सभागृहात काहीही माहिती देण्यात आलेली नाही. ही प्रशासनाची चूक आहे. या शहरातील लोक नियुक्त प्रतिनिधी यांचे म्हणणे काय आहे. हे लक्षात न घेता हा प्रस्ताव सभागृहासमोर का ठेवण्यात आला.

**श्री. प्रभाकर विधाते :** नागरिकांनी सिडाकोकडून जी घरे विकण्यात आलेली आहेत त्या घराचे पैसे पुर्णपणे सिडकोकडे भरले जात नाहीत. तोपर्यंत सिडकोतील नागरिकांकडून साफसफाई कर वसूल करण्यात येऊ नये.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सिडकोने घरे बांधून देतांना नागरिकांना जी आश्वासाने दिली होती ती पुर्ण होत नाहीत. तोपर्यंत हा कर लावण्यात येऊ नये. साफसफाईवर खर्च होणारा पैसा मनपास सिडकोकडून मिळणार आहे काय? हा खर्च मनपा कोठून करणार आहे?

**श्री. केशव सोनवणे :** सिडकोतील मालमत्तांवर कर लावण्यापुर्वी प्रशासनाने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतीली होती काय?

**श्री. इकबालसिंग गील :** सिडकोतील काही विशिष्ट भागातच मालमत्ता कर लावला जात आहे. असे का याचा खुलासा व्हावा. या भागात मालमत्ता कर किती टक्के वसूल केला जातो. याचाही खुलासा व्हावा. मुळ मालमत्ता करातून साफसफाई कर आतापर्यंत कमी करण्यात येत होता का? याचाही खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त** : औरंगाबाद नगरपरिषदेचे १९८२ मध्ये महानगरपालिकेत रुपांतर झाले. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ प्रमाणे सिडकोचा संपुर्ण भाग हा महापालिकेमध्ये समाविष्ट झालेला आहे. त्यामुळे सिडको परिसर हा मनपाचे एक अंग आहे. मनपाचे प्रतिनिधीही या भागातून निवडून आलेले आहेत. सिडकोने निवास्थाने बांधून देतांना संबंधिता बरोबर जे करारनामे केलेले आहेत. त्यात नमुद केले आहे की, जेव्हापासून मनपातर्फे मालमत्ता कर वसूल करण्यात येईल तेव्हापासून सिडकोतर्फे साफसफाई करापोटी वसूल केला जाणारा सेवाकर (सर्व्हिस चार्जेस) बंद केला जाईल. सिडको विभागातील मालमत्तेवरील कर आकारणीचे काम पुर्णपणे झालेले नाही. ते काम अजूनही चालुच आहे. (३.३० वाजता मा. श्री. मोतीराम घडामोडे, नगरसेवक यानी सभागृहात येऊन काही पत्रके वाटली) सिडको भागातील किती मालमत्तावंरील कर आकरणीचे काम झालेले आहे व किती काम होणे बाकी आहे. याबाबतची सविस्तर माहिती करमुल्य निर्धारण अधिकारी सभागृहास देतीलच महापालिकेने १९८३ मध्ये सिडको भागातील पाणीपुरवठ स्वतःकडे घेतला. या भागातील पाणी पुरवठयावर रु. २ कोटी ८० लाखाचा खर्च मनपा दरवर्षी करते. साफसफाईसाठी जो खर्च मनपास येणार आहे. तो मनपाच करणार आहे. काही लोकांनी असे सुचित केले की, १९९०-९१ च्या एवेजी १९९१-९२ पासून सिडकोतील मालमत्तांवर कर आकारण्यात यावा. परंतु नियमाप्रमाणे करात सुट देता येणार नाही. वास्तविक पाहता १९८२-८३ पासूनच या भागातून मालमत्ता कर वसूल कारावयास पाहिजे होता व नियमाप्रमाणे ८६-८७ मध्ये १००% कर वसूल व्हावयास पाहिजे होती प्रॉपर्टीजचे, " असेसमेन्ट " करणे ही आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील बाब आहे व लावण्यात येणाऱ्या करास (टॅक्स रेट) सर्वसाधारण सभेकडून मंजुरी घेतली जाते. मनपा मालमत्तांवर जो सर्वसाधारण कर (जनरल टॅक्स) लावते त्याचा दर २२% एव्हढा आहे व हा

दर सिडको विभागासही लागे असेल. १९८२ पासून सिडको हे मनपाचे एक अंग आहे. नागरी सुविधा पुरविणे हा प्रश्न सिडको व तेथील नागरीकांमधील आहेत. ज्या नागरी सुविधा सिडकोने पुर्णपणे पुरविलेल्या असतील त्यांची देखभाल (मेन्टेनन्स) मनपा करेल. ज्या नागरी सुविधा सिडकोने पुरवावयास पाहिजेत त्या प्रथमतः सिडकोने पुरविल्या नंतरच मनपा त्यापुढील देखभालीसाठी स्वतःकडे हस्तांतरीत करुन घेईल. महापालिकेच्या हद्यीत येणाऱ्या प्रत्येक मालमत्तेवर मनपा कर आकारु शकते. मालमत्ता विकणार व ती खरेदी करणार यांच्या मध्ये कोणत्या शर्ती व अटी झालेल्या होत्या यांच्याशी मनपाचा प्रत्यक्ष संबंध नाही. महापालिकेने जी कराची आकारणी केलेली आहे. ती कोणास चुकीची वाटत असेल तर ते न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाऊ शकतात.

सध्या सिडकोची साफसफाई कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने केली जाते व एका वर्षाच्या साफसफाईसाठी जे पैसे सिडको देणार आहे. ते पैसे कॉन्स्ट्रक्शन मनपा देईल. त्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीची जरुरी आहे.

**श्री. मिर्झा अलिम बेग :** शहरातील मिळकत धारकांकडून ३% एव्हढा कर साफसफाई पोटी वसूल केला जातो. तो सिडकोतील मिळकत धारकांकडून वसूल केला जाणार का?

**मा. आयुक्त** : १९९१-९२ वर्षात सिडको विभागातील मिळकत धारकांकडून अशा स्वरुपाचा ३% कमी साफसफाई कर वसूल केला जाणार नाही. त्यानंतर तो वसूल केला जाईल.

**मा. उप आयुक्त :** सिडको भागात एन-१ ते एन-१ भागातील नागरिकांना (मिळकत धारकांना) मालमत्ता कराच्या नोटीसेस गेलेल्या आहेत. एन-६ ते एन-१३ भागातील काम पुर्ण झालेले असून, इतर भागात नोटीसेस वाटपाचे काम चालु आहे.

**श्री. केशव सोनवणे :** जो टॅक्स लावण्यासच आमचा विरोध आहे.

**मा. आयुक्त** : मागील वर्षी ०१-०४-९० ते ३१-०३-९१ पर्यंत सिडकोने त्या भागातील मिळकत धारकांकडून (सर्व्हीस चार्जेस) घेतलेले नाहीत. जेंव्हा पासून कर लागतो तेंव्हा पासून (सर्व्हीस चार्जेस) वसूल केले जातात. सिडकोने ते वसूल केल्यामुळे महानगरपालिकेने ते (सर्व्हीस चार्जेस) वसूल केले नाहीत. परंतु जो सर्वसाधारण कर २२% आहे. त्यातुन साफसफाई पोटी ३% कर कमी करता येणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** पाणी पुरवठयापोटी महानगरपालिका सिडकोकडून जो पैसा घेते तो पुरेसा नाही. त्यामुळे महानगरपालिकेस तोटाच होत आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पाणी पुरवठयापोटी महानगरपालिका सिडको कडून जो पैसा घेते त्या प्रमाणात पाणी पुरवठा मात्र करत नाही.

**श्री. गजानन बारवाल :** साफसफाईचे काम महानगरपालिकेने स्वतःकडे घेऊ नये.

**श्री. प्रभाकर विधाते :** सिडको परिसरातील साफसफाई सिडकोने करावी. सिडको जोपर्यंत नागरी सुविधा पुरवत नाही तो पर्यंत साफसफाई महानगरपालिकाकडे घेण्यात येऊ नये.

**श्री. केशव सोनवणे :** १९८७-८८ साली काही नागरिकांनी उच्च न्यायालयात सिडको विरुध्द रिट याचिका दाखल केलेली आहे. सिडकोने गल्ल्याचे वाटप करतांना जी आश्वासने दिली होती. ती पुर्ण केल्यानंतरच नागरी सुविधा देखभाल व

साफसफाईचे काम महानगरपालिकेने स्वतःकडे घ्यावे. सिडकोने दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केली किंवा नाही. याबाबतची चौकशी श्री. लव्हेकर न्यायमुर्ती यांचेकडेन देण्यात आलेली आहे.

**मा. आयुक्त** : कोर्टाचा आदेश आला तर आम्ही तो टॅक्स लावणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. केशव सोनवणे :** सिडको विभागातील साफसफाई महानगरपालिकेने स्वतःकडे घेण्यास आमचा विरोध आहे. कारण सिडकोने आश्वासनातील नागरी सुविधा अद्याप पावतो पुरविलेल्या नाहीत.

**श्री. इकबालसिंग गील :** हा ठराव रद्द करण्यात यावा. कारण सिडकोने तिच्या आश्वासानातील नागरी सुविधा तेथील नागरिकांना अद्याप पावतो पुरविलेल्या नाहीत.

**मा. आयुक्त** : कायद्यातील तरतुदीप्रमाणे महानगरपालिका सिडको भागातील साफसफाई करु शकते. कारण मालमत्ता कर साफसफाई यांचा परस्पर संबंध येतो. मात्र या भागातील साफसफाई कॉन्ट्रक्ट पध्दतीने करावी अथवा मजुरांची नेमणूक करुन करावी ही प्रश्न आहे.

**श्री. गजानन बारवाल :** आमचा या प्रस्तावास विरोध आहे. जोपर्यंत सिडकोने आपल्या आश्वासनातील नागरी सुविधा जनतेस पुरविल्या नाहीत. तोपर्यंत सिडको भागातील साफसफाई मनपाकडे घेण्यात येऊ नये.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहेत. प्रशासनाने प्रथम आमची बाजू ऐकून घ्यावी व नंतरच या प्रस्तावावर विचार करण्यात यावा.

**श्री. इकबालसिंग गील :** हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**मा. सभापती** : सर्व सन्माननीय सभासदांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे ठरविण्यात येते की, हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

यानंतर मा. सभापती यांनी आजची सभा संपल्याची घोषित केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २४ जून १९९१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त सोमवार दि. २४-०६-९१ रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृहामध्ये स्थायी समिती सभेस मा. सभापती, श्री. मोहंमद इस्माईल अ. करीम यांचे अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) श्री. भगुरे तुळशीराम छगन
६) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
७) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
८) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

**विषय क्र. ३/१ :**

दिनांक २६-०४-९१, ३०-०४-९१, १०-०५-९१ तहकूब व १८-०५-९१ च्या स्थायी समिती व विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** शहरात नुकत्याच झालेल्या पावसाने सर्वत्र घाण पसरलेली आहे. नव्हे तर कित्येक ठिकाणी ड्रेनेज लाईन व रस्त्यावरील केरकचरा यामुळे दुर्गंधी पसरलेली असून, काही भागामध्ये रोगराई पसरण्याची भिती आहे. करीता तात्काळ व्यवस्था होणे आवश्यक आहे. आणि दरवर्षी प्रमाणे रोजंदारीचा काही मजुरांना लावून शहरातील साफसफाईची योग्य ती व्यवस्था करणे गरजेचे आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी विचारलेल्या महत्वाच्या प्रश्नाची माहिती टिप्पणी करुन ठेवण्यासाठी मला माझ्या स्विय सहाय्यकाची सभेमध्ये गरज आहे. जर सर्वानुमते यास परवानगी दिली तर त्यांना टिप्पणी घेण्यास सुचविण्यात येईल.

**सर्व. सं. सदस्यांनी :** ठीक आहे.

**मा. उप आयुक्त :** मी गेल्या दोन आठवडयापासून शहरातील साफसफाईबाबत प्रत्यक्षात पाहणी करीत आहे. ज्या ज्या वार्डामध्ये घाण्ीने व केरकचऱ्याने दुर्गंधी असेल त्या त्या ठिकाणाची त्वरीत व्यवस्था होणे संबंधी आदेश देण्यात आलेले आहेत. काही दिवस कर्मचाऱ्यांच्या संपाने साफसफाईची व्यवस्था झालेली नाही. आता पावसाळयामुळे ती आणीकच वाढेल यासाठी सर्व झोन अधिकऱ्यांची याबाबतीत एक बैठक बोलाविण्यात येणार असून, साफसफाईच्या संदर्भात एक स्कॉट तयार करण्यात आहे व त्या स्कॉटचे काम प्रत्येक वार्डवाईज पाहणी करुन कामाचा झोनवाईज अहवाल महानगरपालिकेमध्ये बऱ्याचशा झोनमध्ये केरकचरा वाहणाऱ्या गाडयांची

कमतरता आहे. औरंगाबाद शहराचा दिवसेंदिवस वाढता व्याप लक्षात घेता गाडया अपुऱ्या पडतात. यासाठी जादा गाडया केरकचऱ्यासाठी उपलब्ध्द असणे आवश्यक आहे. सोबतच शहरातील साफसफाईच्या दृष्टीने आणि पावसाळा सुरु झाला असल्यामुळे साफसफाई दररोज चांगली होण्याकरीता एका महिन्यासाठी रोजंदारीवर कर्मचारी घेऊन शहरात स्वच्छता कशी राहील याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** जयसिंगपुरा येथे बऱ्याच ठिकाणी घाण पसरलेली आहे. कित्येकदा विनंत्या अर्ज देवूनही कार्यवाही होत नाही काही ठिकाणी म्हशींच्या गोठयामुळे आणि तेथील शेण व कचऱ्यामुळे घाण रस्त्यावर अधिकच दिसते. यामुळे पावसाळयात शेजारांना त्रास होतो यासाठी केरकचऱ्यासाठी योग्य ती व्यवस्था होणे आवश्यक आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** स. सदस्यांनी सुचविल्यानुसार वार्डातील समस्यांचे निराकरण करणे जरुरीचे असते. त्याच बरोबर प्रशासन कोणत्याही समस्यांचे निराकरण करीत असतांना संबंधित वार्डाचे नगरसेवकांनी सहकार्य करणे आवश्यक आहे व कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**मा. सभापती** : ज्या ठिकाणी म्हशीचे गोठे आहेत आणि त्या म्हशीचे शेण खत व तेथील कचरा हा विशिष्ट ठिकाणी टाकण्यासाठी तरतुद केलेली आहे आणि शेणखत ठेवण्याच्या ठिकाणी कंपाऊंडवॉल वगैरे असण्याची तरतुद आवश्यक आहे आणि तसे संबंधिताने आदेश देवून नियमाप्रमाणे कार्यवाही करणे योग्य होईल. ज्यामुळे शहरातील दुर्गंधी काही भागातील नाहीशी होऊ शकते.

**श्री. केशव सोनवणे :** याबाबत मला असे सुचवावयाचे आहे की, बऱ्याच ठिकाणी कत्तलखाने आहेत. काही ठिकाणी बिनापरवानगी दुकाने आहेत. परंतु काही ठिकाणी लहान लहान टपऱ्या टाकून जनावरांची उघडयावरच कत्तल केली जाते त्यांना परवानगी दिलेली नसतांनही आपला व्यवसाय चालु करतात व तेथील कचरा कुठेही टाकून देतात त्यामुळे दुर्गंधी होते व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. याबाबत मी बऱ्याच वेळा सुचना देऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही संबंधित विभागाने केलेली नाही. तेंव्हा संबंधित अधिकाऱ्याने निष्काळजीपणा केल्याबद्दल मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९५० चे कलम ५६ अ-ब प्रमाणे निलंबन करण्यात यावे. जोपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणार नाही. तोपर्यंत शहरातील घाणी बाबत अडचणी दूर होणार नाहीत.

**मा. सभापती** : याबाबतीत असे दिसून येते की, कोणत्याही कामाचे कार्यवाही बाबतीत अधिकाऱ्यांच्या काय अडचणी असतात ते जाणून घेणे महत्वाचे असते. आपण संबंधित अधिकाऱ्यांना एखाद्या कामाबाबत बोलतो. त्याच प्रमाणे त्या अधिकाऱ्यांना त्या कामाच्या संदर्भात काय अडचणी येतात ते पाहणे आवश्यक आहे. म्हणजे दोन्हीही बाजू समजावून घेणे योग्य आहे. असे मला वाटते यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात बोलावून खुलासा घेऊन नंतर पुढील कार्यवाही करता येईल (संबंधित अधिकारी पशुधन विकास अधिकारी यांना शिपायाकडून बोलावणे पाठविले.)

**श्री. गिरजाराम हाळनोर :** उस्मानपुरा येथील चामडयाचे गोदामाच्या संदर्भात गेल्या दोन - तीन वर्षापासून विनंती अर्ज करुनही व सभेमध्ये आश्वासने देवूनही

कोणत्याच प्रकारची अद्यापही कार्यवाही झालेली नाही. याबाबत कित्येकदा पेपरला सुध्दा बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. तथापी संबंधित अधिकाऱ्याने काय केले याचा खुलासा व्हावा.

**श्री. अलीम बेग, मिर्झा कलीम बेग :** साफसफाईच्या संदर्भात केरकचरा वाहून नेण्यासाठी दररोजच्यापेक्षा रविवार या सुटीच्या दिवशी मालवाहू गाडया लावून कार्यवाही करणे आवश्यक आहे आणि येथील ट्रक अपुरे पडत असल्यास बाहेरील ट्रक भाडयाने घेऊन शहरातील साफसफाई बाबत कार्यवाही करणे योग्य राहील त्यामुळे शहरातील घाण पुर्णतः नष्ट होण्यास मदत होईल.

**मा. सभापती** : मागील वर्षी भाडयाने काही ट्रक लावले होते का?

**मा. उप आयुक्त :** शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** संबंधित झोन अधिकारी आणि स्वच्छता निरिक्षक यांचे सुचनेनुसार त्यांचे अहवालानुसार कार्यवाही करता येणे शक्य होईल.

**श्री. इकबालसिंग गील :** जे कर्मचारी संपावर होते. त्या सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत काय कार्यवाही केली.

**मा. सभापती** : महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या संपात भाग घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत अद्याप आपल्याकडे कोणत्याही प्रकारचे प्रशासनाकडून अथवा असोशिएशन कडून पत्र आलेले नसल्याने आपण याबाबत चर्चा करु नये. ट्रक बाबत संबंधित झोन अधिकारी यांचेशी चर्चा करुन ज्या झोनला आवश्यक आहे. त्याबाबत कार्यवाही करावी आणि एखाद्या गुत्तेदाराकडील ट्रक त्यांचेकडील कार्यवाही सहीत लावून कामे करण्याबाबत पाहणी करावी. पशुधन विकास अधिकारी यांना बोलावणे पाठविले आहे. तोपर्यंत त्यांच्या विषया संदर्भात चर्चा करण्यात येऊ नये.

**श्री. प्रभाकर विधाते :** मुंबई रोडवरील जकात नाक्यावर आग लागल्याने बरेचसे नुकसान झालेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने एका कर्मचाऱ्याची लुना जळाली व काही कागदपत्रे जळाली आहेत व अंदाजे रु. १.७५ लाखाचे नुकसान झालेले आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकऱ्यांनी खुलासा करावा व किती नुकसान झाले याची माहिती द्यावी

**श्री. केशव सोनवणे :** सिडकोतील एन-७ मधील महानगरपालिकाच्या काही शाळा हया खाजगी संस्थाना ३१ मे पर्यंत सोडलेल्या आहेत व आता कालावधी लोटूनही त्या शाळेतील खाजगी संस्थांच्या शाळा भरविल्या जात आहेत. म्हणजे नेमका कधी पर्यंत करार झालेला आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : माझे शिक्षणाधिकारी यांचेशी याबाबतीत बोलणे झालेले आहे. खाजगी संस्थेच्या शाळांना वर्ग भरविण्यासाठी महानगरपालिकेने करार केलेला होता तो करार आता संपलेला असून, संबंधित संस्थेला महानगरपालिकेच्या शाळेच्या खोल्या तात्काळ सोडविण्यासाठी नोटीस पाठविण्यात आलेल्या आहे.

**श्री. केशव सोनवणे :** ज्या अर्थी करार महानगरपालिकेशी केला होता त्यावेळी संबंधित संस्थांच्या बाबतीत स्थायी समितीला माहिती होती काय? आणि सिडको व महानगरपालिका यांच्या दोहोंच्या मध्ये इतर खाजगी संस्थांच्या शाळेबाबत करार कसे होतात.

**शिक्षणाधिकारी :** महानगरपालिकेच्या शाळेमध्ये खाजगी संस्थेने एका कराराने काही खोल्या भाडयाने शाळा चालविण्यास घेतलेल्या होत्या व त्यांची मुदत संपलेली आहे आणि नियमाप्रमाणे त्या संस्थेला नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** महानगरपालिकेच्या शाळेमध्ये एका खाजगी संस्थेला एका वर्षाच्या कराराने शाळा चालविण्यासाठी दिलेली होती. म्हणजे महानगरपालिकेची शाळा किराण्याची दुकान आहे की काय? कोणत्याही वेळेस खाजगी संस्था चालु राहण्यासाठी शाळा चालु असण्यात असा नियम आहे काय?

**मा. सभापती :** स्थायी समिती / सर्वसाधारण सभेला या विषयाची माहिती आहे काय?

**श्री. केशव सोनवणे :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ मधील ७९ प्रमाणे याबाबत उल्लघन केलेले आहे.

**मा. सभापती :** तसे असल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. तुळशीराम भगुरे :** माझ्या वार्डातील शाळांबाबत माहिती द्यावी. अशाच प्रकारे करार केलेले आहेत काय?

**श्री. इकबालसिंग गील :** अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

**शिक्षणाधिकारी :** सिडकोतील शाळेशी केलेल्या कराराबाबत सदरील इमारत ही सिडकोच्या ताब्यात आहे.

**श्री. केशव सोनवणे :** संबंधित अधिकारी दिशाभूल करीत आहेत.

**मा. सभापती :** शाळेच्या इमारती बाबत आहे. याचा स्पष्ट खुलासा होणे आवश्यक आहे आणि सदरची इमारत आपल्या ताब्यात आहे किंवा नाही आणि जर खाजगी संस्था शाळा खाली करीत नसल्यास एका नामांकीत वकीलद्वारे कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पिरबाजार येथील महानगरपालिकेच्या शाळेबाबत माहिती द्यावी. गेल्या १ वर्षापासून मी सतत बोलत आहे की, तेथील शाळेतील कंपाऊंड वॉल बाबत आणि शाळेबाबत त्वरीत काम करावे परंतु काहीही कार्यवाही होत नाही. यामुळे शाळेच्या वर्गावर परिणाम होतो.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी पिर बाजार महानगरपालिका शाळेत या ठिकाणी जाऊन प्रत्यक्षात पाहणी करतील व त्वरीत याबाबत कार्यवाही करतील.

**श्री. इकबालसिंग गील :** मी बऱ्याच वेळा पत्र देऊनही संबंधित पाणीपुरवठा बांधकाम व उद्यान अधिक्षक यांनी अद्यापही कार्यवाही केलेली नाही. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** संबंधित पाणी पुरवठा व बांधकाम विभाग यांनी याबाबतीत कार्यवाही करावी व उद्यान अधिक्षक यांनी या संदर्भात माहिती द्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** उस्मानपुरा येथील गार्डनबाबत उद्यान अधिक्षक यांनी फेनसिंग करण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री. केशव सोनवणे :** दिनांक २६-०४-९१ चे इतिवृत्त पान क्र. १ मध्ये चर्चा झाल्यानुसार नगररचना विभागाकडून दुकान दुरुस्तीची व शटर लावण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. याबाबत संबंधित घरमालाकाने " ना हरकत प्रमाणपत्र " दिल्यानंतर प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. कोर्टात जाण्यासाठी संबंधित अर्जदार तयार आहेत. याबाबत विचार व्हावा.

**मा. सभापती :** याबाबत विधी सल्लगारांनी खुलासा करावा.

**विधी सल्लगार :** जोपर्यंत घरमालकाचे " ना हरकत प्रमाणपत्र " या कार्यालयात प्राप्त होत नाहीत. तोपर्यंत काही करता येणे शक्य नाही आणि या संदर्भात संपुर्ण अधिकार मा. आयुक्तांना आहे.

**मा. सभापती** : भाडेकरुने विभागील मा. आयुक्त यांचेकडील कक्षात असलेले कार्यालयाकडे नियमानुसार " ना हरकत प्रमाणपत्रा " साठी परवानगीची मागणी करावी.

**श्री. केशव सोनवणे :** संबंधित भाडेकरुने कोर्टाकडून पत्र आणलेले आहे की, संबंधितांना " ना हरकत प्रमाणपत्र " देण्यात यावे. त्याच प्रमाणे आपली माणूसकी या नात्याने परवानगी देण्यास हरकत (नाही) नसावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांकडे विनंती करण्यात येईल की, संबंधित भाडेकरुला जोपर्यंत सदरील डी. पी. रोडच्या कामास प्रारंभ होत नाही. तोपर्यंत एका करारनाम्याद्वारे त्यांचेकडून लिहुन तात्पुरत्या स्वरुपाची त्यांना परवानगी देण्यात यावी. अशी स्थायी समिती सभेद्वारे विनंती करण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** दि. २६-०४-९१ चे इतिवृत्त पा. क्र. २ मध्ये मा. सभापती यांनी सुचविल्यानुसार निवडणूकीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी देणेबाबत कार्यवाही व्हावी. याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : उप आयुक्त यांनी याबाबतचा खुलासा करावा.

**मा. उप आयुक्त :** कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देत असतांना कर्मचाऱ्यांच्या पाच वर्षाच्या मागील गोपनिय अहवाल व कार्यालयीन समाधानकारक काम असलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी देण्यात येते आणि यासाठी एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समिती द्वारे कर्मचाऱ्यांना वेतनवाढी निश्चित करण्याबाबत शिफारस करते. त्याचप्रमाणे निवडणूकीच्या काळामध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी कामे केलीत त्यांना ज्यादा वेळेत काम केल्याचा ( ओ. टी. भत्ता देण्यात आलेला आहे आणि आतापर्यंत याबाबत ३ (तीन) कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतन वाढ देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** इतिवृत्तातील पान क्र. ५ वर मुख्य लेखा परीक्षक यांनी ३-४ वर्षाचे गोपनिय अहवाल कर्मचाऱ्यांचे पहिले जाते असे सुचविले आहे. म्हणजे नेमके काय?

**उप आयुक्त** : होय म्हणजे साधारणतः ४ ते ५ वर्षाचे मागील गोपनीय अहवाल कर्मचाऱ्यांचे पाहणे आवश्यक आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये डांबरीकरणाच्या कामाबाबत जी कामे पडलेली आहेत. त्या कामाबाबत ज्या गुत्तेदारांची निविदा सर्वात कमी असेल ती निविदा मंजुर करण्यात यावी असे होते. त्याप्रमाणे काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती** : ज्याप्रमाणे कामाचे आदेश संबंधित गुत्तेदारांकडे देत नाही. तोपर्यंत त्या कामास सुरुवात होणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** माझ्या वार्डातील रस्त्याचे कामाबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता बांधकाम :** अंदाजपत्रक तयार आहे. बजेट नसल्याने कामास सुरुवात होऊ शकली नाही.

**मा. सभापती** : शहर अभियंता यांना सुचना देण्यात येते की, शहरातील वस्त्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्या सर्व ठिकाणची कामे त्वरीत दुरुस्त करावीत.

**श्री. केशव सोनवणे** : शहरातील मुख्य रस्त्याचे जे डांबरीकरणाची कामे आहेत. ती सर्व पावसाळयापुर्वी सुरु होऊ पर्ण करणे आवश्यक होते. अद्यापही डांबरीकरणाची कामे पुर्ण झालेली नसल्याने रस्ते पुर्णतः उखडून जातात.

**मा. सभापती** : शहरातील रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या संदर्भात संबंधित गुत्तेदारांना त्यांना मान्यता दिलेल्या प्रस्तावानुसार कामे करणे आवश्यक असते. परंतु काही गुत्तेदार तसे करीत नाही उलट उशीर करुन आपल्या संबंधित अधिकाऱ्यांना ब्लॅक मेल करण्याचा प्रयत्न करतात.

**श्री. केशव सोनवणे** : मागील बैठकीत लक्ष्मी कॉलनी येथे दोन पोल बसविण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्याबाबत काय झाले.

**उप अभियंता विद्युत** : लक्ष्मी कॉलनी येथे दोन पोल बसविण्यात आलेले आहेत.

**श्री. प्रभाकर विधाते** : टाऊन हॉल ते मकई गेट पर्यंतच्या लाईटबाबत काय झाले.

**उप अभियंता विद्युत** : टाऊन हॉल ते मकईगेट पर्यंत लाईन बाबतच्या कामाची कार्यवाही चालु आहे आणि मकबरा पर्यंतची लाईन अंडर ग्राऊंड करण्यात येत आहे.

**श्री. केशव सोनवणे** : पाणी पुरवठा संदर्भात काही भागामध्ये सर्व्हे करुन बोरींग करणार होते. त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती** : पाणी पुरवठयाच्या संदर्भात ज्या भागामध्ये आवश्यकता आहे आणि ज्या ठिकाणी पाणी भरपूर प्रमाणात येत नाही. तशा सर्व ठिकाणी जाऊन सर्व्हे करावा. ज्यासाठी जी. एस. डी. ए. यांचे अधिकाराखाली तपासणी करुन ज्या ठिकाणी पाणी लावण्याची शक्यता आहे. तशाच ठिकाणी बोरींग घेण्याबाबत सर्व्हे करुन अहवाल घ्यावा. त्याचबरोबर ज्यांचे या संदर्भात अर्ज आलेले असतील त्यांना प्राधान्य द्यावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : ज्योतीनगर येथील एका ले आऊट झालेल्या जागेवर बोरींग करणेबाबत गेल्या एक वर्षा पासून कार्यवाही का करण्यात आलेली नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता, पाणी पुरवठा** : सदरील बाबतीत प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : सिटी सर्व्हे कार्यालयाकडून माहिती घ्यावी.

**मा. सभापती** : संबंधित बाबतीत संपुर्ण माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे** : पशुधन विकास अधिकारी सभागृहा आलेली आहेत.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी शहरातील कत्तलखाने आणि विविध दुकाने याबाबत माहिती द्यावी.

**पशुधन विकास अधिकारी** : शहरातील उघडयावर असलेल्या कत्तली दुकानांबाबत बऱ्याचवेळा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांचेवर कार्यवाही करणे संबंधी पोलीस मुख्यालयात पोलीस फोर्सची मागणी केलेली आहे. नंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कारण बिगर पोलीसांशिवाय दुकाने हटविणे शक्य नाही. यापुर्वी दुकाने हटविणेबाबत कार्यवाही केली असता संबंधितांनी दादागिरी व शिव्या दिल्यामुळे आमच्या कर्मचाऱ्यांना गप्प बसावे लागले. पुढील कार्यवाही पोलीसांच्या मदतीने करता येईल.

**श्री. केशव सोनवणे :** आम्ही बऱ्याचदा अर्ज देवूनही आतापर्यंत अशा प्रकारची कार्यवाही केली का नाही. याचा अर्थ? काय आपण संबंधितांना परवानगी देतानाचे उद्दीष्ट काय असते.

**पशुधन विकास अधिकारी :** परवानगी देत असतांना ठरविलेल्या उद्दिष्टांप्रमाणे दुकानदारांनी कर्तव्य पार पाडणे आवश्यक असते. उघडयावर कत्तली करता येत नाहीत व दुकानासमोर जाळया घाण बसू नये. यासाठी असणे आवश्यक असते.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** उस्मानपुरा येथील चामडयाचे दुकानाबाबत कित्येकदा सुचना देऊनही कोणतेही कार्यवाही झालेली नाही आणि दुकानंदारांना ज्या वेळेस लायसेन्स दिल्या जाते त्याचे उद्धिष्ट पुर्ण आमलात आणणे आवश्यक आहे.

**पशुधन विकास अधिकारी :** २० x ३० चे प्लॉट देऊन चामडयाचे गोदाम शहराबाहेर हलविण्यात येणार आहेत. दुकानदारांना परवाना दिल्यानंतर अंमलबजावणी करणे हे त्याचे कर्तव्य असते.

**मा. सभापती** : याबाबत कार्यवाही दोन्हीही बाजूची भुमिका स्पष्ट झाल्यानंतर करण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** अधिकाऱ्यांबाबत सहानुभुती दाखविणे योग्य नाही.

**श्री. फैय्याजखॉन :** सहानुभुतीचा प्रश्नच उद्भवत नाहीत. केवळ सभापतींनी आपल्याला सुचविले की, दोन्हीही बाजू पाहणे आवश्यक आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री. प्रभाकर विधाते, श्री. गिरजाराम हाळनोर :** आपण संबंधित अधिकऱ्यांबाबत असे का बोलता त्यांना स. सदस्यांनी प्रश्न विचारु नये काय आणि अनेक वेळा विनंत्या अर्ज करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. मग याचा अर्थ काय समजावा. नागरिकांच्या हितासाठी लोकप्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित करावे किंवा नाही. ( जोराने )

**श्री. फैय्याजखॉन :** मी एव्हढेच सांगतो की, आपण सभापतींना तसे बोलणे योग्य नाही.

**मा. सभापती** : तसे काहीही नाही. कोणत्याही कारणास्तव तसे बोललेलो नाही.

**श्री. केशव सोनवणे :** मी सभेला सांगितले आहे आणि माझे बोलणे अजून संपलेले नाही.

**मा.सभापती** : ठिक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत खुलासा केलेला आहे.

**श्री केशव सोनवणे** शहरातील आरोग्य धोक्यात आहे. सध्या पावसाळा सुरु आहे आणि अशा हंगामामध्ये घाणीचे साम्राज्य असल्यास शहरात रोगराई पसरण्याची शक्यता आहे. कित्येक ठिकाणी विनापरवानगी मटनाचे दुकाने आहेत की, जे उघडयावरती कत्तली करुन आपले व्यवसाय चालवितात. यामुळे माशा बसतात व शेजाऱ्यांना आरोग्याचा धोका संभवतो. यासाठी असे विनापरवानगी दुकानांना चालना देणे म्हणजे यास जबाबदार कोण आहे? याचा खुलावा व्हावा.

**पशुधन विकास अधिकारी :** शहरातील विनापरवानगी दुकाने हटविण्याचे ठरल्यास पोलीस फोर्स असणे आवश्यक आहे. आणि पोलीस फोर्स नेहमीसाठी असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याशिवाय गत्यंतर नाही.

**श्री. केशव सोनवणे :** सध्या पावसाळा सुरु आहे आणि याबाबत प्रशासनातर्फे काय कार्यवाही होणार याची माहिती द्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सिल्लेखाना येथील कत्तलखान्याची व्यवस्था लवकरात लवकर न झाल्यास पुन्हा अंदोलन छेडण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मा. उप आयुक्त :** पुढील आठवडयात स्वच्छता निरिक्षकांच्या बाबतीत स्कॉट पाहणी करणार आहे व शहरात स्वच्छता कशी राहील याबाबत ठरवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : जाफरगेट येथील मोंढयाजवळ ६०० एम. एम. डायची ड्रेनेज लाईन बाबतचे काम नीवन डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रकीय दराने त्याचा गुत्तेदारांकडून १०% कमी दराने काम करण्यास यावे असे सर्वानुमते ठरले तसेच विषय क्र. १ यास सर्वानुमते मंजरुी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुपारी हनुमार रोडवरील एका दुकानदाराने महानगरपालिकेकडे दुकानदुरुस्ती करीता व शटर लावण्याकरीता परवानगीसाठी अर्ज सादर केला. त्या संदर्भात मा. आयुक्त यांचेकडे विनंती अर्ज करण्यात येतो की, संबंधित भाडेकरुन जोपर्यंत डी. पी. रोडच्या कामास प्रारंभ होत नाही तोपर्यंत एका करारनामाद्वारे त्यांचेकडून लिहुन तात्पुरत्या स्वरुपाची त्यांना परवानगी द्यावी व रोडचे काम सुरु झाल्यास ते दुकान काढण्यात येईल. असा करार करण्यात यावा अशी शिफारस करण्यात येते.

ज्योतीनगर ले आऊट जागे बाबत संपुर्ण माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. वरील सर्व दुरुस्त्यांसह दिनांक २६-०४-९१, ३०-०४-९१, १०-०५-९१ तहकूब व १८-०५-९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती व विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४/२ :**

वार्ड क्र. ५१ मो. लोणीकर कॉलनी पदमपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. २६,८०३=०० चे बनविण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. आदेशावरुन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३/९० दि. २१-११-९० द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता दोन दरनिर्दिष्टीत निविदा प्राप्त झाल्या त्या
१) श्री. व्ही. बी. डोंगरे २) श्री. अे. के. अरोरा

यांची दरपत्रके होती. त्या दोघांचे दर सारखेच म्हणजे २८% कमी दराचे असल्याने त्यांच्या कडून दरपृथ:करण मागविण्यात आले. संबंधितांनी आपआपले दरपृथ:करण दाखल केले असता दरपृथ:करण योग्य न वाटल्याने मा. आयुक्त साहेबांनी फेर निविदा मागवावे असे आदेश दिले.

आदेशावरुन सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १८/३३२/९१ दि. ०७-०३-९१ द्वारे बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी फक्त एकच निविदा १.०५% कमी दराची श्री. के. बी. काल्डा यांची प्राप्त झालेली आहे. करीता १.०५% कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे श्री. के. बी. काल्डा यांची असून, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५१ मो. लोणीकर कॉलनी पदमपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. २६,८०३=०० चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामांसाठी प्राप्त झालेले एकमेव निविदापत्रक

गुत्तेदार श्री. के. बी. काल्डा, यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०५% कमी दराचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५/३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८/८ दि. १६-०६-९० अन्वये औरंगाबाद ते जळगांव रस्त्यावर दिल्ली गेट परिसरातील पेट्रोल पंपाच्या समोर महानगरपालिकेने संपादन केलेल्या जागेपैकी नगरभुमापने क्र. ७४७४,७४७६,७४७७ पैकी सुमारे १३९०.०० चौ. मिटर जागा रु. १५७२०/- प्रतिवर्षी भाडे पट्टयावंर ९९ वर्षासाठी महाराष्ट मार्ग परिवहन मंडळास बस थांब्यासाठी भाडेपट्टयाने देणेबाबत निर्णय झालेला आहे.

प्रकरणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विनंती केली आहे की, त्यांना वरील प्रमाणे भाडे न आकारता रु. ६,०००/- (सहा हजार) प्रमाणे भाडे आकारणी करुन बस थांब्यासाठी व प्रस्तावित केलेले जागा ९९ वर्षासाठी देण्यास प्रस्ताव व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने विनंती केल्यानुसार औरंगाबाद ते जळगांव रस्त्यावर दिल्लीगेट परिसरातील पेट्रोल पंपा समोरील महापालिकेने संपादन केलेल्या जागेपैकी न. भु. क्र. ७४७४,७४७५, व ७४७७ पैकी अंदाजे १३९० चौ. मी. जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास प्रति वर्षास रुपये ६,०००/- भाडे आकारुन बस थांब्याकरीता प्रस्तावित जागा ९९ वर्षासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/४ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधी नगर स्लम भागात १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यू. जी. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ९९,०००/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा विकण्यात आल्या. व मोहरबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेसस फक्त तीन (३) निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. ए. नवाब | २% कमी |
| २) | श्री. सय्यद रफीक | २४% कमी |
| ३) | श्री. राजसिंग | २७.९% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. राजासिंग यांचे टेंडर कमी व अ. प. दरापेक्षा २७.९% कमी आहे करीता श्री. राजासिंग यांच्या अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.९% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. गिरजाराम हाळनोर :** अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९% कमी कसे

**मा. सभापती** : सदरील काम ड्रेनेज पाईप लाईनचे असल्याने काम गुत्तेदाराकडून कशा पध्दतीने व कसे करावेयाची पाहणी करण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांचे आहे. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. त्या पध्दतीने प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधी नगर स्लम भागात १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९% कमी दराचे गुत्तेदार श्री. राजासिंग यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अरिहंत नगर येथील रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ५१,७६३/- च्या अंदाजपत्रकास दि. २१-०३-९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१३) १९९०-९१ दि. २५-०३-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ३०-०३-९१ पर्यंत एकूण (७) सात निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या निविदा दि. ०५-०४-९१ ला एकूण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. एच. असोशिएटस | २७.४०% कमी |
| २) | श्री. गिरीश सिकची | २५.९९% कमी |
| ३) | श्री. राजासिंग | २५.७८% कमी |
| ४) | श्री. सुखबीरसिंग | २५.१७% कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.४०% कमी दराने मे. एस. एच. असोशिएटस यांची निविदा असून, मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अरिहंत नगर येथील रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.४०% कमी दराचे गुत्तेदार मे. एस. एच. असोशिएटस यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**विषय क्र. ८/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड न. ५० उस्मानपुरा येथील रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ३०,२००/- च्या अंदाजपत्रकास दि. २१-०३-९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१३) १९९०-९१ द्वारे प्रगट निविदा मागवलिया असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ३०-०३-९० पर्यंत एकूण (७) सात निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. एच. असोशिएटस | २७.४०% कमी |
| २) | श्री. गिरीश सिकची | २६.१०% कमी |
| ३) | श्री. राजासिंग | २५.७८% कमी |
| ४) | श्री. सुखबीरसिंग | २५.२५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.४०% कमी दराची मे. एस. एच. असोशिएटस यांची निविदा असून, मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५० उस्मानपुरा येथील रोडचे खडी रस्त्याचे काम करण्यासाठी प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.४०% कमी दराच्या श्री. मे. एस. एच. असोशिएटस यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ९/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. १४ शहा बाजार येथील मस्जिद (निशान) साठी कंपाऊंडवॉल बांधणेबाबत ( ५० फुट डी. पी. रोडचे चेलीपुरा ते रोषनगेट ) च्या कामासाठी सन ८९-९० चे सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ७१,२३०/- ला मा. आयुक्तांची मंजुरी दि. २४-०१-९१ ला मिळालेली आहे. सदर खर्च सरकारडून मिळालेल्या अनुदानातून करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ९ दि. १६-१२-९१ रोजी निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. एच. असोशिएटस | ७% कमी |
| २) | श्री. देवराव वाहुळ | १७.७७% कमी |
| ३) | श्री. अब्दुल रशीद शेख | २७.८६% कमी |
| ४) | श्री. कैसरखान | ७.८६% कमी |
| ५) | श्री. शेख शरीफ | २.५०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८६% कमी दराची श्री. अबदुल रशीद शेख यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १४ शहा बाजार येथील मस्जिद (निशान) साठी कंपाऊंडवॉल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८६% कमी दराच्या श्री. अब्दुल रशीद शेख यांचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र. १३ हस्तेसिंगपुरा येथील एस. टी. कर्मचारी सोसायटी अंतर्गत रस्ता तयार करण्याबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ६०,०००/- ला मा. आयुक्तांची दि. १०-०१-९१ रोजी मंजुरी मिळाली आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९ जा. क्र. मनपा/बां.वि.१/६८४/९१ दि. १६-०२-९१ रोजी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एच. असोशिएटस | १३% कमी |
| २) | श्री. अब्दुल सलाम | १९.१५% कमी |
| ३) | श्री. कैसरखान | १७.८६% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१५% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ हस्तेसिंगपुरा येथील एस. टी कर्मचारी सोसायटी अंतर्गत रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१५% कमी दराच्या श्री. अब्दुल सलाम यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, शहागंज गांधी पुतळा ते भडकल गेट ५ फुट डी. पी. रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण व रस्ता दुभाजक व रस्त्यामध्ये बाधीत होणारे घरे तोडण्या बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-०७-९० रोजी विषय क्र. ४६ नुसार अंदाजपत्रक र. रु. ( पार्ट अ/ब/क/ मिळून) ११,८३,६२०/- ला सर्वानुमते मान्यता मिळाली आहे.

शहागंज (गांधी पुतळा) ते भडकल गेट ५० फुट रस्त्यामधील बाधीत होणारी घरे पाडणे बाबतच्या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ९/जा. क्र./मनपा/बां-१/६८४/९१ दि. १६-०२-९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यत दोन निविदा विकल्या गेल्या पैकी फक्त एकच निविदा श्री. अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% कमी दराची दर भरुन प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**शहर अभियंता :** सदरचा प्रस्ताव (ड्रॉप) स्थगित करण्यात यावा.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव चुकीने आल्याने स्थगित ठेवण्यात यावा व पुन्हा दुरुस्तीसह सादर करण्यात यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव दुरुस्तीसह पुन्हा ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १२/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. २६ जोहरीवाडा नगारखाना गल्ली व केळी बाजार येथील खांडकी दुरुस्ती तसेच नविन खांडकी बसविण्याच्या कामासाठी सन ८९-९० च्या सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ४०,०००/- ला मा. आयुक्तांची मंजुरी दिनांक १२-११-९० ला मिळाली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ८ दि. १५-०१-९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण एकोणीस निविदा विकल्या पैकी पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मौला अलियाखान | १०.०१% कमी |
| २) | श्री. देवराज वाहुळ | २२.५१% कमी |
| ३) | श्री. गिरीश सिकची | २५% कमी |
| ४) | श्री. अब्दुल कलिम | २०% कमी |
| ५) | श्री. खेडकर बी. आर | ७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची श्री. गिरीश सिकची यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २६ जोहरीवाडा, नगारखाना, गल्ली, व केळी बाजार येथील खांडकी दुरुस्ती, तसेच नविन खांडकी बसविण्याच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराच्या श्री. गिरीश सिकची यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३/११ :**

वार्ड क्र. २६ बारुदनगर नाला येथे १५० मी. मी. व्यासाची व २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ५४,८४७/- चे तयार करण्यात आले असून त्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १८ दि. ०७-०३-९१ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. ए. वाहोद्दीन | ४% जास्त |
| २) | श्री. सय्यद रफिकोद्दीन | ४.१०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१०% कमी दराचे श्री. सय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** माझ्या स्वेछा निधीतून ड्रेनेज बाबतची कामे होण्यासाठी लिहुन दिलेले आहे. परंतु स्थायी समितीमध्ये अद्यापही प्रस्ताव आलेला नाही.

**मा. सभापती** : संबंधित स. सदस्यांचे ड्रेनेज विषयीचे स्वेच्छा निधीचे कामास तात्काळ मंजुरी देण्यात येते.

**उप आयुक्त** : मुख्य लेखा परिक्षक यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** सन १९९०-९१ च्या बजेट (अंदाजपत्रक) मध्ये काम व्हावे असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : कोणत्याही मंजुर कामांना जास्त उशिर होता कामा नये. जुने वर्ष संपल्यानंतर नविन वर्षाला प्रारंभ झाल्याबरोबर कामांना सुखात होणे आवश्यक आहे.

**श्री. अलिम बेग :** स्वेच्छा निधीतील खर्चाच्या कामास तात्काळ मान्यता द्यावी.

**शहर अभियंता :** निविदा मागवून कामाची प्रक्रिया करावी आणि यासाठी कोणत्याही कामाची निविदा मागवून त्यास मंजुरी मिळविणे आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी दिलेल्या पत्रानुसार त्यांचे वार्डातील स्वेच्छा निधीतुन खर्च करण्यात येणाऱ्या कामासाठीचे वेगळे एक रजिस्टर व यासाठी केवळ एकाच अधिकाऱ्यांकडे सर्व ६० नगरसेवकांची यादी असणे आवश्यक ाअहे. त्यासाठी कोणत्या अधिकाऱ्याची नेमणूक व्हावी जेणेकरुन सर्व खर्चाचा तपशील एकाच ठिकाणी मिळू शकेल.

**उप आयुक्त** : याबाबत मुख्य लेखा परीक्षक यांचेकडे खर्चाबाबतचे रेकॉर्ड असावे. ज्यामध्ये ६० नगरसेवकांचे त्यांनी पत्राद्वारे लिहुन दिलेल्या कामाची व खर्चाची यादी राहु शकेल व एका रजिस्टरवर याबाबत वर्षवाईज नोंदणीही राहील.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत स्ट्रीट लाईट बाबतचे प्रपोजल असणे आवश्यक आहे आणि स. सदस्यांचे स्वेच्छा निधीतून खर्च करावयाचे कामास त्वरीत मंजुरी देण्यात यावी. मनपा मधील स. सदस्यांची स्वेच्छा निधीतील त्यांनी लिहुन दिलेल्या कोणत्याही लोकांपयोगी खर्चाच्या कामासाठी मुख्यलेखा परिक्षक यांचेकडे पत्र देवून रजिस्टरमध्ये नोंदणी करुन घ्यावी. त्याचप्रमाणे स्वेच्छा निधीतील वर्षवाईज ६० नगरसेवकांचे कोणत्याही कामाचा खर्च याच रजिस्टर मध्ये राहील आणि शिल्लक खर्च आहे किंवा नाही. याबाबतचा गोषवारा यामध्ये सर्वांना दिसेल याबाबत सर्व स. सदस्यांना एका परिपत्रकान्वये कळविण्यात येईल. याबरोबरच सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २६ बारुदगर नाला येथे १५० मी. मी. व्यासाची व २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१०% कमी दराच्या श्री. सय्यद रफिकोद्यीन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४/१२ :**

वार्ड क्र. १५ मलिकबर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६६,८०२/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. ५१६ दि. २६-०२-९० द्वारे मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १९ दि. ०६-०३-९० अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जरीवाला | ५% जास्त |
| २) | श्री. कैसरखान | २% जास्त |
| ३) | श्री. आनंद बिल्डर्स | ४.३% जास्त |
| ४) | श्री. जलीलखॉन | २७.४३% कमी |
| ५) | श्री. सय्यद रफिकउद्यीन | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अदांजपत्रकीय दरापेक्षा २७.४६% कमी दराचे श्री. जलील खान यांचे दरपत्रक आहे. सदर कामास मंजुर मिळण्या अगोदर सदर संचिका नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आली. नगर रचनाकार यांनी १००% विकास निधी जमा झाला असा अभिप्राय दिल्यानंतर सदर कामास मा. आयुक्त साहेब यांनी दि. १५-१०-९० ला मंजुरी दिलेली आहे व सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र. २८७ दि. १४-११-९० द्वारे मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित गुत्तेदार यांना २% अनामत व दहा रुपयाचा मुद्रांक दाखल करण्यास्तव पत्रक दि. २१-११-९० ला देण्यात आलेले होते. तरी संबंधिताने दिनांक ११-१२-९० ला कार्यालयात अर्ज देऊन कळविले की, मी निविदा भरुन सहा महिने कालावधी झालेला आहे व मटेरियलचे दर वाढलेले आहेत. तरी मी काम करु शकत नाही.

संबंधित दुसऱ्या क्रमांकावरील लोवेस्ट गुत्तेदार रफिकउद्यीन यांना आपण प्रथम क्रमांकावरील गुत्तेदार यांच्या दरात म्हणजे २७.४६% कमी दराने काम करण्यास तयार आहात काय याबाबत दि. २८-१२-९० ला पत्र देण्यात आलेले होते. तरी सय्यद रफिकोद्यीन यांनी कार्यालयात अर्ज देवून कळविले की, सदर काम मी १% कमी दराने दिल्यास करण्यास तयार आहे. असे लेखी दिले.

तद्नंतर सदर निविदा दर बरोबर नसल्यामुळे सदर निविदा फेर निविदा मागवावी असा आदेश मा. आयुक्त साहेब यांनी दिल्यानंतर आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७ दि. २४-०१-९१ ला दुसऱ्यांदा निविदा मागविल्यास असता एकूण दोन निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ०.१५% कमी दराची निविदा श्री. सय्यद रफिकउद्यीन यांची वसुल झाली. त्यानंतर मा. आयुक्त साहेब यांच्या दि. २५-०२-९१ च्या आदेशानुसार सदर निविदा फेरनिविदा मागवावी असा आदेश दिला.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १८/३२३/९१ दि. ०७-०३-९१ द्वारे तिसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आलेल्या होत्या. सदर दोन्ही निविदा वसूल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ३.१०% कमी |
| २) | श्री. सय्यद रफिकउद्यीन | ४.३% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३% कमी दराचे श्री. सय्यद रफिकउद्यीन यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १५ मलिकंबर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३% कमी दराच्या श्री. सय्यद रफिकऊद्यीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५/१३ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, कबीर नगर स्लम भागात ४ बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ३१,८००/- ला मा. आयुक्तांनी दि. १५-०१-९१ ला मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम अहमद | १६.१% कमी |
| २) | श्री. देवराव वाहुळ | ११.२५% कमी |
| ३) | श्री. बी. एम. काथार | ११.३% कमी |
| ४) | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन | १९.९% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९% कमी दराची मे. शैलेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** कबीरनगर या स्लम भागामध्ये यापुर्वी भंगी मुक्तीच्या कामाबाबत २६ सार्वजनिक शौचालय बांधणेसाठी मंजुरी घेतलेली होती. मग आता परत ४ शौचालय बांधण्यासाठी प्रस्ताव का ठेवण्यात आला याचा खुलासा व्हावा.

**उप आयुक्त, मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (स्लम) :** कबीरनगर येथील काही नागरिकांच्या आग्रहास्त पुन्हा स्लम भागात ४ शौचालय बांधण्यासाठी प्रस्ताव आखण्यात आलेला आहे व तो लोकग्रहास्तव मंजुर करण्यात यावा.

**मा. सभापती :** सदरील प्रस्तावाबाबत स. सदस्य श्री. गिरजाराम हाळनोर हे संबंधित कबीरनगर या भागात जाऊन पुर्वीचे बांधलेले शौचालय व तेथील नागरिकांची मागणीनुसार नविन बांधणेबाबत विचारपुस करुन पाहणी करतील व नंतर सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्तावाबाबत स. सदस्य श्री. गिरजाराम हाळनोर हे संबंधित कबीरनगर भागात जाऊन पुर्वीचे बांधलेले शौचालय व तेथील नागरिकांचे मागणीनुसार /ाविन शौचालय बांधणेबाबत प्रत्यक्ष पाहणी व विचारपुस करतील. कबीर नगर भागात ४ बैठकी शौचालय बांधणेकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९% कमी दराची मे. शैलेश कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## ऐन वेळचे (विषय) प्रस्ताव

**विषय क्र. १६/१४ :**

सादिया सिनेमा मागून (वार्ड क्र. ४१) रोषन मस्जिद पर्यंत दगडी गटार (नाली) बांधणेबाबत अंदाजपत्रक र. रु. १,४५,६१५/- चे बनविण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ५९५ दि. १६-०४-९१ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. १/४६९/९१ दि. ०७-०५-९१ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविली असता एकूण अकरा निविदा विकण्यात आल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. ए. फारुकी | २% कमी |
| २) | श्री. कैसरखान | २% कमी |
| ३) | श्री. स. अथर अली | १% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री. सय्यद अथर अली यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या प्रस्तावाबाबत चार स. सदस्य सर्वश्री गिरजाराम हाळनोर, प्रभाकर विधाते, एकबालसिंग गील, अलिम बेग यांनी प्रत्यक्षस्थळी जाऊन पाहणी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादिया सिनेमा मागून (वार्ड क्र. ४१) रोषन मस्जिद पर्यंत दगडी गटार (नाही) बांधणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे गुत्तेदार श्री. सय्यद अथर अली यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७/१५ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये " संगणक " ( कॉम्प्युटर ) बसविण्याचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये. ७,००,०००/- ला स्थीय समितीचा ठराव क्र. ४८३/२९ दि. २६-०३-९१ द्वारे मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी फोटेशन मागविले असता एकूण ५-कोटेशन प्राप्त झाले व प्राप्त झालेले कोटेशन उघडले असता कोटेशन द्वारे दिलेले कामाची रक्कम खालील प्रमाणे आहे.

| | | खरेदीची एकूण किंमत |
|---|---|---|
| १. | आर. सी. आय. एम. पुणे | रु. ६,६४,९००.०० |
| २. | एच. सी. एस. पुणे | रु. ६,९८,४५०.०० |
| ३. | परटेक कॉम्प्युटर लि. पुणे | रु. ८,८३,५००.०० |
| ४. | झेनिथ कॉम्प्युटर लि. पुणे | रु. ११,००,१००.०० |
| ५. | बल्युस्टर लि. मुंबई | रु. ९,६३,१३५.०० |

वरील प्रमाणे प्रत्येकाची कॉम्प्युटर खरेदीची एकूण रक्कम जास्त वाटल्यामुळे वरील कंपन्यांचे प्रतिनिधींना समक्ष त्यांनी दिलेल्या एकूण रक्कमेबाबत चर्चा करण्यासाठी बोलावून चर्चेनंतर वरील प्रत्येकाने दिलेली सुधारीत रक्कम खालील प्रमाणे आहे.

| | | खरेदीची एकूण किंमत |
|---|---|---|
| १. | आर. सी. आय. एम. पुणे | रु. ४,४२,५४०.०० |
| २. | एच. सी. एस. पुणे | रु. ७,७४,४५०.०० |
| ३. | परटेक कॉम्प्युटर लि. पुणे | रु. ५७१०००.०० |
| ४. | झेनिथ कॉम्प्युटर लि. पुणे | रु. ११,००,१००.०० |
| ५. | बल्युस्टर लि. मुंबई | रु. ४,३८,०००.०० |

तुलनात्मकदृष्टया ब्ल्युस्टर लि. मुंबई यांची कॉम्प्युटर खरेदीची एकूण किंमत र.रु. ४,३८,०००.०० आहे. सदरील काम सी. ई. डी. टी. यांचे मार्गदर्शनाखाली होत असल्यामुळे वरील काम ब्ल्युस्टर लि. मुंबई यांचे कडून करुन घेण्याची शिफारस सी. ई. डी. टी. यांनी केल्यामुळे ब्ल्युस्टर लि. मुंबई यांचे कोटेशन मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** महापालिका कार्यालयामध्ये संगणक ( कॉम्प्युटर ) बसविणे व त्यानुसार नगररचना विभागातून कामे करण्यासाठी सदरील संगणकाची आवश्यकता आहे. ज्यामध्ये सिडको पाणी पुरवठयाची बिले, नगररचना विभागातील बिले व तेथील विविध फाईल्स यांची माहिती याद्वारे घेता येऊ शकते.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहनुरवाडी येथील सर्व्हे न. ४५ येथे विना परवानगी काम चालु आहे आणि तेथील परवानगी बाबतचे काय निकष आहेत.

**मा. सभापती** : कोणते काम चालु आहे. याची माहिती द्यावी.

**सहाय्यक संचालक :** १.४० प्रमाणे ड्रेनेज पाणी व निवास कामावर पैसा वसूल केला जातो.

**मा. सभापती** : ज्यो पर्यंत औरंगाबाद महानगरपालिकेची रितसर परवानगी मिळत नाही. तोपर्यंत कोणत्याही प्रकारचे कार्य करण्यात येऊ नये आणि म्हाडा यांना

नोटीस देवून विचारणा करण्यात यावी. सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये संगणक (कॉम्प्युटर) बसविण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी र. रु. ४,३८,०००/- या दराने ब्ल्युस्टर लि. मुंबई यांचे दरपत्रक असून, सदरील संगणक बसविण्याचे काम ब्ल्युस्टर लि. मुंबई यांचे कडून र. रु. ४,३८,०००/- या किंमतीत सी. ई. डी. टी. यांचे मार्गदर्शनाखाली पुर्ण करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८/१६ :**

मा. आयुक्त महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरामधील सिडको भागातील पाणी टंचाई व महानगरपालिकेस उपलब्ध होणारा पाणी पुरवठा विचारात घेता महाराष्ट्र औद्यीगीक विकास मंडळाकडून (एम.आय.डी.सी.) ३.०० दशलक्ष लिटर्स प्रतिदिन (३.०० एमएलडी) पाणी घेण्यासाठी त्यांना विनंती करण्यात आली होती. महानगरपालिकेच्या विनंती वरुन त्यांनी डिसेंबर ९१ पर्यंत ३.०० एम. एल. डी. पाणी देण्याचे मान्य केले व यानुसार त्यांच्या कडून पाणी घेण्यात येत आहे. एम. आय. डी. सी. ने सदरील पाणी रु. ७.५० प्रति हजार लिटर्स या दराने देण्याचे कळविले होते. पाणी पुरवठयाची टंचाई लक्षात घेता सदरील दर रु. ७.५० प्रति हजार लिटर्स मान्य करुन व अंतिम दर मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आय. डी. सी. जो ठरविल तो हया अटीवर घेण्याबाबत एम. आ. डी. सी. यांना कळविण्यात आले होते. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यानी दराबाबत मध्यस्थी करुन रुपये ०३.७५ प्रति हजार लिटर्स हे दर सुचविले आहे. या दरानुसार एम. आय. डी. सी. कडून पाणी पुरवठा झाल्याबाबत रक्कम अदा करावी लागेल. एप्रिल ९१ पासून डिसेंबर, ९१ पर्यत ३.०० एम. एल. डी. प्रमाणे ८२५ एम. एल. डी. पाणी होईल. याची एकुण किंमत रु. ३.७५ प्रति हजार लिटर्स दराने रु. ३०.९३,७५०/- अंदाजे अदा करावी लागेल. करीता र. रु. ३१,००,०००/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील पाणी टंचाई व महानगरपालिकेस उपलब्ध होणारा पाणी पुरवठा विचारात घेता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून डिसेंबर ९१ पर्यंत प्रति दिन ३.०० दशलक्ष लिटर्स (३.०० एम एल डी) पाणी घेण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रु. ७.५० पैसे प्रति हजार लिटर्स या दराची मागणी केली होती. शहरातील पाणी पुरवठयाची टंचाई लक्षात घेता सदरील दर अंडर प्रोटेस्ट मान्य करुन व अंतिम दर मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ जो ठरवतील तो देण्याचा अटीवर पाणी घेण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक महामंडळास कळविण्यात आले होते. त्यानुसार मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी पाण्याच्या दराबाबत मध्यस्थी करुन रु. ३.७५ पैसे प्रति हजार लिटर्स या दराने पाणी पुरवठा करण्याबाबत सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून पाणी पुरवठा झाल्याबाबत त्यांना एप्रिल ९१ पासून डिसेंबर ९१ पर्यंत ३.०० एम एल डी प्रमाणे ८२५ एम एल डी पाणी होईल. त्याची एकूण किंमत रु. ३.७५ पैसे प्रति हजार लिटर्स दराने रु. ३०,९३,७५०/- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अदा करावी लागेल त्या करीता रक्कम रु.

३१,००,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच मा. सभापती यांनी आजची सभा संपल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ६ जुलै ९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक ६ जुलै १९९१ रोजी मा. सभापती श्री. मो. इस्माईल अ. करीम यांच्या अध्यक्षतेच्याखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्यजखान अहेमदखान
३) श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. जावेद हसनखॉन कासीम हसनखॉन
५) श्री. विजय गोविंदलाल पालिवाल
६) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. बारवाल गजानन रामकिसन
९) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
१०) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
११) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

**विषय क्र. १९/१ :**

दिनांक २९-०५-९१ व ०६-०६-९१ च्या स्थायी समिती सभेचे व दिनांक २४-०६-९१ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अलीम बेग, मिर्झा कलीम बेग :** मागील सभेमध्ये सिडको मालमत्ता करांच्या संदर्भात विशेष स्थायी समिती सभा आयोजित होती.

**श्री. केशव सोनवणे :** अगोदर इतिवृत्तावर चर्चा व्हावी असा नियम आहे. त्यानुसार पुर्वी एक प्रश्न संबंधित विभागाबाबत विचारलेला आहे. परंतु त्याचे उत्तर अद्यापही प्राप्त झालेले नाही. शहरामध्ये किती टपऱ्या आहेत आणि किती टपरी धारकांना नियमाप्रमाणे परवानगी दिलेली आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** याबाबतची माहिती संबंधित विभागाकडून मागितलेली आहे.

**श्री. केशव सोनवणे :** मा. आयुक्तांना रु. ५००/- पर्यंतचे टपरीधारकांना जागा देण्याचे अधिकार आहेत. परंतु त्यावरही जाऊन शहरातील बऱ्याचशा टपऱ्या मा. आयुक्तांनी स्वतःच्या अधिकारामध्ये बेकायदेशीर परवानग्या दिलेल्या आहेत. मुंबई प्रांतीक अधिनियमाचे प्रकरण ८ नियम ७९ " अ " अन्वये पंधरा दिवसाचे आत या संबंधात जे करार झालेले आहेत. त्या सर्वांची नोंद घेऊन सर्वांना माहिती देणे आवश्यक ठरते माझ्या माहिती प्रमाणे २० x ३० चे टपरी धारकांनी आक्षेप घेतलेला आहे. त्याची माहिती उपलब्ध आहे काय. उदा. ६ x ४ ची जागा असेल तर. रु. २००/- आणि २० x ३० ची असेल अशा जागेबाबत आपण काय करणार? यासाठी मुंबई प्रांतिक अधिनियमचे प्रकरण आठ (८) मधील ७९ " अ " काय दर्शविले आहे ते वाचून दाखविले.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. सोनवणे आपण जो आक्षेप घेत आहात त्याबाबत वार्ड वाईज माहिती टपऱ्याबाबत उपलब्ध आहेत काय मी संबंधित विभागाकडून याच संदर्भात माहिती मिळविली आणि आतापर्यत एकूण १३२ टपरी धारकांना ७५ ते ३०० रुपये पर्यंतचे दराने जागा दिलेल्या आहेत. असे समजते. परंतु र. ५००/- च्या वरील किंमतीच्या जागेबाबत आपण प्रत्यक्षात निदर्शनास आणावे.

**मा. उप आयुक्त** : मा. आयुक्तांना या संदर्भात ११ महिन्याच्या कराराने रु. ३०००/- चे अधिकार आहेत आणि रु. ३०००/- वरील किंमतीची जागा असल्यास तसे कळवावे. याप्रमाणे असे असल्यास स्थायी समितीला कळविणे भाग पडते. परंतु आयुक्तांना अशा प्रकारचा अधिकार असल्याने कळविण्याची आवश्यकता नाही. ही बाब आयुक्तांच्या कक्षेतील आहे.

**श्री. प्रभाकर विधाते** : ज्या टपरीधारकांना ६ x ४ आणि २० x २० च्या जागा दिलेल्या आहेत. त्यांना आपण कशा प्रकारच्या किंमती आकारल्या आहेत.

**मा. सभापती** : माझ्याकडे मोंढा भागातील एका व्यक्तीने त्याच्या घराच्या कर आकारणी बाबत आपण लावलेल्या कराची नोटीस दाखविलेली आहे. त्यानुसार असे वाटते की, आपण करयोग्य मुल्या कशाच्या आधारे व कोणत्या पध्दतीने काढतो याची माहिती द्यावी काही घरे बांधकाम झालेली असतात तर काही ठिकाणी मोकळी जागा असते. तर काही ठिकाणी भाडेकरु असतात. या सर्वांबाबत आपण कोणते नियम व निकष लक्षात घेतले. याबाबतचे नगररचना विभागास अधिकार आहेत काय? रु. ५/- स्कवेअर फुट प्रमाणे कर आकारणी करतो काय? याची माहिती द्यावी.

**सहाय्यक संचालक नगररचना** : संबंधित फाईलची पाहणी केल्यानंतरच सांगणे स्पष्ट होईल.

**मा. सभापती** : याचा अर्थ असा की, आपण फाईलवाईज कर आकारणी करायचे फिक्स करतो की, नियमावलीतील पुस्तिकेप्रमाणे आकारणी करतो याबाबतची माहिती स्पष्ट (करावी) व्हावी.

**सहाय्यक संचालक नगररचना** : संबंधित कोणतीही संचिका ही मा. आयुक्तांकडे जात असते आणि कोणत्याही जागेची घराची मुल्य पाहुन आकारणी केली जाते. परंतु वार्ड वाईज तसे काही फिक्स नसून या जागेची व घराची मुल्यांकनावर आधारीत आहे.

**श्री. गजानन बारवाल** : याचाच अर्थ असा स्पष्ट होते की, आपल्याला जसे वाटेल तसे करता येईल काय? ४०० स्कवेअर फुटचे बाबतीत काय आहे याचा खुलासा करावा आणि संबंधित फाईल मागविण्यात यावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** : शहा बाजार येथील दोन - तीन व्यक्तींचे घराचे बाबतीत जे कर लावण्यात आले ते सुध्दा योग्य नसून मी संबंधित विभागाला सांगितले आहे. त्या दोघांची फाईल सभागृहात माबविण्यात यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी** : (शहरातील टपरीबाबत माहिती वाचून दाखविली.)

**मा. सभापती** : आपण रु. ५/- स्कवेअर फुट ही मुल्य कोणत्या आधारे लावली आणि कोणत्या आधारे फिक्स केली. याची माहिती द्यावी.

**श्री. केशव सोनवणे** : सदरची बॉब पॉलीशी मॅटरची असल्याने सभागृहात याचा विचार घेऊन निर्णय व्हावा.

**मा. उप आयुक्त :** सदरील बाबतीत मा. आयुक्त यांना अधिकार असून, मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार आयुक्तांनी टपरीच्या संदर्भात आपल्या अधिकाराचा उपयोग केलेला आहे. त्याबाबत आता काहीही होणे शक्य नाही.

**श्री. केशव सोनवणे :** ज्या टपरी धारकांना नियमाप्रमाणे परवानगी दिलेली असते ते टपरीधारक पुढे चालुन जास्तीची जागा व्यापून घेतात. याकडे कुणाचे लक्ष असते काय? ज्या १३२ टपऱ्या शहरामध्ये आहेत त्या परवानगी धारक तर त्याही पेक्षा विनापरवानगी टपऱ्या बसविण्यात आल्या काय? याची दक्षता घ्यावी व नियमाप्रमाणे संपुर्ण शहरामध्ये सर्व्हे करुन याबाबतची माहिती पुढील बैठकीत सभागृहात द्यावी.

**मा. उप आयुक्त :** तसे असल्यास निदर्शनास आणावे. त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. तसेच टपरीबाबत वार्डवाईज माहिती देता येईल.

**श्री. गजानन बारवाल :** शहरातील जी विनापरवानगी टपऱ्या तसेच मान्यताप्राप्त टपरीधारक आहेत. ते पुढे चालुन जागेची व्याप्ती वाढवितात. त्याबाबत कित्येकदा पत्राने कळविले जाते. परंतु प्रशासनातर्फे कोणतीही कार्यवाही होत नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरातील जे विनापरवानगी टपरीधारक आहेत आणि त्यांचा धंदा सध्या चालु आहे. त्यांना नियमाप्रमाणे पक्के करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : शहरामध्ये एकूण टपरीचे सर्व्हे करुन परवानगी व विनापरवानगी किती आहेत. याची माहिती एक महिन्यापर्यंत सर्वांना देण्यात यावी. आणि ज्यांनी टपरीबाबत पुर्वी अर्ज दिलेले आहेत. त्यांच्या बाबत सहानुभूतीपुर्वक विचार करुन त्यांनाही ॲडजस्ट करण्याचे प्रयत्न व्हावेत आणि विनापरवानगी टपरी धारकांवर योग्य ती कार्यवाही करावी. ४ x ६ चे पेक्षा जास्त जागेबाबतच्या टपरीबाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांच्याकडे संबंधित फाईल्स जातात. मी मोंढयातील एका व्यक्तीचे टॅक्सचे प्रकरणाबाबत सांगू इच्छितो की, संबंधितास पुर्वी कमी टॅक्स लागलेला होता. परंतु आता नविनप्रमाणे तेव्हढयाच जागेमध्ये जास्तीचा टॅक्स लागलेला आहे. याचे कारण काय? याबाबतची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

**श्री. तुळशीराम भगुरे :** महानगरपालिकेमधील कामाच्या संदर्भात १९९१-९२ चे अंदाजपत्रकास पुर्वीच सभेने मंजुरी दिलेली आहे. म्हणजे आता आपण कोणत्या कामांच्या खर्चास मंजुरी दयावयाची याची माहिती द्यावी. अजून त्या पुढील वर्षाच्या खर्चास मंजुरी आताच घ्यावयाची काय?

**मा. सभापती** : काही विषय पॉलीश मॅटर व इमरजन्सी असल्याने मा. आयुक्त यांनी स्वतः दोन वर्षाचे खर्चास वार्डवाईज मान्यता दिलेली आहे व आता केवळ प्रस्ताव पाठवून कामास मंजुरी मिळविल्या जाते ते योग्य नसून नविन आयुक्त आल्या नंतर याच संदर्भात चर्चा करण्यात येईल आणि ज्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे ते (रिसिव्हड) फेर विचार करण्याबाबत बोलणी करता येईल. तेंव्हा यावर जास्त चर्चा करणे ठिक नाही. नविन मा. आयुक्त आल्यानंतरच योग्य ती चर्चा करावी व ही बाब निदर्शनास आणावी.

**मा. उप आयुक्त :** तसे काही नसते महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखा परीक्षक हे वर्षाचे बजेट तयार करतात आणि प्रत्येक महानगरपालिकेचे विभागवाईज अंदाजपत्रकीय जमाखर्चाचा आराखडा तयार केल्या जातो. उदा. बांधकाम विभाग/पाणी पुरवठा यांचे कक्षेतील कामे प्रतिवर्षी लागणारा अंदाजित खर्चाचा गोषवारा

काढून आवश्यक कामाचे खर्चास मंजुरी घेणे आवश्यक ठरते. त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करुन मंजुरी नंतर कामास सुरुवात केल्या जाते.

**श्री. केशव सोनवणे :** खर्च करीत असतांना स्थायी समितीला सन ९१-९२ च्या खर्चाचे बाबतीत माहिती देण्यात यावी.

**मा. उप आयुक्त :** सन १९९०-९१ चे बजेट संपल्याचे सन १९९१-९२ चे बजेट मधून खर्च करण्यास मुख्य लेखा परीक्षक यांनी सुचविल्यानुसार केलेले आहे.

**मा. सभापती** : याबाबत संबंधित फाईल्स पाहिल्यानंतर आपण बोलणे ठिक राहील. कारण १९९१-९२ चे बजेट कोणत्या कारणास्तव मंजुर केले गेले. याचाच अर्थ असा की, मा. आयुक्त यांनी मनमानी कारभार केलेला आहे. असे दिसून येते. आज शहरामध्ये अशी स्थिती आहे की, बऱ्याचशा ठिकाणी ड्रेनेज लाईन/पाणी पुरवठा लाईन/रस्ते आदिबाबत नागरिकांमध्ये सतत ओरड असते. व लोकप्रतिनिधीचे काम आहे की, ती सर्व कामे करवून घेणे केवळ अजंडयावर बोलणे ठिक नाही. प्रत्यक्षात कामास सुरुवात करणे योग्य आहे. नसता नागरीक आपल्यासारख्या प्रतिनिधींना सत्कार करावयाच्या ऐवजी माफ करणार नाहीत. हे लक्षात घ्यावे. जर सन १९९१-९२ च्या खर्चास मंजुरी पुर्वीच दिलेली असेल तर, जनतेच्या पुढील कामासाठी सन ९२-९३ च्या खर्चास परवानगी द्यावी.

**श्री. इकबालसिंग गील :** एक पत्र माजी आयुक्त यांना पाठवून याबाबतचा खुलासा मागवावा.

**श्री. प्रभाकर विधाते :** माझ्या वार्डातील एका कामास १.२२ लाखाच्या कामास मंजुर मिळालेली आहे आणि आता १.६० लाखाच्या खर्चास मंजुरी मिळालेली आहे. परंतु बजेट नसल्याने सदरची कामे होऊ शकत नाहीत याचा अर्थ काय?

**मा. सभापती** : सन १९८९ च्या फाईल्स मधील कामास ९० ला मंजुरी दिली याचा अर्थ काय? तेंव्हा मला एव्हढेच सुचवावयाचे आहे की, सं. सदस्य ज्या वेळेस सुचना देतात. त्याचवेळेस त्यांच्या कामास सुरुवात करावी. काही फ्रेश कामास मंजुरी दिल्या जाते व मागील कामे तशीच पडून राहतात. हे योग्य नाही.

**शहर अभियंता :** शहरातील कामांच्या ज्येष्ठता यादीनुसार कामांची सुरुवात होते. सध्या औरंगाबाद शहराच्या वाढता व्याप लक्षात घेता रु. १ कोटी योग्य नाहीत. काही तात्काळ कामे असतात. त्या कामांचे स्वरुप बघून तसे करता येणे शक्य आहे.

**श्री. जावेदखॉन :** कब्रस्थानचे वॉल कंपाऊंडबाबत कित्येकदा पत्र देवूनही काहीही झालेले नाही. याचा अर्थ काय?

**श्री. केशव सोनवणे :** काही कामांच्या (बाबतीत) फाईल्स सन ९१ च्या आहेत. ते मंजुर होऊन पडलेले आहेत. परंतु त्या पुर्वीच्या फाईल्सच्या बाबतीत काहीही झालेले नाही. लेखा परीक्षण बाबत माहिती मागितलेली नाही.

**मा. सभापती** : तसे काहीही नसून इमरजन्सी कामे असल्याने त्या कामास मंजुरी दिलेली आहे. याबाबत जास्त चर्चा करण्यात अर्थ नसून नविन आयुक्त आल्यानंतरच चर्चा करण्यात येईल. लेखा परीक्षणाच्या बाबतीत चर्चा झालेली आहे. या महिन्याच्या शेवट पर्यंत याची माहिती मिळेल.

**श्री. केशव सोनवणे :** च्या महानगरपालिकेतील चार कर्मचाऱ्यांनी केलेला आहे. त्यातील प्रामुख्याने चंडालीया ६१ हजार, तेली ७ लाख ९१ हजार, जी. बी. सोनी

आणि अब्दुल हसन यांच्या बाबतीत लेखा परीक्षण कधी केलेले आहे. आतापर्यंत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परीक्षक :** लेखा परीक्षण हे त्या त्या झोनमध्ये होते. परंतु या विभागातील कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने कामास गती आलेली नाही. सदरील बाबतीत ऑडीट चालु आहे.

**श्री. केशव सोनवणे :** मनपामध्ये तेली सारखे कर्मचारी भ्रष्टाचार करीत आहेत. तेंव्हा त्यांच्या बाबतीत त्वरीत ऑडीट करावे व योग्य ती कार्यवाही करावी नसता धुळे जिल्हा परीषदेतील धर्म भास्कर प्रमाणे येथेलही कारभार त्याप्रमाणे व्हायला नको. याची जाण प्रशासनाने ठेवावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** सन ८८ ला कामाचा अहवाल सादर केलेला आहे. अशी माहिती आहे.

**मुख्य लेखा परीक्षक :** जुन ९१ पर्यंत अंतिम अहवाल सादर करण्यात येईल. काही कर्मचाऱ्यांच्या इतरत्र बदल्या झालेल्या असल्याने थोडा उशीर होत आहे.

**मा. सभापती** : किती पुर्वी अहवाल सादर करणार, कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने कामे थांबलेली आहेत. कारण त्यांचे काही बदली प्रकरण आहेत.

**मा. उप आयुक्त :** सदरील कामाबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे. परंतु कामाबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : एका महिन्याचा अहवाल द्यावा आणि दुसऱ्या महिन्यात अहवालची माहिती आवश्यक आहे. ऑडीट कामामध्ये खंड पडता कामा नये. ऑडीट रेग्युलर असणे आवश्यक आहे. तसेच मागील व पुढील ऑडीट सारखेच चालु असावे.

**श्री. गजानन बारवाल :** प्रत्येक विभागामध्ये किती शिपाई असतात. याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी याची माहिती द्यावी.

**मा. उप आयुक्त :** याबाबतची माहिती मागविलेली आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलविण्यात येणार असून, तीत निर्णय घेण्यात येणार आहे.

**मा. सभापती** : कोणत्या विभागामध्ये किती शिपाई आहेत याचा सर्व्हे करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. केशव सोनवणे, श्री. अलिम बेग, मिर्झा कलीम बेग :** दि. ०६-०२-९१ ला एक विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात आलेली होती. परंतु सदरची सभा स्थगित करण्यात आली. मला अशी माहिती मिळालेली आहे की, मा. आयुक्त यांनी स्वतःच्या अधिकारामध्ये सदरचा प्रस्ताव मंजुर केला.

**मा. सभापती** : याबाबत आपल्याकडे माहिती नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. जोपर्यंत संबंधित फाईल्स येऊ शकत नाही तोपर्यंत बोलण्यात अर्थच नाही.

**श्री. केशव सोनवणे :** मा. महापौर संबंधित अधिकाऱ्यांनी फाईल आणलेली आहे. माहिती द्यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. माहिती घ्यावी.

**सहाय्यक आयुक्त-२ :** दि. ०१-०४-९० पासून प्रॉपर्टी टॅक्स लावण्याबाबत करार झालेला आहे. (त्या आदेशाची माहिती वाचुन दाखविली) याप्रमाणे सिडको येथील सर्व्हीस चार्जेस बंद केलेले आहेत. मा. आयुक्त यांनी सदरील काम मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम क्र. ६७ (३) क अन्वये स्वतःच्या कक्षेतील बाब म्हणून इमरजन्सी अधिकारान्वये कामास सुरुवात केलेली आहे. यासाठी पुढील कार्यवाही चालु आहे.

**मा. सभापती, विधी सल्लगार :** विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. (मुंबई प्रांतिक नियम ६७, (३) क च्या प्रमाणे वाचुन दाखविले) कोणतेही अंतिमहत्वाचे आणि आणीबाणीचे प्रस्ताव जनतेच्या व्यवस्थेसाठी आणि महानगरपालिकेच्या कार्याची समर्थनीय वाटेल अशी कामे मा. आयुक्त स्वतःच्या अधिकाराने करु शकतात आणि स्थायी समिती / सर्वसाधारण सभा यांच्याकडे ही बाब दाखविणे आवश्यक आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** मा. आयुक्त यांनी नियम ६७ (३) क चा गैरवापर केलेला आहे. ते योग्य नाही.

**श्री. केशव सोनवणे :** सन १९९१ कोणता प्रस्ताव असा मांडण्यात आलेला होता की, त्याबाबत निर्णय घेतला गेला. मा. आयुक्तांनी जो टॅक्स लावला आहे तो मुंबईप्रांतीक अधिनियमानुसार लावण्यात आलेला नसून तो चुकीचा आहे. सर्वांच्या निदर्शनास ही बाब आणलेली आहे काय?

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना पुर्णपणे खुलासा करु द्या आणि नंतर सर्व स. सदस्यांना काय बोलावयाचे ते बोलावे व मग निर्णय घेता येईल. आम्हालही सिडकोबाबत अभिमान आहे.

**विधी सल्लागार :** सिडकोकडे जे कॉन्ट्रक्ट पध्दतीने सध्या काम करीत होते. तीच कामे ट्रन्सफर झालेली असून, सन १९८२ पासून आपल्या महानगरपालिकेने टॅक्स लावणे आवश्यक होते. परंतु ९१ ला टॅक्स लावून साफसफाईबाबत मा. आयुक्त यांनी आदेश काढलेला आहे.

**श्री. केशव सोनवणे :** विशेष बैठक याबाबत आयोजित करण्यात आलेली होती व ती स्थगित झालेली होती. त्या बैठकीच्या निषेधार्थ सचिव नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडे कळविण्यात यावे.

**मा. सभापती :** या सदंर्भात स्थायी समिती सर्वसाधारण सभा या जर अस्तित्वात नसल्या तरची बाब होती परंतु या ठिकाणी केवळ सभा स्थगित झालेली होती म्हणजे याचा अर्थ असा नाही की, नियम ६७ (३) क चा उपयोग करुन काम करवून घ्यावयाचे व या सभेला अंधारात ठेवण्याचे ते योग्य नाही.

**उप आयुक्त :** मा. आयुक्तांना अशा प्रकारचे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम (३) क-प्रमाणे अधिकार आहेत आणि त्याच नियमाचे अधिन राहुन मा. आयुक्तांनी आदेश दिलेला आहे. या आदेशावर आता काही करणे शक्य नाही. यापुर्वी स्थायी समितीला माहिती म्हणून सदरचा विषय ठेवण्यात आलेला होता. परंतु या समितीची सभा स्थगित झाली आणि पुढील बैठक स्थगित झालेल्या सभेसाठीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सभा कधी बोलावणार याची अनिश्चितता होती. यामध्ये असा कुठेही उल्लेख नव्हता आणि म्हणून मा. आयुक्तांनी अशा प्रकारे लोकोपयोगी जी कामे असतील तीची तत्परता लक्षात घेता नियमाच्या अधिन राहुन करार केलेला आहे. आदेश केलेला आहे. या बाबतीत आता कुणाला आक्षेप असेल तर कोर्टाचा मार्ग खुला आहे. त्याकडे दाद मागता येते. परंतु मा. आयुक्तांच्या झालेल्या आदेशावर बदल करणे आता शक्य नसून पुढील कार्यवाही चालु आहे.

**श्री. केशव सोनवणे :** स्थायी समितीची सभा अशा प्रस्तावावर चर्चा न करता स्थगित केलली तरीही मा. आयुक्तांनी असे करणे ठिक नव्हते. त्याच प्रमाणे सिडको साफसफाईचे संदर्भात कॉन्ट्रक्टरचा प्रश्न आहे. त्यांना आपण कशा प्रकारे कामे करवून घेण्यास सुचविणार.

**श्री. जावेदखान :** सदरचा विषय स्थायी समितीच्या बैठकीत आल्यानंतर चर्चा करणे आवश्यक होते.

**मा. उप आयुक्त :** ज्योपर्यंत कॉन्ट्रक्टरचे पेमेंट होत नाही. तोपर्यंत कामे चालु ठेवणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : आपणाकडे सिडकोने पत्र दिले आहे काय की, मार्च-एप्रिल महिन्यापासून साफसफाईची कामे बंद होतील. याबाबत खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त-२ :** सिडकोकडून दि. १९ मार्च ९१ ला पत्र आले होते. दि. १ ऑगस्ट ८९ ला त्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर यांनी करार केल्याचे पत्र आहे. (या कराराचा मजकूर वाचून दाखविला.)

**मा. सभापती** : आपण शहरामध्ये साफसफाई कर घेतो काय? सिडकोला साफसफाई कर लावलेला आहे काय? आणि तसे नोटीफिकेशन काढलेले आहे काय? या महानगरपालिकेची तरतूद केवळ शहराच्या विकास कामासाठी करण्यात आलेली असून, सिडकोला आपण साफसफाईच्या संदर्भात रु. ४.७५ काम दान म्हणून देणार आहेत काय? अशा प्रकारचे नोटीफिकेशन काढून मालमत्ता कराबाबत अद्यापही कोणतीच कार्यवाही दिसत नाही. केलेला करार चुकीचा आहे बऱ्याच नागरिकांनी कोर्टात केसेस केलेल्या आहेत. त्यांना सुविधा पुरविणे आवश्यक असते. परंतु शहराचे रु. ४.७५ लाख सिडकोला देणे योग्य नाही आमचे मत आहे की, कोणत्याही प्रकारचा अधिकार कर्मचाऱ्यांचे पगार अणि करार कोणतही करण्यात येऊ नये.

**मा उप आयुक्त :**शहरामध्ये साफसफाई कर आकारला जातो मा. आयुक्त यांनी मागील सभेमधील इतिवृत्ताचे पान क्र. ३ मध्ये उल्लेख केलेला आहे. दि. ०६-०६-९० ला झालेल्या प्रस्तावाप्रमाणे व हा प्रस्ताव दि. २५-०६-९१ ला सादर केला. महानगरपालिकेने दि. ०१-०४-९० पासून सिडको भागात मालमत्ता कर लागू केला असून, प्रशासनाने भाडेकरु, मालक, व सिडको औरंगाबाद हयांच्या झालेल्या करारानुसार सर्व्हिस चार्जेस घेणे बंद केले. सदर संचिकेनुसार सिडको प्रशासन घ्याचे गुत्तेदाराकडून साफसफाईचे काम करु घेत हेते त्याच अटीवर महानगरपालिकेने ही दि. ३१-०३-९२ पर्यंत काम करुन घेऊन रक्कमेची अदाई करावी. महानगरपालिकेने मालमत्ता कर वसूली सुरु केली तेंव्हा सिडको प्रशासनाने गुत्तेदारास रक्कमेची अदाई केली. मुंबई प्रांतीक महानगरपालिका नियम १९४९ प्रमाणे सिडको भागाची साफसफाई करणे, जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. दि. ०१-०७-९१ पासून संबंधित गुत्तेदारांना रु. ३९,०००/- प्रतिमहा देण्यात येतात.

**श्री गिरजाराम हाळनोर :**इतिवृत्तातील पान क्र. ४ प्रमाणे खुलासा केलेला आहे. मग करार का केला नाही.

**श्री प्रभाकर विधाते :**मनपा नियमाप्रमाणे मा. आयुक्त यांनी आतापर्यंत किती कामे केलेली आहेत. याची माहिती द्यावी.

**मा.उप आयुक्त :** स्थायी समिती मध्ये सदरील प्रस्ताव मांडलेला होता. परंतु बैठकीला स्थगिती किती कालावधी पर्यंत होती याचा उल्लेख नाही. मुंबई प्रांतीक अधिनियमानुसार स्थायी समितीकडे माहितीसाठी हा प्रस्ताव देण्यात येतो आणि याबाबतची माहिती त्यात दर्शविण्यात आलेली होती.

**श्री केशव सोनवणे, श्री प्रभाकर विधाते :** नियम ६७ (३) क प्रमाणे अशा पध्दतीने किती कामांच्या प्रस्तावास मंजुरी झालेली आहे. याबाबत माहिती सभागृहात दाखल करावी.

**मा. सभापती** : सर्वोच्च (अंतिम) निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. आतापर्यंत झालेल्या संपुर्ण कामाची माहिती विभाग वाईज पुढील बैठकीत देण्यात यावी. खर्चाची आखणी सुध्दा प्रत्येक विभाग वाईज देण्यात यावी. यामध्ये एकूण १४ (चौदा) महिन्याची माहिती विभाग वाईज विस दिवसाचे आत मिळणे आवश्यक आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** महानगरपालिकेकडील व्हॅक्यूम पंपाच्या बाबतीत असे निदर्शनास आलेले आहे की, त्या गाडी वरील काम करणारे कर्मचारी हे नागरिकांकडून पैसे घेऊन कामे करतात. हे योग्य नाही. तेव्हा या कामासाठी नागरिकांच्या हितासाठी मोफत असते.

**श्री. तुळशीराम भगुरे :** हे योग्य नाही. याबाबत संबंधितांना योग्य ती समज द्यावी.

**श्री नारायण फत्तेलष्कर, श्री. जावेदखॉन :** आतापर्यंत लोटलेल्या मागील ३ वर्षाची माहिती मागविण्यात यावी. स्थायी समिती सभा असूनही अति तात्काळ कामे कशा प्रकारे हाताळले ते स्पष्ट होईल.

**श्री. गजानन बारवाल :** सध्या पावसाळयाचे दिवस सुरु झालेले आहेत. संबंधित कामाबाबत झोनवाईज देखरेख ठेवावी.

**मा. सभापती** : नियमाप्रमाणे व्हॅक्युम पंपाबाबत नागरिकांच्या हितासाठी मोफत काम करावे. हे बंधन घालणे योग्य नसून केवळ अति तात्काळ समयी कोणतीही बाब असल्यास मोफत सेवा करता येईल. परंतु नेहमीसाठी मोफत सेवा महानगरपालिकेला न परवडणारी आहे. त्याचप्रमाणे स. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे तीन वर्षाची माहिती मागविणे योग्य नसून केवळ एकाच वर्षाची माहिती (फाईल्स) पाहुन आपण काय ते समजू शकतो. कदाचित अति तात्काळ कामे असल्याने बरेचशे कामे मंजुरी देऊन झालेले असतील ते सुध्दा पाहणी नंतर समजून येईल.

**श्री. केशव सोनवणे :** दि. ०६-०६-९१ चे इतिवृत्त व दि. ०१-०४-९० चे मालमत्ता टॅक्स लागू करण्या बाबतच्या संबंधी मुंबई प्रांतीक अधिनियम प्रकरण ८ मधील ०२-१३ व १९ प्रमाणे ज्या अटी पुर्ण झालेल्या नाहीत तेंव्हा कर लावणे योग्य नाही. या बाबत नागरीक म्हणून आम्ही न्यायालयात दादा मागू शकतो.

**मा. उप आयुक्त :** मुंबई प्रांतीक अधिनियम ६७ (३) क प्रमाणे मा. आयुक्तांना अधिकार आहेत व त्या अधिकरानुसार त्यांनी सिडको या साफसफाईचे काम त्याच कॉन्ट्रॅक्टर तर्फे करण्यास मंजुरी दिलेली आहे. सदरची बाब त्यांच्या अधिकारातील असल्याने त्यांनी मंजुरी दिलेली आहे. या संदर्भात ज्यांना काय आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी कोर्टाकडे दाद मागावी. याबाबत आता काही करणे शक्य नाही.

**श्री. केशव सोनवणे :** या संदर्भात कोर्टाकडे दादा मागविण्याचे कमीटीला जरी अधिकार नसले तरी एक नागरीक म्हणून आपण न्यायालयात दाद मागू शकतो. ज्यावेळेस कर लावण्यासंबंधी आपले अधिकार आहेत. तर त्याच प्रध्दतीने शहरातील प्रत्येक नागरीकास व विभाग वाईज झोनमध्ये कशा प्रकारे कर आकारणी करतो याची पुस्तीका माहितीस्तव ठेवणे आवश्यक आहे आणि त्यानंतर काहींचे आक्षेप आहेत काय हे पाहुन पुढील कार्यवाही करता येणे

शक्य झाले असते कारण पुस्तीकेंमध्ये जनतेची माहितीसुध्दा असणे आवश्यक आहे. शिवाय आपण जो कर लावतो त्याची माहिती सामन्य नागरिकांना असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : सिडको मालमत्ता कराबाबत पध्दतशीरपणे पाहणी करणे आवश्यक आहे. सदरच्या विषयाचे इतिवृत्ताची चर्चा मागील बैठकीत झालेली आहे.

**श्री. एकबालसिंग गील :** मागील इतिवृत्तातील पान क्र. २० मध्ये सुचविल्यानुसार काय झाले याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : या संदर्भात सादिया सिनेमा मागून ( वार्ड क्र. ४१ ) रोषन मस्जिद पर्यंत दगडी गटार (नाली) बांधणे बाबब ज्या चार सं. सदस्या संबंधित स्थळी जाऊन प्रत्यक्षात पाहणी करावयाचे ठरले होते. त्याप्रमाणे आमच्या अधिकाऱ्यांची या ठिकाणी चुक झालेली आहे की, स. सदस्यांना या ठिकाणी घेऊन पाहणी करावी. तात्काळ अहवाल द्यावा. कारण स्थायी समिती सभा आठवडयात एकदा होत असल्याने या सभेला वेळ कमी असतो. यास्तव सदरचा प्रस्ताव पुर्वीच मंजुर करण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे विषय क्र. १५-१३ कबीर नगर येथील शौचालय बांधणे बाबत स. सदस्यांनी पाहणी करुन अहवाल द्यावा असे सांगितले होते. त्यांनी पाहणी केलेली आहे व अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार १५/१३ व १६/१४ या दोन्ही प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहेत.

**श्री. केशव सोनवणे :** इतिवृत्तातील पान क्र. २२ वरील सिडको भागातील पाणी पुरवठा व मनपा पाणी पुरवठा याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होत असलेल्या प्रतिदिन पाणी पुरवठया संदर्भात २० रु. ३१ लाखाच्या खर्चास सर्वसाधारण सभेमध्ये माहितीस्तव ठेवण्यात यावा.

**श्री. प्रभाकर विधाते :** मागील बैठकीत सुचविल्यानुसार मुंबई जकात नाक्यावर झालेल्या आगीच्या संदर्भात माहिती द्यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**जकात अधिक्षक :** मुंबई जकात नाक्यावर जी लागली होती त्यामध्ये कार्यालयीन नुकसान झालेले नाही. परंतु तेथील श्री. बाराबोटे यांच्या लुनाचे थोडेसे नुकसान झालेले आहे आणि कुणालाही इजा झालेली नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** संबंधित कर्मचाऱ्यास नुकसान भरपाई द्यावी.

**मा. सभापती** : याबाबत उप आयुक्त यांच्याशी केलेल्या (चर्चेनुसार संबंधित कर्मचाऱ्याला कामावर असतांना आग लागू त्याची लुना जळावी व काही नुकसान झाले या संदर्भात त्याला आर्थिक नुकसान भरपाई म्हणून काही मदत करता येईल. याबरोबरच मागील इतिवृत्तास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

१) शहरातील एकूण टपरीबाबतची माहिती

२) ६७ (३) क प्रमाणे एकूण १४ महिन्याची माहिती

३) स. सदस्य श्री. शंकर मगर यांनी अर्ज केला आहे की, दिनांक ३० मार्च १९९१ रोजी ऐनवेळच्या विषयात मो. इंदिरानगर मधील विहरीवर मोटरपंप बसविणे व सिमेंटच्या दोन टाक्या बांधणे बाबतचा प्रस्ताव आलेला होता व या दोन्हीही प्रस्तावात स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती. दि. २६-०६-९१ च्या स्थायी समितीचे संपन्न झालेला इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये याबाबतचा संवादाचा उल्लेख आहे.

सदरील दोन्हीही कामावर होणारा खर्च हा नगरसेवक स्वेच्छा निधीतून करण्यात येणार आहे तेंव्हा यास मंजुरी देण्यात येते.

४) त्याचप्रमाणे स. सदस्य अजिमखॉ दादामियॉ यांनी अर्ज सादर केलेला आहे की, २२-०४-९१ रोजी स्थायी समितीचा ठराव क्र. ५८२/१४ अन्वये श्रीमती बिसमिलाबी भ्र. म. उस्मान रा. सिल्लेखाना औरंगाबाद यांना रॉक्सी टॉकीजच्या मागील जागा ३० वर्षाच्या लिजवर देण्यात आली सदरची जागा अर्जदाराची रोडमध्ये ॲक्वायर करण्यात आली म्हणून मोबदल्यात नॉर्मल लिजवर देण्यात आली. परंतु ठरावामध्ये (३० वर्षे) कालावधीसाठी लिजवर देण्यात आली असे नमूद करण्यात आलेले नाही. सदरील दुरुस्ती सर्वानुमते करण्यात येते व इतर दुरुस्त्यांसह दि. २९-०५-९१ व ०६-०६-९१, विशेष स्थायी समिती सभेचे व दि. २४-०६-९१ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०/२ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती ठराव क्र. ४६९ दि. १६-०३-९१ द्वारे मोचीवाडा (पद्मपुरा) स्लम भागात मुलभूत सुखसोई पुरविण्यासाठी र. रु. ३,९९,१४५/- चे अंदाजपत्रकास मंजुरी दिली असून, यामध्ये वरील भागात खांडकी पेव्हिंग करण्याचे कामासाठी रु. ३३,७३५/- चा समावेश आहे. सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दर निर्दिष्ट निदि प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | बी. एम. काथार | १०% कमी |
| २. | श्री. सय्यद रफिक | ०१.१% कमी |
| ३. | श्री. अे. के. साब | ५% कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री. बी. एम. काथार यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** या प्रस्तावात सुचविल्यानुसार मुलभूत सुखसोई पुरविण्यासाठी म्हणजे नेमके काय याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : सदरचा स्लम भाग असल्याने या भागातील बऱ्याच दिवसापासूनच्या मागण्या आहेत व खांडकी पेव्हींगचे कामासाठी सदरील खर्च करण्यात येणार आहे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोचीवाडा ( पद्मपुरा ) स्लम भागात मुलभूत सुखसोई पुरविणेच्या अंदाजपत्रकांतर्गत वरील भागात खांडकी पेव्हींग करण्याचे कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराच्या श्री. बी. एम. काथार यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांती चौक येथील शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळ हेवी डयुटी फलड लाईट लावण्यासाठी मा. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांच्या मागणीप्रमाणे सा. बा. खाते (विद्युत) सन ८९-९० च्या दरसुची नुसार र. रु. १४,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मान्यता मिळावी. सदर कामासाठी मोहरबंद निविदा मागविल्या असता एकूण चार दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ३% कमी |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ४.५% जास्त |
| ३. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ११% कमी |
| ४. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ४.५% कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराची मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची निविदा आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**नारायण फत्तेलष्कर :** कोणत्याही शहराच्या विकासासाठी आमदार फंड (निधी) असतो तो राज्य शासनाकडून का घेण्यात आलेला नाही व त्यातूनच खर्च करणे भाग पाडावे.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक येथील शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळ हेवी डयुटी फल्ड लाईट लावण्यासाठी र. रु. १४,८००/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराच्या श्री. मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंचच्या डिमर बोर्डचे नुतनीकरण करण्यासाठी डिमर बोर्ड तज्ञांच्या सल्ल्याप्रमाणे (सदर बाब ही डी. एस. आर. मध्ये समाविष्ट नसल्याने) अंदाजपत्रक र. रु. ७९,२२५/- चे तयार करण्यात आले असून, सदर खर्च हा भांडवली इमारत या सदरामधून करण्यात येईल. त्यास मान्यता मिळाली.

सदर कामासाठी मोहरबंद निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे .

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शांती इलेक्ट्रीकल्स, लातूर | ३०% जास्त |
| २. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | २५% जास्त |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | १५% जास्त |
| ४. | प्रगत इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ४.५% जास्त |
| ५. | इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ७.९% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९% कमी दराची मे. इगल इलेक्टीकल्स औरंगाबाद यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. एकबालसिंग गील :** या संदर्भात वर्तमानपत्रानमध्ये जाहिरात दिलेली आहे. काय याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता विद्युत :** औरंगाबाद शहरातील दैनिक लोकमत टाईम्स या वर्तमान पत्रातून जाहिरात देण्यात आलेली आहे.

**श्री. केशव सोनवणे :** यापेक्षा शहरातील बरेचशे अतिमहत्वाची कामे बंद आहेत. प्रस्तावाचा निर्णय नंतर करण्यात यावा.

**उप आयुक्त** : मी प्रत्यक्षात पाहणी केल्यानुसार त्या ठिकाणी जो कर्मचारी काम करतो त्यांना लाईट चालु बंद करतांना बटनची व्यवस्था ठिक नाही. यामुळे कधी काय होईल सांगता येत नाही. तेथील कर्मचारी अंधारात असतो करीता प्रस्ताव विचारार्थ ठेवावा.

**मा. सभापती** : मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर येथील रंग मंचच्या डिमर बोर्डचे नुतनीकरण करण्याचे कामाकरीता र. रु. ७९,२२५/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९% कमी दराच्या मे. इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती ठराव क्र. ४५५ दि. १६-०३-९१ अन्वये शिवाजी चौक ते मोंढा चौक पर्यंत २५० वॅट एच. पी. एस. व्ही. फिटींग पुरवठा करण्याच्या कामाकरीता र. रु. २,७१,६३०/- ला मान्यता मिळाल्यानंतर सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | प्राप्त दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | फिटींग | बल्ब | ब्रॅकेट | क्लॅब |
| १. | मे. मेहता ट्रेडर्स, मुंबई | १८९९/- | ५७८/- | ५८५-१० | ३०/- |
| २. | मे. मेघदूत इलेक्ट्रीकल्स ॲड इलेक्ट्रीकल्स, मुबई | २२९९/- | ५८५/- | ५९७/- | ७०/- |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे एकूण र. रु. ३०९२.१० (फिटींग+बल्ब+ब्रॅकेट+क्लॅप) (बजाजमेक) इतकी मे. मेहता ट्रेडर्स, मुंबई यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** सदरील प्रस्तावसाठी नियमाप्रमाणे ३ निविदा पाहिजे होत्या. त्या ठिकाणी दोनच निविदा दिसत आहेत. यापेक्षा स्थानिक एजन्सीकडून निविदा मागवावयाच्या होत्या.

**मा. सभापती** : दोन वर्षापासून आपण पाहात आहोत. सदरील प्रस्तावाच्या ज्या निविदा आलेल्या आहेत. त्या बाहेरील असून, डायरेक्ट कंपनीकडूनच मागविण्यात आलेल्या आहेत.

**श्री. केशव सोनवणे :** स्थानिक व्यक्तिंनी / एजन्सींनी निविदा कर भरलेली नाही.

**उप अभियंता (विद्युत) :** एकंदरीत चाट निविदा आलेल्या होत्या. पैकी चितांमणी यांचीही निविदा आलेली होती.

**श्री. गजानन बारवाल :** जालना रोडवरील जे शिप्टींग पोल होत आहेत. त्या ठिकाणचे लाईट बाबत शहरामध्ये इतर ठिकाणी वापर होऊ शकतो.

**श्री. केशव सोनवणे, श्री. गजानन बारवाल :** कंपनी रेटप्रमाणे लाईट लावण्यात येत आहेत काय जालना रोड वरील दिवे नेहमीच बंद असतात. तेथे सोडियम व्हेपरचे दिवे बसवून इतर ठिकाणी तेथील पोल व दिवे बसविण्याची व्यवस्था व्हावी.

**शहर अभियंता** : या संदर्भात गॅप पाहुन तसे करता येणे शक्य आहे.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवाजी चौक ते मोंढा चौक पर्यंत २५० वॅट एच. पी. एस. व्ही. फिटींग (फिटींग+बल्ब+ब्रॅकेट+क्लॅप) पुरवठा करण्याच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजे र. रु. ३,०९२.०० (प्रति नग) या दराने मे. मेहता ट्रेडर्स मुंबई यांच्याकडून (बजाज मेक) उपरोक्त विद्युत साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र. २८ व २९ चौराह धावणी मोहल्ला सिमंत गल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९१-९२ च्या डी. एस. आर. दराप्रमाणे र. रु. १,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २८ व २९ चौराहधावणी मोहल्ला, सिमंत गल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. १,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २५/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला कॉलनी येथील अतिरिक्त शहर अभियंता यांच्या निवास्थानाची वाढ करण्याच्या कामासाठी सन ९०-९१ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ४५,०००/- च्या अंदाजपत्रकास दि. १४-०३-९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता श्री. सैय्यद गयासुद्दीन याची अंदाजपत्रकीय दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोटला कॉलनी येथील अतिरिक्त शहर अभियंता यांच्या निवास्थानाची वाढ करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या श्री. सय्यद गयासुद्दीन यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६/८ :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवसमाधान सहकारी गृह निर्माण संस्था इटखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकण्याचे

कामासाठी र. रु. ९८,३००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २८-१०-९० रोजी मंजुरी दिलेली आहे.

सदरील काम विकास निधी अंतर्गत करावयाचे आहे. नगर रचना विभागाने संचिकेत दिलेल्या अहवालानुसार या संस्थेस एकूण रु. १,६८,०६३/- इतका विकास खर्च आकारण्यात आला असून, त्यापैकी र. रु. १,३०,०९०/- इतका विकास खर्च सदरील संस्थेने जमा केलेला आहे.

मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्याप्रमाणे सदरील कामासाठी जाहीर निविदा मागविल्या असता एकूण आठ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बशीरखान लालखान | १८% कमी |
| २. | श्री. बी. एम. काथार | ५% कमी |
| ३. | श्री. अे. के. अरोरा | २२% कमी |
| ४. | श्री. आर. जे. पाटील | १७.०९% कमी |
| ५. | श्री. अे. एस. फारुकी | ३२.८% कमी |
| ६. | श्री. पी. एच. पजनानी | १८.७७% कमी |
| ७. | श्री. के. बी. काल्डा | २५.२५% कमी |
| ८. | श्री. एस. अे. साठे | २०.००% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ३२.८% कमी दराची श्री. अे. एम. फारुकी यांची निविदा आहे. सदरील निविदा स्विकारणेकरीता संचिका मा. सभापती स्थायी समिती यांचेकडे स्वाक्षरीस्तव पाठविण्यात आली असता त्यांनी स्थायी समितीमध्ये ठरल्याप्रमाणे २५% कमी दराच्या निविदा स्विकारता येणार नाहीत असा शेरा लिहुन संचिका परत या विभागास पाठविली.

करीता मनपा/पापु/५२/९० दिनांक १३-०२-९१ अन्वये फेर निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अर्शद नोमी | ४% कमी |
| २. | श्री. पी. एच. पजनानी | ४% जास्त |
| ३. | श्री. अे. अे. अबेदी | ०.०५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. अे. अे. अबेदी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवसमाधान सहकारी गृहनिर्माण संस्था, इटखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता मागविण्यात आलेल्या फेर निविदानुसार प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. अे. अे. अबेदी यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७/९ :**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, उस्मानपुरा येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता र. रु. ४३,६००/- च्या अंदाजपत्रकास दि. ०७-०१-९१ रोजी

मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामाकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गिरीश सिकची | १७.१०% कमी |
| २. | श्री. अब्दुल कलीम | १६.९५% कमी |
| ३. | श्री. सुखबीरसिंग | १६% कमी |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १५% जास्त |
| ५. | श्री. जयलाल खान | १४.७८६% कमी |
| ६. | मे. एस. एच. असोशिएटस | १३% कमी |
| ७. | श्री. एस. ए. नवाब | ११% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१०% कमी दराची श्री. गिरीश सिकची यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१०% कमी दराच्या श्री. गिरीश सिकची यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८/१० :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९१-९२ सालात चतुर्थ व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांना टेरीकॉट गणवेश देण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या खालील प्रमाणे.

१. मे. सुगन औरंगाबाद -
२. मे. रमेश बिन्नीज टेक्स्टाईल्स औरंगाबाद -
३. मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद -

तसेच शासनाच्या अधिपत्याखालील संस्थेने पण निविदा भरल्या होत्या व दरपत्रके दिले होते. ते खालील प्रमाणे.

१. मे. गोदावरी गारमेन्टस लि. औरंगाबाद -
२. मे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप-कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई, (औरंगाबाद विभाग)

महाराष्ट्र शासनाने वेळावेळी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत व अधिपत्याखालील संस्थेकडून गणवेश कापड खरेदी करण्याकरीता परिपत्रक काढलेले आहेत. करीता शासनाच्या आदेशाप्रमाणे गणवेश कापड खरेदी करण्याकरीता मा. आयुक्तांनी पण शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील संस्थेकडून खालील दर्शविल्याप्रमाणे गणवेश कापड खरेदी करणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ-टेरीकॉट कापड रु. ७५/- प्रति मिटर (सियाराम मिलचे) रंग खाकी, पांढरा सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी करीता

२) महाराष्ट्र राज्य को-ऑप कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई, (औरंगाबाद विभाग)- टेरीकॉट कापड रु. ११५/- प्रति मिटर (शासन निर्मित) रंग खाकी, पांढरा सर्व निरिक्षक व वाहन चालक करीता.

३) मे. गोदावरी गारमेन्टस लि. - टेरीकॉट कापड (महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत उद्योग) रु. ६९/- प्रति मिटर, एस कुमार मिल्सचे, रंग निळा, पाणी पुरवठा व यांत्रीकी विभाग

वरील प्रमाणे गणवेश कापड खरेदी करण्याकरीता दरास मान्यता देण्यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे, श्री. प्रभाकर विधाते, श्री. एकबालसिंग गील, श्री. गजानन बारवाल :** या प्रस्तावामध्ये ज्यांच्या निविदा आलेल्या आहेत. त्यांचे दर यामध्ये नाहीत. एकंदरीत किती कर्मचाऱ्यांना किती कापडा लागेल याचिही माहिती या ठिकाणी देण्यात आलेली नाही.

**मा. सभापती** : या प्रस्तावाबाबत मनपातर्फे किती कर्मचाऱ्यांना व कोणत्या कर्मचाऱ्यांना गणवेश कापड देणार आहेत व कपडा किती लागेल याची सविस्तर आखणी करुन माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सह सदर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९/११ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरा नगर (बायजीपुरा) स्लम भागात विहिरी जवळ दगडी गटार बांधण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ३०,५५०/- ला दि. १३-०१-९१ ला मंजुरी देवून ९१-९२ मध्ये घेण्यासाठी आदेश दिल्यानुसार कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शे. रफिक | ४.९९% जास्त |
| २. | श्री. एस. जी. मुळी | ७.८६% कमी |
| ३. | श्री. एम. एम. बेग | १०.८६% कमी |
| ४. | श्री. अब्दुल खलीक | २२% कमी |
| ५. | श्री. बी. एम. काथार | १०% कमी |
| ६. | श्री. देवराव वाहुळ | ७.७% कमी |
| ७. | श्री. सय्यद सिराजुद्दीन | १८.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री. अब्दुल खालीफ यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इंदिरानगर (बायजीपुरा) स्लम भागात विहिरीजवळ दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री. अब्दुल खालिफ यांच्या निविदेस स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३०/१२ :**

उप अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, सादात नगर स्लम भागात मुलभूत सुखसोई उपलब्ध करुन देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४५९ दिनांक १६-०३-९१ द्वारे र. रु. २,९५,०६३/- ला मंजुरी दिली असून, यामध्ये सादात नगर स्लम भागात गटारीचे कामासाठी रु. ३८,२००/- चा समावेश आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एल.आर. गोरे | १.३% कमी |
| २. | श्री. डी. एन. वाहुळ | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३% कमी दराची श्री. एल. आर. गोरे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादात नगर स्लम भागात गटारीचे काम करण्यासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३% कमी दराची श्री. एल. आर. गोरे यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३१/१३ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधी नगर स्लम भागात खांडकी पेव्हींग व गटारीचे बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ४६,४००/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार कार्यालयाची निविदा सुचना क्र. १ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिक | ३.१% कमी |
| २. | श्री. ए. एम. फारुकी | २% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१% कमी दराची श्री. सय्यद रफिक यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीनगर भागात खांडकी पेव्हींग व गटारीचे बांधकाम करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१% कमी दराची श्री. सय्यद रफिक यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३२/१४ :**

उप अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, लायन्स क्लब, मुकुंदवाडी स्लम भागात आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४२२ दि. ०७-०२-९१ द्वारे र. रु. १,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर

कार्यालयीन निविदा सुचना क्र. ३ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ७.५% जास्त |
| २. | मे. एस. एच. असोशिएटस | ६% जास्त |
| ३. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ४.९५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची मे. विपुल कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लायन्स क्लब (मुकुंदवाडी) स्लम भागात आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराच्या मे. विपुल कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३३/१५ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, ब्रिजवाडी स्लम भागातील महानगरपालिकेच्या शाळेजवळील उद्यानास कंपाऊंड वॉल तसेच नाल्यास दगडी पिचींग करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ९९,२७५/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी देवून सदर काम ९१-९२ मध्ये घेण्याचे आदेश दिल्यानुसार वरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जलील खान | १% कमी |
| २. | श्री. शे. रफिक | १७.७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७% कमी दराची श्री. शे. रफिक यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी स्लम भागातील मनपा शाळेजवळील उद्यानास कंपाऊंड वॉल तसेच पिचींग करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७% कमी दराची श्री. शे. रफीक यांची निविदि स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३४/१६ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रिय दर्शनी " इंदिरा नगर" स्लम भागात दगडी गटार बांधकामासाठी अंदाजपत्रक र. रु. ३३,४००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम तयार करण्यात आले आहे. सदरील काम वरील स्लम भागातील सार्वजनिक संडासाचे युनिट-१ जवळील नाल्याचे पाण्यापासून सार्वजनिक संडासाचे संरक्षण करण्यासाठी नालीचे काम पाऊस सुरु होण्यापुर्वी तातडीने होणे आवश्यक आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु ३३,४००/- ला मंजुरी देणे तसेच सदरील काम त्वरीत

करणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध असलेल्या ठेकेदाराकडून अे.-१ नमुन्यावर करुन घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रिय दर्शनी इंदिरानगर स्लम भागात दगडी गटार बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३३,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता हे काम अे-१ नमुन्यावर उपलब्ध ठेकेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५/१७ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, घाटी स्लम भागात ४ मीटर रुंद रस्ता रुंदीकरणाचे कामांतर्गत बाधीत होत असलेल्या घरांच्या भिंती पाडून नविन भिंती बांधण्याच्या कामासाठी र. रु. ८१,४००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. ३ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ११% कमी |
| २. | श्री. मीर हिदायत अली | १५% कमी |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | १०.७% |

तुलनात्मकदृष्टया श्री. मीर हिदायत अली यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराचे आहे. सदरील काम तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे मा. आयुक्तांनी स्थायी समितीचे अपेक्षित मंजुरीने त्वरीत काम सुरु करण्यास आदेश दिल्यानुसार काम सुरु करण्यात आले आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे, श्री. गजानन बारवाल :** वार्ड क्र. १२ ते २२ ची कामे का होत नाही?

**मा. सभापती** : याबाबत चर्चा झालेली आहे. सदरचे प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घाटी स्लम भागात ४ मीटर रस्ता रुंदीकरणाचे कामांतर्गत बाधीत होत असलेल्या घरांच्या भिंती पाडून नविन भिंती बांधण्याच्या कामासाठी श्री. मीर हिदायत अली यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर काम तातडीने असल्याने सुरु करण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३६/१८ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात विविध भागातील झोपडपट्टी, भागात गटारीचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. १०,००,०००/- चे तयार करण्यात आले असता त्यापैकी रु. ५,००,०००/- चे गटार खरेदी करण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर सदरील कामासाठी टेंडर मागविण्यात आले असता पहिल्या वेळेस टेंडर मागविले, स्थायी समिती ठराव क्र. ३४३ दि. २१-२२-९० द्वारे डिव्हिजनल मॅनेजर एम. एस. एस. आय. डी. सी. यांचे टेंडर मंजुर करण्यात आले. त्यानुसार त्यांना दि. १७-०१-९१

चे पत्राद्वारे सदरील कामासाठी २% अनामत जमा करण्यासाठी कळविले असता त्याचे उत्तरी त्यांनी दिनांक २५-०१-९१ चे पत्राद्वारे टेंडरचे अटीनुसार ९० दिवसाची मुदत संपल्यामुळे गटर पुरवठा करण्यास नकार देवून १% इसाराची रक्कम परत करण्यासाठी विनंती केली असता सदरील कामासाठी मा. आयुक्त मनपा यांनी दिनांक १२-०४-९१ रोजी पुन्हा टेंडर मागविण्याचे आदेश दिल्यानुसार कार्यालयाची टेंडर नोटीस क्र. २ द्वारे पुन्हा टेंडर मागविले असता एकूण दोन दरनिर्दिष्ट टेंडर प्राप्त झाले. ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रेणूका इंडस्ट्रीज | ११४/- प्रती मीटर |
| २. | एम. एस. एस. आय. डी. सी. | १३०/- प्रती मीटर |

तुलनात्मकदृष्टया मे. रेणूका इंडस्ट्रीज यांचे प्रती मीटर रु. ११४/- हा दर कमी आहे. बाजारात सिमेंट व लोखंड यांचे वाढलेले भाव विचारात घेता मे. रेणूका इंडस्ट्रीजचे दर मंजुर करणे तसेच या दराप्रमाणे ४३८६ मीटर गटार तुर्त खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** संबंधित प्रस्तावास मंजुरी द्यावी. परंतु अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी देण्यात येऊ नये.

**श्री. तुळशीराम भगुरे :** या प्रस्तावामध्ये मा. आयुक्त यांनी रु. ५ लाखास मंजुरी दिलेली आहे.

**उप अभियंता स्लम :** शहरातील बऱ्याचशा स्लम भागासाठी वेगवेगळी कामे आहेत. त्या सर्व वेगवेगळया कामाच्या खर्चाच्या कामास एकत्रीत करुन रु. १० लाखाचे अंदाजपत्रकीय रक्कमेचा खर्च तयार झाला. परंतु हयापैकी विविध कामाचे रु. ५ लाखाच्या खर्चास मान्यता दिलेली आहे.

**श्री. केशव सोनवणे :** या प्रस्तावामधे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर केले असता मा. आयुक्त महानगरपालिका यांनी रु. ५ लाखाच्या गटार खरेदी करण्यासाठी मंजुरी देवून सदरील टेंडर मागविण्याचे आदेश दिले. हे वाक्य प्रस्तावातून वगळण्यात यावे.

**मा. सभापती** : ठीक आहे. सं. सदस्यांनी सुचविल्यानुसार मा. आयुक्तांचे सदरील वाक्य प्रस्तावातून वगळण्यात यावे व अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात विविध भागातील झोपडपट्टी भागात गटारीचे काम करण्यासाठी रु. ५,००,०००/- च्या गटार खरेदी करण्याच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराच्या मे. रेणूका इंडस्ट्रीज यांच्या रु. ११४/- प्रती मीटर या दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच उपरोक्त दराने मे. रेणूका इंडस्ट्रीज यांचेकडून तुर्त ४३८६ मीटर गटार खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३७/१९ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल स्लम भागात खांडकी पेव्हींग व खडी रस्त्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ६८,०००/- ला मा. आयुक्त

मनपा यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिक | २६ % कमी |
| २. | मे. एस. एच. असोशिएटस | २० % कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. सय्यद रफिक यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६ % कमी दराचे दरपत्रक हे कमी दराचे आहे. सदरील कामासाठी तिसऱ्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या आहेत. ही बाब विचारात घेता सदरचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल स्लम भागात खांडकी पेव्हींग व खडी रस्त्याचे काम करण्यासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६ % कमी दराची श्री. सय्यद रफिक यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३८/२० :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, सादत नगर स्लम भागात मुलभूत सुखसोची उपलब्ध करुन देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४५९ दि. १६-०३-९१ द्वारे अंदाजपत्रक रक्कम रु. २,९५,०६३/- ला मंजुरी दिली असून, वरील स्लम मध्ये २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनज लाईन टाकण्याच्या कामसाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,०३,०००/- च्या वरील मंजुर रक्कमेत समावेश आहे. करीता वरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ३ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. एन. वाहुळ | ००.५०% कमी |
| २. | श्री. अब्दुल खालेफ | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.५०% कमी दराचे टेंडर आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादत नगर स्लम भागात मुलभूत सुखसोई उपलब्ध करण्यासाठी २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीत प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.५०% कमी दराच्या श्री. डी. एन. वाहुळ यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३९/२१ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, घाटी स्लम भागात खांडकी पेव्हींग काढून खडी रस्ता करणे व काही भागात खांडकी पेव्हींग कॉक्रीट पेव्हींगची दुरुस्ती करण्यासाठी र. रु. २,४४,१००/- तसेच रस्त्याचे डांबरीकरण करणे व जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५४ दिनांक १६-१२-८९ द्वारे मंजुरी दिल्याप्रमाणे तसेच मा. आयुक्तांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ०.२०% कमी |
| २. | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | ५% जास्त |
| ३. | श्री. एल. एम. पडघन | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. कुलवंतसिंग यांचे दर कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी आहे. तरीपण मा. उप आयुक्त, मुख्य लेखा परीक्षक, व शहर अभियंता यांनी ठेकेदारास समक्ष बोलावून चर्चा केली असता त्यांनी टेंडरमध्ये दिलेल्या दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने वरील काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी समती दिलेली आहे.

करीता श्री. कुलवंतसिंग यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे टेंडर मंजुर करण्यास्तव प्रस्तात विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घाटी स्लम भागात खांडकी पेव्हींग काढून खडी रस्ता करणे व काही भागात खांडकी पेव्हींग व क्रॉक्रीट पेव्हींगची दुरुस्ती करण्यासाठी तसेच रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी व जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४०/२२ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, अशोक नगर (मजनु हिल) येथे १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. व ३०० मी. मी. आर. सी. सी. भूमिगत ड्रेनेज लाईन टाकणे व टँक बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २,८३,५००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ४६८ दि. १६-०३-९१ द्वारे मंजुरी मिळाल्यानंतर सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ४% जास्त |
| २. | श्री. महमद सलिम | ०.४०% कमी |
| ३. | मे. एम. एच. असोशिएटस | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४०% कमी दराची श्री. महमद सलीम यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे, श्री. गजानन बारवाल :** सदरील प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा.

**मा. सभापती** : सदरील प्रस्तावाबाबत काही स. सदस्यांच्या सोबत जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. तोपर्यंत सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते मते ठरले.

**विषय क्र. ४१/२३ :**

उप अभियंता शासकीय जलनि:सारण विशेष कार्यक्रम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकर नगर येथे आर. सी. सी. एनी पी-२ क्लास ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी शासनाने मान्यता दिल्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु. ८,५५,०००/- ला मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली या कामासाठी निविदा सुचना क्र. १/९१९२ नुसार प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग दिवाणसिंग | १०% जास्त |
| २. | श्री. एल. एम. पडघन | १५.५५% जास्त |
| ३. | श्री. पी. जे. तमखाने | ९.०१% जास्त |

श्री. पी. जे. तमखाने यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०१% जास्त व तुलनात्मकदृष्टया कमी दराची आहे. सदर कामाचे चालु दरपत्रकानुसार कामाची किंमत र. रु. ९,५२,५४३/- होते. श्री. पी. जे. तमखाने यांचे टेंडर चालु दरपत्रकापेक्षा २.१५% कमी येते. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंबेडकर नगर येथे आर. सी. सी. सी. एन पी-२ क्लास लाईन टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०१% जास्त दराची श्री. पी. जे. तमखाने यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४२/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. ३५ नागसेन कॉलनी सिध्देश्वर कॉलनी व शियाउद्यीन ले आऊन अंतर्गत रस्त्यास डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ८९-९० च्या सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ९०,६७०/- ला मा. आयुक्तांची दि. ०८-०४-९१ रोजी मंजुरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १ अन्वये निविदा मागविल्या असता श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांची १५% जास्त (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली.

सन ९०-९१ च्या डी. एस. आर. दराप्रमाणे तुलना केली असता वरील दर हे ०३.०५% कमी येतात. करीता रे. कन्स्ट्रक्शन यांची १५% कमी जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३५ नागसेन कॉलनी, सिध्देश्वर कॉलनी व शियाउद्यीन ले आऊन अंतर्गत रस्त्यास डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४३/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासन उप सचिव (नगर विकास) यांचे दर पत्रक क्र. सी. एम. टी. १८८/४६६/सी. आर/१७३/८८/७-०-२७ दि. २०-१०-१९८८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेस २०० मेट्रीक टन लेव्ही सिमेंट प्रति टन लेव्ही सिमेंट प्रति टन रक्कम रु. १०२८.४५ प्रमाणे मान्यता देवून पनियाम सिमेंट अँड मिनरल इंडस्ट्रीज लि. यांचयाकडून सिमेंट विकत घेण्याची परवानगी दिली होती.

त्याआधारे संबंधित कंपनीस रक्कम रु. २,०५,६९०/- ला धनादेश द्वारे जमा करण्यात आला. परंतु त्या कंपनीचे सिमेंट पुरवठा केला नाही. त्यानंतर लेव्ही सिमेंटबाबत शासनातर्फे नियंत्रण उठविण्यात आले व त्यानंतर सिमेंट पुरवठयाबाबत वारंवार संबंधितांकडून सिमेंट पुरवठयाबाबत पुर्तता करण्यात आली नाही. नंतर कार्यालयाकडून विधी विभागातून कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली.

त्यानंतर पत्र पाठवून कंपनीने खुलासा केला की, आपणास र. रु. ३,३१,९०६/- देणे

असून, कंपनीची परिस्थिती बरोबर नसल्यामुळे दोन-तीन महिन्यात पैसे परत करु. परंतु त्यानंतर पत्राद्वारे विचारणा केली असता कंपनीने त्याचे पत्र क्र. ४/३५/९१ दि.१५-०४-९१ द्वारे दरपत्रक दिले असून प्रति टन रु. १२९०/- प्रमाणे दर दिला असून, २५७ मे. टन सिमेंट देण्यात येईल असे कळविले आहे. सिमेंट वाहतुक व जकात कर वेगळा लागेल वाहतुकीस पनियामनगर, कर्नुल जिल्हा ते औरंगाबाद महानगरपालिका गोडावून पर्यंत वाहतुक करणे व गोडवून मध्ये थप्पी लावणे प्रति किलो मीटर प्रति टन ०.७५/- पैसे प्रमाणे अंदाजे खर्च र. रु. १,४४,५००/- इतका येईल. तरी मान्य झाल्यास उपलब्ध वाहतुक ठेकेदारामार्फत सिमेंट वाहतुक करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पनियाम सिमेंट अँन्ड मिनरल इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्याकडून औरंगाबाद महानगरपालिकेस पुरविण्यात येणारे २५७ मे. टन सिमेंटची पनियामनगर, कर्नुल जिल्हा ते औरंगाबाद महानगरपालिका गोडावून पर्यंत वाहतुक करणे व गोडवून मध्ये थप्पी लावण्या कामाकरीता प्रति किलोमीटर प्रती टन ०.७५/- पैसे या दराने एकूण अंदाजे रक्कम रु. १,४४,५००/- च्या खर्चास व सदरील काम उपलब्ध वाहतुक ठेकेदारामार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४४/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र. ३१ राजाबाजार, जाधवमंडी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. १२ दि. २६-०४-९१ अन्वये र. रु. ३,८८,४७०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. २ दि. १०-०५-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रे. कन्स्ट्रक्शन | १% जास्त |
| २. | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराची श्री. रे. कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३१ राजाबाजार, जाधवमंडी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी, तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराच्या मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४५/२७ :**

वार्ड क्र. ५८ मो. बुध्द नगर येथे १५० मी. मी. व्यासाची चीनी मातीची पाईप लाईन टाकण्याच्या तयार करण्यात आले आहे. या भागात ९०% बांधकामे झालेली असून, त्या ठिकाणी ड्रेनेजची व्यवस्था नाही करीता अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** या प्रस्तावामध्ये अंदाजपत्रक दाखविल्यानुसार सदरचा भाग स्लम आहे काय व तेथील नागरिकांनी बेटरमेंट चार्जेस वगैरे भरलेले आहेत काय याची माहिती द्यावी.

**शहर अभियंता** : सदरील भागातील नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बेटरमेंट चार्जेस वगैरे भरलेले आहेत. काय याची महिती व पी. आर. कार्ड याची माहिती घेण्यात येईल.

**मा. सभापती** : मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५८ मो. बुध्दनगर येथे १५० मी. मी. व्यासाची चीनी मातीची पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरीता र. रु. २,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील चैतन्यनगर अंतर्गत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सन ८९-९० चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ५८६५१/- चे अंदाजपत्रकास दि. २६-०६-९० च्या स्थापत्य समिती ठराव क्र. ११ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९ द्वारे फेर निविदा मागविल्या असता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील चैतन्य नगर अंतर्गत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामा करीता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४७/२९ :**

उप अभियंता " स्लम " यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला सादत नगर भागात (वार्ड क्र. ५३) खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक र. रु. १,७४,५८५/- चे तयार करण्यात आले असून, सदरचे अंदाजपत्रक सन ९०-९१ दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सादतनगर स्लम भागात खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता र. रु. १,७४,५८५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४८/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात ज्या ठिकाणी पाणी पुरवठा लाईन द्वारे पाणी पुरवठा होऊ शकत नाही. अशा ठिकाणी बोअरवेल खोदण्याचे काम हाती घेण्यासाठी एकूण २५ ठिकाणी बोअरवेल घेण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ५,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

मा. आयुक्तांचे दि. ०८-०५-९१ चे मंजुरीसअधिन राहुन शहरात २५ ठिकाणी बोअरवेल घेण्याचे कामासाठी मनपा/पापु/९७६/९१ दि. ०८-०५-९१ अन्वये जाहिर निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मदार इनवेल सर्व्हीसेस | ४.८% जास्त |
| २. | मे. सुरज टयुबवेल | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | मे. अर्जुना ड्रिलवेल | ६.८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया मे. सुरज टयुबवेल यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची आहे.

मा. आयुक्तांनी दि. २६-०५-९१ रोजी एकंदर पाणी टंचाई लक्षात घेता शहरात विविध पाच ठिकाणी बोअरवेलचे काम हाती घेण्यास मान्यता दिली आहे. त्यास अधिन राहुन पद्मपुरा, बुक्कलगुडा, (बनेमिया दर्गाजवळ) सिडको व शहागंज या ठिकाणीची पाणी टंचाई लक्षात घेता वरील पाच बोअरवेल पैकी पदमपुरा, बुक्कलगुडा, जिन्सी येथील बोअरवेलचे काम हाती घेण्यात आले आहे.

करीता रुपये ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास व मे. सुरज टयुबवेल्स यांची अंदाजपत्रकीय दराची निविदेस मंजुरी मिळण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात ज्या ठिकाणी पाणीपुरवठा लाईनद्वारे पाणी पुरवठा होऊ शकत नाही. अशा ठिकाणी बोअरवेल खोदण्याचे काम हाती घेण्यासाठी एकूण २५ ठिकाणी बोअरवेल घेण्याकरीता र. रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. सुरज टयुबवेल्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४९/३१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात विविध ठिकाणी बोअरवेल खोदण्याच्या एकूण २५ बोअरवेलचे अंदाजपत्रक र. रु. ५,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे. मा. आयुक्तांचे दि. ०८-०५-५१ चे मंजुरीस अधिन राहुन शहरात २५ ठिकाणी बोअरवेल घेण्यासाठी जाहीर निविदा मागविल्या असता मे. सुरज टयुबवेल्स, औरंगाबाद यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची आहे.

एकंदर पाणी टंचाई लक्षात घेता मा. आयुक्तांनी दि. २६-०५-९१ रोजी शहरात विविध पाच ठिकाणी बोअरवेल खोदण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरील पाच ठिकाणी बोअरवेल खोदण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

तसेच सुरज टयुबवेल याची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीबाबतचा सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव ठेवण्यात आला आहे.

जा. क्र./मनपा/पापु/१०३६/९१ दि. २९-०५-९१ अन्वये कार्यालयातर्फे वरील भू वैज्ञानिक यांना ज्या ठिकाणी बोअरवेल घ्यावयाचे आहेत. त्या ठिकाणची पाहणी करुन बोअरवेल घेण्यासाठी उपयुक्त नेमकी जागा दाखवून देण्याकरीता पत्र देण्यात आले होते. त्यानुसार वरीष्ट भूवैज्ञानिक यांचेकडून आलेले पत्र क्र. एस. जी. एफ. डी. अे./अे.बी.डी./टेक/१०२८/९१ अनुसार त्यांनी पाहणी फीस (हायड्रोसिऑलॉजिकल सर्व्हे) करीता रक्कम रु. ४२५/५ प्रत्येकी जागा याप्रमाणे फीस जमा करण्याकरीता लिहीले आहे.

सदरील फीस जमा केल्यानंतरच आवश्यक तो सर्व्हे करण्यात येईल असेही सदरील पत्रात लिहिले आहे.

करीता वर दर्शविल्याप्रमाणे बोअरवेल खोदण्यासाठी जी. एस. डी. अे. सोबत पाहणी करुन नेमकी जागा पाहणीसाठी जी. एस. डी. अे. कार्यालयाकडे रु. १०,६२५/- चालनद्वारे जमा करणे करीता मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्या ठिकाणी बोअरवेल घ्यावयाचे आहेत. ज्या ठिकाणी पाहणी वरीष्ट भूवैज्ञानिक यांचेकडून करुन घेऊन बोअरवेल घेण्यासाठी उपयुक्त नेमकी जागा दाखवून देण्याकरीता पाहणी फीस (हायड्रोजिऑलॉजिकल सर्व्हे) करीता जी. एस. डी. अे. कार्यालयाकडे र. रु. १०,६२५/- चालनद्वारे जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५०/३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बेगमपुरा येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी सां. बां. विभागाचे सन ८७-८८ चे डी. एस.आर. दराने रक्कम १,०९,३३०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ४८४ दि. २१-१०-८८ अन्वये मंजुरी मिळाली आहे. तसेच सदर काम करुन घेण्यासाठी निविदा सुचना क्र. ९ दि. १८-११-८९ अन्वये निविदा मागविल्या असता क्र. ९ दि. १८-११-८९ अन्वये निविदा मागविल्या असता श्री. संजय पी. सरवदे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९-१% कमी दराचे निविदेस स्थायी समिती ठराव क्र. ४२८ दि. २२-०१-९० अन्वये मंजुरी मिळाली आहे.

परंतु स. नगरसेवक श्री. अजित शेळके यांनी दि. १८-०६-९० रोजी पत्र देवून कळविले आहे की, बेगमपुरा येथे जुन्या शाळेस दुरुस्ती करुन समाजमंदिर बांधणे सदरचे काम २५ ते ३० वर्षापुर्वीचे असल्यामुळे सदरचे काम पुर्ण पाडून तेथे नविन बांधकाम करावे. त्याप्रमाणे प्रत्यक्ष पहाणी करुन सन १९९०-९१ चे सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,८८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सबब सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २,८८,५००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा येथे समामंदिर बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८८,५००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

**मा. सभापती** : १) स. सदस्य श्री. शंकर मगर यांनी अर्ज सादर केला आहे की, दि. ३० मार्च ९१ रोजी ऐनवेळच्या विषयात मो. इंदिरा नगर मधील विहिरीवर मोटरपंप बसविणे व सिमेंटच्या दोन टाक्या बांधणे बाबतचा प्रस्ताव आलेला होता व या दोन्हीही प्रस्तावास स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती. दि. २४-०६-९१ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये याबाबतच्या संवादाचा उल्लेख आहे. सदरील दोन्हीही कामावर होणारा खर्च हा नगरसेवक स्वेच्छा निधीतू करण्यात येणार आहे. तेंव्हा यास मंजुरी देण्यात येते.

२) त्याचप्रमाणे स. सदस्य अजीमखॉ दादामियॉ यांनी अर्ज सादर केलेला आहे की, दि. २२-०४-९१ रोजी स्थायी समितीचा ठराव क्र. ५८२/१४ अन्वये श्रीमती बिसमिल्ला बी भ्र. मं. उस्मान रा. सिल्लेखाना औरंगाबाद यांना तसेच त्यांच्या बरोबर ज्या व्यक्तींना रॉक्सी टॉकीजच्या मागील जागा ३० वर्षाच्या लिजवर देण्यात आली सदरची जागा अर्जदाराची रोडमध्ये अक्वायर करण्यात आली म्हणून मोबदल्यात नॉर्मल लिजवर देण्यात आली. परंतु ठरावामध्ये ३० वर्षे कालावधीसाठी लिजवर देण्यात अली असे नमुद करण्यात आले नाही. सदरील दुरुस्ती सर्वानुमते करण्यात येते. तसे. दि. २४-०६-९१ च्या स्थायी समितीच्या इतिवृत्त विषय क्र. ५८९ यावर चर्चा झाली होती व मंजुरी मिळाली असून, त्यास सर्वसाधारण सभेस पाठविण्याची ठरले होते. परंतु या विषयावर सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली असल्या कारणाने त्यास सर्वसाधारण सभेत पाठविण्याची आवश्यकता नाही. अशी सदर ठरावात दुरुस्ती करण्यात येते व सदर ठरावातील प्रस्ताव सर्वसाधारण सभेस पाठविण्यात यावा. ही ओळ वगळण्यात यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** मिटींग विभागामध्ये टायपींग काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना टायपींग भत्ता देण्यात येते नाही व भत्ताही कमी करण्यात आलेला आहे. याचे कारण काय?

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** नियमाप्रमाणे रु. ४०/- प्रमाणे भत्ता देण्यात यावा आणि सध्या रु. ७५/- प्रमाणे देण्यात येतो. परंतु मान्यता रु. २०/- ची असून, जी. आर. प्रमाणे रु. ४०/- देण्याची मान्यता द्यावयास हरकत नाही.

**उप आयुक्त** : शासन नियमानुसार रु. ४०/- प्रमाणे टायपींग काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जादा वेळेत काम केल्याचा मोबदला देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती** : ठीक आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री. गजानन बारवाल :** मनपा निवडणूकीच्या वेळेस येथील कर्मचाऱ्यांनी काम केले त्या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ का देण्यात आलेली नाही.

**उप आयुक्त** : ठिक आहे. प्रति वर्षी कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यात येते. त्याप्रमाणे यावर्षी विचार करण्यात येईल.

**मा. सभापती** : मनपाकडे महापौर, सभापती, आयुक्त, उपमहापौर आदींची वाहने नागरिकांच्या कामासाठी सतत चालु असतात. अशा वाहन चालकांना रु. २/- प्रमाणे काम केल्याचा अतिरिक्त भत्ता मिळतो तो अपुरा असून, या सर्व वाहन चालकांना विशेष केस म्हणून जादा भत्ता मंजुर करण्यात यावा.

याबरोबर आजची सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |